त्याला आनंद झाला तो कशामुळे ? माझ्या खोट्या बोलण्यानेच ना ? मग माझ्या खोट्या बोलण्यांत काय चूक आहे ? एखाद्या व्यक्तीला आनंद देणें आपल्या हातांत असतांना आपण ‘सत्य’ ‘सत्य’ करीत सत्याच्या मागे लागून त्याला विनाकारण निराश कां करावें ? मी तर म्हणतों अशा वेळीं कटु सत्य व्यक्त करण्यापेक्षा मधुर असत्यच बेधडक बोलून दाखवावें. तेंच योग्य होईल.

आणि मला पटलेलें हें मत मीं माझ्या दुसऱ्या एका सत्यप्रेमी ’ मित्राजवळ बोलून दाखविलें; तर तो एकदम संतापून म्हणाला, “ छे, छे ! हा तूं सांगतोयस् तो आनंद निःसंशय क्षणिक असतो; नि या अवाढव्य जगांत – या विशाल जीवनांत तो यःकश्चित् आणि म्हणूनच निरुपयोगी आहे. शाश्वत आनंदाशिवाय कोणत्याहि प्रकारचा आनंद जीवनांत अनावश्यक आहे ! ”

त्याचें तत्त्वज्ञान ऐकून मी चाटच झालों !

या आनंदाचा उगम अज्ञानांत असल्यामुळे तो क्षणिक आहे, हें मलाहि मान्य आहे; पण शाश्वत प्रकारचा आनंद मिळविण्याच्या खटाटोपांत क्षणिक आनंदाचे सुखद क्षण गमावून बसण्यांत काय अर्थ ? हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्यासारखं आहे तें ! क्षणिक आनंदाच्या उपभोगांत माझ्यादृष्टीने तर कांहीच दोष नाहीं; किंबहुना क्षणिक आनंदाच्या सातत्यानेच जीवनांतील दुःखभार हलके हलके कमी होत असतो. वैराण वाळवंटांत सुंदर हिरवळीचें जें महत्त्व, तेंच दुःखमय आयुष्यांत क्षणिक आनंदाचें ! आनंदाच्या अशा क्षणांमुळेच जीवनांत रम्यत्व येतें—आलें आहे. चिरस्थायी सौंदर्याच्या मागे लागून वसंत ऋतूंतील अल्पकालीनच पण तेवढ्यांतहि मनाला अत्यंत आल्हाद देणाऱ्या— अन्तःकरणाला उच्च प्रतीचें सात्त्विक समाधान देणाऱ्या नयनमनोहर सृष्टिसौंदर्याकडे का तुम्ही दुर्लक्ष करणार ? शाश्वतच्या मागे धावणारे माझ्या त्या मित्रासारखे लोक तें वसंतऋतूंच सौंदर्य क्षणिक म्हणून खुशाल डोळे झांकून घेऊं देत. मी मात्र त्या अप्रतीम सौंदर्याचा--त्या क्षणिक आनंदाचाहि आस्वाद घेणार ! क्षणिक आनंद हा शाश्वत आनंदाच्या प्रवासांतील मनोहर उद्यानासारखा आहे. त्याचाहि उपभोग घेण्यासारखा आहे.

आणि म्हणूनच यापुढे जेव्हा जेव्हा माझ्या खोट्या बोलण्यामुळे दुसऱ्या कोणाला क्षणिक का होईना आनंद मिळत असेल, अन् त्याची प्रतारणा त्याला कोणत्याहि स्थितींत आनंददायकच ठरत असेल तर मी हमखास खोटें बोलणार ! त्या व्यक्तीला जरूर आनंद मिळवून देणार ! आणि ह्याच कारणामुळे, यापुढे मला कोणी “ खोटें कधी बोलूं नये ” हा उपदेश करूं लागले तर त्यांतल्या “ कधी ” शद्बावर मी ताबडतोब आक्षेप घेईन सदासर्वदा खोटें बोलण्याइतकेंच सदासर्वदा खरें बोलणें त्रासदायक असतें. कधीसुद्धा खोटें न बोलण्याचें व्रत घेणें मी तरी मूर्खपणाचेंच समजेन.

मूर्खपणाचेंच कशाला ! तें अशक्य कोटींतलेंच आहे मुळी ! सदासर्वदा निर्भेळ सत्य बोलणें केवळ अशक्यच आहे. अहो, जगच मुळी पूर्ण सत्य नाही ! सत्य आणि असत्य यांचें सफाईदार मिश्रण म्हणजे जग ! अन् त्यांतहि असत्याचाच अंश जास्त !! ‘ जगन्मिथ्या ’ हें प्रकरण (!) तात्त्विक दृष्ट्या बरोबर आहे की नाही तें मला माहीत नाही, पण एक गोष्ट मात्र मला खात्रीने सांगतां येईल “ जगन्मिथ्या ” हें व्यावहारिक दृष्ट्या अगदी खरं आहे ! त्यामुळेच जगांतील व्यवहार नुसत्या सत्यावर चालणें शक्य नाही.

धर्मराजानें शेवटपर्यंत सत्याचा आधार घेऊन वाटचाल केली, पण त्या थोर ध्येयनिष्ठ धर्मराजाच्या जीवनांतहि एक क्षण असा आला की त्याला ‘ नरो वा कुञ्जरो वा ’ म्हणून सत्याला थोडें बाजूला सारावें लागलें. इतर लोक या क्षणाला धर्माच्या ध्येयच्युतीचा क्षण म्हणोत, पण मी मात्र म्हणेन कीं, ज्या क्षणी धर्माच्या तोंडून ‘ नरो वा कुञ्जरो वा ’ हे शद्ब बाहेर पडले, त्याच क्षणीं त्याला जगाच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान झालें !

जीवन हा सत्य आणि असत्य यांनी विणलेला एक गोफ आहे जीवनांत नग्नसत्य येऊं शकत नाही असूं शकत नाही नग्नसत्य हें एक कविकल्पित तरी आहे किंवा एक भयंकर दिव्य तरी आहे ! निदान मला तरी असेंच वाटतें ‘ सत्य म्हणजेच सौंदर्य ” असा कुणी कितीहि आक्रोश करो, मी मात्र म्हणेन —

“ ‘ सत्य म्हणजेच सौंदर्य ’ असं म्हणता ना ? कबूल. पण तें सौंदर्य एखाद्या लहानशा, अवखळ झऱ्याचें नाही, भीषण-प्रचंड धबधब्याचें आहे ! सत्यामध्ये थोडीतरी असत्याची छटा असल्याशिवाय तें सुसह्यहि होणार नाही नि वास्तवहि. होणार नाही ! कदापिहि होणार नाही !! ”



# —* गोड गुपित *—

लेखिकाः— कु. सरोजिनी कोठूरकर, चतुर्थ वर्ष, कला

ठणाण...ठणाण... घंटा ठणाणली आणि आम्ही अेकदम भानावर आलों ! शाळेच्या नव्या वर्षाचा पहिलाच दिवस होता तो ! दोन महिन्यांच्या दीर्घ कालावधीनंतर प्रथमच अेकमेकींना भेटत असल्याने आमच्या गप्पांना नुसता ऊत आला होता. ‘ अय्याऽऽ किती लवकर घंटा झाली आज.” म्हणतच आम्ही उठलों. चिंचेच्या सांवलींत लंगडी खेळणाऱ्या पहिली दुसरी या पोरी भरकन् वर्गांत पळाल्या. सोनसाखळी खेळणाऱ्या मुलींची लांबच लांब सांखळी घंटेचा आवाज कानांवर पडतांक्षणींच पाणी पिण्याच्या खोलीच्या रोखाने दौडत निघाली. दुसरी घंटा व्हायच्या आंत वर्गांत जाऊन रांगेत उभं राहण्यासाठी प्रत्येकाची धडपड चालली होती. दुसरी घंटा झाली आणि सगळीकडे अेकदम शांतता पसरली. बागेंतील वृक्षावर चिमण्यांचा चिवचिवाट बराच वेळ चालू असतां त्या अेकदम भरकन निघून गेल्या म्हणजे जशी शांतता पसरते तशीच शांतता साऱ्या शाळेंत पसरली. क्रमाक्रमाने प्रत्येक वर्ग पटांगणावर जाऊं लागला. ९ वीच्या मुली पुढे गेल्या. आम्ही त्यांच्या पाठोपाठ चालूं लागलों. पांचच मिनिटांपूर्वी ह्या साऱ्या जणींनी आपल्या हंसण्याखिदळण्याने आणि आरडा ओरडीने सारी शाळा डोक्यावर घेतली होती हें शपथेवर सांगूनहि कोणाला पटलें नसतें.

मीं समोर पाहिलं. सर्व शिक्षिका गटागटाने आमच्याकडे येत होत्या. मी मोठ्या उत्सुकतेने पाहूं लागलें. यंदा कोणी नवीन बाई येतात का हें मला पहावयाचं होतं ! मी जिथे उभी होतें त्याच बाजूला घाटे बाई आल्या आणि त्यांच्याबरोबर असलेल्या अेका अनोळखी व्यक्तीनं माझं लक्ष चटकन् वेधून घेतलं. चांगलाच उजळ वर्ण होता त्या व्यक्तीचा. किंचित स्थूल व त्यामुळे जरासा ठेंगणासा वाटणारा देह पांढऱ्या शुभ्र ब्लाऊझ व पिवळ्या किनारीच्या निळ्या पट्यापट्याच्या साडींत लपेटलेला होता. जरा डाव्या बाजूला कललेला भांग, विशाल कपाळ आणि धारधरीत नासिका डोळे बदामाकृतिहि नव्हते किंवा मत्स्यासारखेहि नव्हते. परंतु नजर मात्र कांही आगळीच होती. इतकी पाणीदार आणि भेदक नजर मी तरी प्रथमच पहात होतें अेका दृष्टिक्षेपांतच दुसऱ्याच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याची जादु होती त्यांत ! तिचं कपाळ कुंकुमविरहित पाहून मला कसंतरीच वाटलं कानांतहि कांही नव्हतं आणि गळा पार सुना होता. हातांत फिक्या निळ्या रंगाच्या कांचेच्या बांगड्या आणि डाव्या हाताला मनगटी घड्याळ. घाटे बाईजवळ ती व्यक्ती उभी होती. घाटे बाईंनी आमच्या वर्गाकडे पाहात कांही तरी सांगतांच तिनं झटकन् आमच्या वर्गाकडे नजर टाकली, आणि मग परत घाटे बाई कांहीतरी सांगूं लागल्या. मी त्या नवागतेकडे पहातच राहिलें. कां कोण जाणे ? त्या व्यक्तीला पाहतांच मनांत अेकाअेकी आदराची भावना निर्माण झाली देवाची मूर्ति पाहतांच नकळत मनांतली भक्ति डोकं वर काढते व आपण चटकन् त्या मूर्तीला नमस्कार करतों. त्यावेळीं जशी मनःस्थिति हते तशीच कांहीशी स्थिति झाली माझी. उर्मिलेच्या कोंपरखळीने मी भानावर आलें. पाहातें तों समोर मोठ्या बाई हात जोडूनच उभ्या होत्या. मी प्रार्थना सुरू केली पण माझ्या न कळत माझे डोळे वारंवार त्या व्यक्तीकडे वळत होते

वर्गांत आल्याबरोबर मी कमलला विचारलं, ‘ अे कमला ! त्या घाटे बाईजवळ उभ्या होत्या त्या कोण ग ? ” कमला म्हणजे आमचं गॅझेट होते.

“ त्या नं ? त्या निळी पट्यापट्याची साडी नेसल्या आहेत त्या ? ” कमला सांगूं लागली, “ त्या किनईऽ यंदा नवीन आल्या आहेत ”

" तें तर मलाहि दिसलं ग! पण नांव काय त्यांचं? " मी उत्सुकतेने विचारलं.

' त्यांचं नांव कु. प्रभावती शुक्ला. " कमला उत्तरली.

" शुक्ला म्हणजे कोण ग? ब्राह्मण? " तारानं विचारलं

" अहो बाईसाहेब! त्या ब्राह्मण पण नाहीत अन् हिंदु पण नाहीत. त्या आहेत हिंदी ख्रिश्चन. " कमलानं पुढे माहिती पुरविली.

अँ? मला अेकदम धक्का बसला आश्चर्याचा. हेऽ! त्या तर महाराष्ट्रीयन वाटतात.

" अे! उगीच तोंडाला येईल तें सांगूं नकोस हं! त्या तर अगदी महाराष्ट्रीयन वाटतात. " मीं शंका प्रदर्शित केलीच अखेर

" त्यांच्या कपाळाला कुंकु कुठे होतं? पाहिलं नाहीस वाटतं तूं? "

खरंच की! इतक्यांत तास सुरू व्हायची घंटा झाली. मीं उत्सुकतेने दाराकडे नजर फेंकली.

" हा दहावीचाच वर्ग ना? " म्हणत नव्या बाईंनी वर्गांत पाऊल टाकलें. आम्हीं उठून उभ्या राहिलों. खुर्चीवर बसतां बसतांच त्यांनी मानेने आम्हाला बसण्याची खूण केली. आम्हा सर्वांकडे अेक भेदक नजर टाकून त्यांनी अेक प्रसन्न हास्य केलं आणि हळूंच बोलायला सुरवात केली. ' यंदा मी तुमचं इंग्लिश घेणार आहे. " मला खूप बरं वाटलं. "तुम्हाला दर गुरुवारीं शेवटचा तास प्रथमोपचाराचा आहे नां? तो मी घेणार आहें. आणि दुसरं म्हणजे मीच तुमची वर्ग शिक्षिका आहे. तुमचं सहकार्य मिळालं तरच मला माझीं कर्तव्यें नीट पार पाडतां येतील. माझा वर्ग आदर्श व्हावा असं मला वाटतं, पण तुमच्या सहकार्या-वरच तें अवलंबून आहे. तेव्हा तुम्ही मला मदत कराल अशी आशा आहे. "

त्यांच्या ह्या शब्दांची आमच्यावर तेव्हांच छाप पडली. दर वर्षी आम्हाला नव्या शिक्षिका मिळत होत्या. पण अेकीनंहि असं सांगितलं नव्हतं. बाईंनी आमचीं नांवं विचारलीं. मला वाटलं आतां त्या विचारतील तुमच्यांत पहिली कोण आली म्हणून! आणि मग त्यांनी असं विचारतांच आपल्याला लाजत लाजत उभं रहातां येईल. पण त्यांनी तसं कांहीच विचारलं नाही उलट त्या म्हणाल्या. ' अमकी विद्यार्थिनी माझी आवडती अन् तमकी नावडती असं मी आजपर्यंत तरी केलं नाहीं. तुम्ही सर्वजणी मला सारख्याच आहांत. म्हणूनच तुमच्यांतली पहिली कोण तें मी तुम्हाला विचारीत नाहीं मी माझं काढीन शोधून. "

पहिल्या नंबरचा तोरा नव्या बाई समोर मिरवितां आला नाही म्हणून मी जराशी खट्टु झालें पण त्यांची विचारसरणी मला आवडली. पहिल्याच तासाला आज-पर्यंत आमच्याशी कोणी इतकं मनमोकळेपणानं बोललेच नव्हते, आपली आवडनिवड सांगितली नव्हती, आमच्या सहकार्यांची मागणी केली नव्हती. इतरांनी तें केलं नव्हतें तें बाईंनी केलें होतें. मी कौतुकाने बाईकडे पाहूं लागलें.

" तुम्हीं आज पुस्तकं आणलीं आहेत कां? " बाईंनी विचारलं. ' हो हो ऽऽ " आम्ही होकार दिला

" मग काढा तर बाहेर. आपण आजपासूनच करूं या सुरवात. शुभस्य शीघ्रम्! काय? चालेल ना? " त्यांनी आमची संमति घेतली

' चालेल ना काय? चालेलच की?" आम्हीं पटपट पुस्तकं बाहेर काढलीं

बाई उठून टेबलाच्या पुढे उभ्या राहिल्या. डाव्या हातांत पुस्तक धरून उजवा हात काटकोनांत आणला आणि मग अेकवार आमच्याकडे पाहून पुस्तक उघडलं "I wander lonely" ही कविता घेतली त्यांनी. प्रथम कविता वाचून त्यांनी त्यांतील कठीण शब्दांचे सोपे सोपे इंग्लिश प्रतिशब्द सांगितले आणि मग त्यांची रसवंती सुरू झाली. मधुर पण स्पष्ट व खणखणीत शब्दोच्चार कानावर पडूं लागले. अगदी आम्हाला सहज समजेल अशा भाषेंत त्यांनी त्या भटक्या ढगांचें वर्णन केलें, आणि हां हां म्हणतां, तें मोठें तळें, त्या तळयाच्या कांठावर उगवलेलीं तीं असंख्य फुलें, वाऱ्याच्या झुळकीने डोलणाऱ्या त्यांच्या माना, त्यांना साथ देणारे तळ्याच्या पाण्यांतील तरंग, सगळं सगळं जणूं कांहीं आमच्यासमोर साकार केलं. असं वाटलं तास कधीच संपूं नये. त्यांच्या वाक्सरितेंत अखंड डुंबत रहावसं वाटलं मला. पण आपलं काम चोखपणें बजावणारी



घंटा स्वस्थ कशी बसेल? वेळ संपल्याची सूचना दिलीच तिनं अखेर. आणि आम्ही अेकदम Words worth च्या जगांतून आमच्या वर्गांत आलों कसं भारल्यासारखं झालं होतं अगदी! पहिल्याच तासाला बाईंनी आम्हाला जिंकलं होतं. पुरतं जिंकलं होतं! त्यांच्या पहिल्याच तासावर आम्ही बेहद्द खूष होतों. आणि आतां रोज त्यांच्या तासाची उत्सुकतेने वाट पहाणार होतों आमच्या चेहऱ्यावरचे " किती छान शिकविलं, नाही? " हे भाव बाईंच्या चाणाक्ष नजरेंतून सुटणं शक्य नव्हतं. ' राहिलेली कविता उद्यां शिकवीन हं " म्हणून बाई निघूनहि गेल्या. मी मात्र त्यांच्या पाठमोऱ्या आकृतिकडे पाहत राहि .

प्रथमोपचाराच्या तासाला बाई आम्हाला बॅन्डेजेस बांधायला शिकवीत. प्रत्येक वेळीं अेक दोन नवे प्रकार शिकवीत. अेकदां कसं बांधायचं तें नीट कळलं म्हणजे मग आम्ही अेकमेकींना बांधून प्रॅक्टिस करीत असूं. त्या वेळीं बाई आम्हाला इतर वर्गांत ऐकूं जाणार नाही इतक्या हळू आवाजांत गप्पा मारायला खुशाल परवानगी देत. पुष्कळ वेळां त्याहि आमच्या गप्पांत सामील होत. वयांतील फरकाची जाणीव होऊं न देतां त्या आमच्याच इतक्या उत्साहाने आमच्याशी बोल ण्यांत समरस होऊन जायच्या. बोलतां बोलतां स्वतःची माहितीहि सांगायच्या. गप्पांच्या ओघांत कितीतरी नवीन गोष्टी सांगायच्या त्या आम्हांला. मादाम क्युरीचं चरित्र वाचण्याची स्फूर्ति त्यांनीच दिली मला. बोरकर, कुसुमाग्रज ह्या नवकवींच्या काव्याची ओळख त्यांनी करून दिली आम्हांला. राजकारणांतहि त्यांना गांधी-पेक्षा सुभाषचं तत्वज्ञान जास्त आवडे. त्या नेहमी म्हणत. ' कोणी जर माझ्यावर खडा फेंकला तर मी वीट फेकेन त्याच्यावर! " त्यांचा हा तास आम्हांला फार हवाहवासा वाटे. अेकदा स्वत:बद्दलची कांही माहिती सांगतांना मला अेक नवलाची बातमी समजली अन् ती म्हणजे बाईंची आई महाराष्ट्रीयन होती. बाई म्हणाल्या होत्या, " माझी आई महाराष्ट्रीयन आणि वडील हिंदी. त्यांना लग्न करायचं होतं पण दोघांच्या घरांतून सक्त विरोध! तेव्हा त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला व लग्न केलं. " ही बातमी समजतांच बाई अेकदम महाराष्ट्रीयन कां वाटतात ह्याचं कोडं मला चटकन उलगडलं. आणि त्यांच्या माझ्यामधलं अंतर अेकदम खूपच कमी झाल्यासारखं वाटलं.

१५ आगष्टला गांवांत निरनिराळे कार्यक्रम होते पण मला सगळयांत उत्सुकता होती " वनिता विहार " च्या कार्यक्रमाची. कारण तिथे आमच्या बाईंचं " ४२ च्या चळवळीतील स्त्रियांची कामगिरी " ह्या विषयावर भाषण होणार होतं. आई अध्यक्ष असल्याने मी मैत्रिणींना घेऊन भाषणाला हजर राहण्याची परवानगी मिळवून ठेवली होती. दोन तीनच दिवस राहिले होते. मी मोठ्या खुशींत होतें. संध्याकाळीं मी रोजच्याप्रमाणे बाजाची पेटी बाहेर काढली आणि गाण्याच्या मास्तरांची वाट पहात बसलें कॉलबेल वाजल्याबरोबर मास्तरच आले ह्या समजुतीने मी दार उघडलें आणि दारांत मास्तरांच्या अैवजी प्रभाबाईंना पाहातांच मला आश्चर्याचा अेक धक्काच बसला.

" आई आहे का घरीं? " त्यांनी विचारलं.

" हो " म्हणत मी आंत पळालें आणि मग माझ्या लक्षांत आलं कीं बाईंना आंत बोलविण्याचा साधा शिष्टाचार पाळण्याचंहि आपण विसरलों आहोंत. मी परतलें. बाईंना दिवाणखान्यांत बसविलं आणि आईला बोलावलं. बाई आमच्याकडे आल्या ह्या जाणीवेने मला इतका आनंद झाला होता कीं आई येईपर्यंत त्यांच्याशीं काय बोलावं हेंच सुचेना मला. आई आलेली पाहतांच मी दुसऱ्या खोलींत जायला वळलें पण, " हें पहा विमलताई Man proposes & God disposes म्हणतात ना तसंच झालंय! " हे शब्द अैकतांच मी थबकलें बाई सांगत होत्या, ' वडील आजारी असल्याची तार आली आहे बघा आत्ताच! मला ७ च्या गाडीनं जायलाच हवं. दुसरं कांहीहि कारण असतं तर मी दोन तीन दिवसांनी गेलें असतें, पण आता माझा नाइलाज आहे. तुम्ही दुसरा कांही कार्यक्रम ठेवा. मी परत आल्यानंतर मग तुम्ही म्हणाल तेव्हा बोलेन. "

बाईंच्या शब्दांनी माझ्या आनंदावर अेकदम विरजण पडलं. बाईंचं व्याख्यान अैकायला मिळणार म्हणून मी किती आनंदांत होतें! १५ ऑगस्ट कधी

उजाडतो असं झालं होतं मला. माझी तीव्र निराशा झाली. बाई जायला निघाल्या. त्यांना पोहों-चविण्यास मी व्हरांड्यांत गेलें बाई म्हणाल्या, "उद्यां माझ्या तासाला मुलींना Independence day वर निबंध लिहायला सांग मी परत आल्यावर वह्या तपासीन आणि हें पहा, वर्गावर कोणी आलं नाही तर गडबड करूं नका हं! माझ्या गैरहजेरींत आपल्या वर्गाला कोणी नांवं ठेवील असं वागूं नका." मी नुसती मान तुकवली. बाई टांग्यांत बसल्या. माझ्याकडे पाहून त्यांनी अेक मिठ्ठास हास्य केलं. अेरव्ही त्यांच्या ह्या हास्याचा स्वीकार करण्यांत मीं स्वतःला धन्य मानलं असतं, पण आज त्याला प्रत्युत्तर देणं मला जमलं नाही टांगा वळून दिसेनासा झाला. मी खांबाला टेकून तशीच उभी होतें.

आपल्याला इतकं वाईट कां वाटावं हेंच मला समजेना. मी माझ्या मनाला विचारूं लागलें आणि मग अेकदम माझ्या लक्षांत आलं कीं माझ्या मनाच्या देव्हाऱ्यांत बाईंची मूर्ति कधीच प्रतिष्ठित झाली आहे इतके दिवस कोणीहि प्रवेश न केलेली ती जागा मी माझ्या न कळत त्यांना देऊन बसलें होतें. हें इतक्या न कळत अन् अवचित घडलें होतें कीं मी करतें तें योग्य कीं अयोग्य हें अजमावण्याइतकी फुरसतहि मला मिळाली नव्हती. बाईकडे माझ्या मनानं इतकी ओढ कां घ्यावी हें मला कळेना. त्यांच्या शिकवण्यावर मी खूष होतें त्यांचं व्यक्तिमत्व मला मोहून टाकत होतं. त्यांचं आमच्यांत मिसळणं मला आवडत होतं. एका दृष्टीक्षेपांतच मुलींना ताब्यांत ठेवण्याची त्यांची कला मला न्यारीच वाटत होती सगळ्या शिक्षिकांत त्यांनी मानाचं व अधिकाराचं स्थान मिळविलं होतं, हें माझ्या कानीं पडलं होतं आणि त्या साऱ्याजणी त्यांना प्रेमाने व आदराने 'आका' म्हणतात ही गुप्त बातमीहि मला कमलाकडून समजली होती त्यांनी प्रथमदर्शनीच जी छाप माझ्यावर पाडली होती, जो आदर माझ्या मनांत उत्पन्न झाला होता त्यांत मी जास्त जास्तच गुरफटत चाललें होतें. जातीचं, धर्माचं, कसलंच बंधन पाळायला माझं मन तयार नव्हतं!

मांजराच्या पावलाने दिवस उगवत होता व मावळत होता. टिळक हॉलतर्फे गणेशचतुर्थीला काय कार्यक्रम होतो ह्याबद्दल सगळ्यांनाच उत्सुकता होती अेक दिवस आईनं फर्मान सोडलं "जा ग आशा, जरा तुझ्या प्रभाबाईंना माझा अेक निरोप सांगून ये."

"कोणाकडे म्हणालीस?" मी दचकून विचारलं.

"अग, तुझ्या त्या प्रभाबाई शुक्ला आहेत ना? त्यांच्याकडे जा. त्यांना म्हणावं 'डॉ. शिंद्यांकडे खूप पेशंट आहेत तर त्यांच्याअैवजी तुम्ही व.दांत भाग घ्याल का? चूल व मूल हेंच स्त्रियांचें कार्यक्षेत्र होय हा ठराव आहे म्हणावं' कोणी इतर स्त्री वक्ता मिळाला नाही तर मी भाग घेईन म्हणून त्यांनी मला कबूल केलंय. जा, विचारून ये बरं!"

बाईकडे कसं जायचं? मला मोठा प्रश्न पडला. त्यांना तर मुली घरीं आलेल्या आवडत नाहीत त्या दिवशीं कशावरून तरी त्या कलाला नव्हत्या का म्हणाल्या "माझ्या विद्यार्थिनी जोपर्यंत शाळेंत येतात तोंपर्यंत त्या माझ्या घरीं आलेल्या मला आवडत नाहीत कां कोण जाणे? it is my nature. मग? मी जरा अळंटळंम् करून पाहिलं "आत्तांच तर आलें शाळेंतून. मला आत्ता कंटाळा आला आहे. रामाला पाठव ना चिठ्ठी देऊन!" म्हणून मी टाळाटाळ करून पाहिली. पण मातृदेवतेचीच आज्ञा ती! तिला कोणतंच अपील मान्य झालं नाही मुकाट्याने चपला पायांत सरकाविल्या मी!

मला पाहून बाईंना काय वाटेल? त्यांच्या कपाळावर आठ्या पडतील का? त्या काय करत असतील? काय बोलतील आपल्याशीं? विचारांच्या भरांत घर केव्हाच आलं! घराच्या पायऱ्या चढतांना मात्र माझी छाती धाडधाड उडूं लागली भीतभीतच मी दारावर टक टक केलं. सपातांचा अस्पष्ट आवाज आला आणि लगेच दार उघडलं गेलं मला पाहून अेक क्षणभर बाईंना आश्चर्य वाटलं पण लगेच त्यांनी मला आंत घेतलं "आलेंच हं" म्हणून त्या आंत गेल्या.

मी सभोवार पाहिलं अेका कोपऱ्यांत कोन साधून लिहिण्याचं टेबल खुर्ची होती टेबलावर नाजुक डिझाईन भरलेलं शुभ्र टेबल क्लॉथ होतं बायबल आणि गीता अेकमेकांच्या जोडीनं मोठ्या अैटींत टेबलावर बसले



होते नुकताच आणलेला वह्यांचा गठ्ठा आणि लालनिळी शिसपेनहि पडली होती टेबलावर. दुसऱ्या भिंतीला अंगचंच कपाट होतं. वरचा कप्पा पुस्तकांनी पूर्णपणे भरला होता. मधल्या कप्प्यांत अेक छोटासा रेडिओ, त्यावर सुरेखशी फुलदाणी आणि जवळच घड्याळाची केस होती खालच्या कप्प्यांत कंगवा, तेल, पावडर वगैरे अगदी जरूरीचीं सौन्दर्य प्रसाधानं पडलीं होतीं. दर्शनी भिंतीवर मधोमध येशूची अेक भव्य तसबीर होती. तिला कलावतूचा अेक सुरेखसा हार घातला होता. डाव्या भिंतीला लागूनच त्यांचा पलंग होता. नेटच्या मच्छरदाणींतून त्यावरचं हिरवं बेडकव्हर दिसत होतं. खिडक्या व दारांचे पडदेहि फिकट हिरव्या रंगाचे होते. हिरवा रंग आवडता असला पाहिजे त्यांचा. एक येशूची तजबीर सोडली तर बाकीचं वातावरण अगदी आपलंच होतं. पडदा दूर सारून बाई आंत आल्या. मी उभीच आहें हें पाहून त्यानी 'अग बैस ना! हें घर आहे शाळा नव्हे! आतां कांही मी तुझी बाई नाही" म्हणून मला बसायला सांगितलं, पण मी उभ्याउभ्याच बोलायला सुरवात करतेय असं पाहून त्यांनी माझं बोलणंच ऐकून घ्यायचं नाकारलं अखेर मी बसलें व आईचा निरोप सांगितला त्यांनी लगेच होकार दिला माझं काम झालं तशी मी जायला निघालें.

"जाशील ग! काय घाई आहे? अगोदर हें सांग, तूं इतकी घाबरली कां आहेस? मी काय वाघ बीघ आहे कीं काय?" बाई मला थांबवत विचारूं लागल्या

मी क्षणभर घोटाळलें पण लगेच म्हटलं "सांगू का? तुम्हीच नव्हतं का सांगितलं त्या दिवशीं कीं मला नाही आवडत मुली घरीं आलेल्या त्यामुळे मला जरा हेऽ वाटलं!"

"हं हं! तें होय; खरं आहे म्हणा तें पण कलाला मी मुद्दाम सांगितलं. कारण ती म्हणे मोठ्या बाईंची लाडकी आहे आणि एकदां ती कोणा बाईकडे जायला लागली कीं तिला कांही पांचपोंच राहत नाही असं मला समजलं. म्हणून मी सांगितलं तिला पण तुला माझ्याकडे यायला कांही हरकत नाही. येत जा कधी मधी." बाईंनी खुलासा केला.

त्यांचा निरोप घेऊन मी निघालें. शेवटची पायरी उतरतांना मी सहज मागे वळून पाहिलं. बाई माझ्याकडे पाहत दारांतच उभ्या होत्या. "पण तुला माझ्याकडे यायला कांही हरकत नाही" असं बाईंनी मला कां म्हणावं? आपल्याला त्यांच्याविषयीं जसं कांही तरी वाटतं तसं त्यांना आपल्याविषयीं वाटत असेल का? छे! पण तसं कसं शक्य आहे? त्यांना सर्वजणी सारख्याच आहेत असं त्यांनी पहिल्याच तासाला सांगितलं होतं! वर्गांतहि त्या मला इतर मुलीसारखंच वागवीत त्यांत काडीचाहि फरक नसे. नाही म्हणायला वर्गांत आल्यावर सर्व ठीक आहे हें पाहून माझ्याकडे पाहत अेक प्रसन्न हास्य करीत. पण तें हास्य व्यक्तिशः माझ्यासाठीं नसून माझ्या मॉनिटरपणाला आहे असेंच मला वाटे. मग? सहज म्हणाल्या असतील झालं! मी समजूत केली मनाची!

उद्याला आजचें व आजला कालचें स्वरूप देण्यांत काळ मग्न होता. पहिली सहामाही संपली होती. बाई-विषयीं मला वाटणारी पूज्यबुद्धि दिवसेंदिवस वाढतच होती माझ्या तपश्चर्येला फळ लागण्याची मुळीच आशा नसतांना मी तपस्या करीतच होतें मात्र माझ्या भावनांचा उल्लेख मी कोणाजवळहि केला नव्हता माझ्या गुरुदेवतेची कोणाला नकळत तिच्याहि नकळत निःशब्द पूजा करण्यांतच माझें सुख होतें. मला समाधान वाटत होतें.

बालक मंदिराच्या मदतीसाठीं आलेल्या चित्रपटाचीं तिकिटं शाळेंतील बहुतेक मुलींनी घेतलीं होतीं त्यांच्याकडून पैसे गोळा करून त्यांचा हिशेब माझ्या बाईंना देण्याची कामगिरी मोठ्या बाईंनी माझ्यावर सोपविली होती त्याप्रमाणे मी त्यांना हिशेब देण्यास गेलें. बाई लायब्ररींत होत्या. दुसरं कोणीच नव्हतं. मी त्यांच्याजवळ पैसे व हिशेबाचा कागद दिला. बाई जरा पलिकडे सरकल्या व त्यांनी त्यांच्याच बांकावर मला बसण्याची खूण केली स्वाभाविक संकोचाने मी उभीच राहिलें बाई डोळे मिचकावीत म्हणाल्या "मैं क्या आदमी हूँ जो मुझसे इतनी शरमा रही हो?" मी पटकन त्यांच्याजवळ बसलें. बाई हिशेब पाहूं लागल्या मी बाईंना डोळ्यांत सांठवूं लागलें आमच्या

वर्गांतल्या पन्नास मुलींत बाईंच्या इतक्या जवळ बसण्याचं भाग्य मला अेकटीला लाभलं होतं. हिशेब व्यवस्थित जमला मी उठणार इतक्यांत माझ्या कानांवर अमृताची वृष्टि झाली जणूं माझी देवता म्हणत होती, "आशा मी पहिल्याच तासाला तुमच्या वर्गांत सांगितलं होतं कीं कोणी माझं आवडतं नाही अन् नावडतं नाही पण... पण तुझ्याविषयीं मला काय वाटतं ते माझंच मला नीट समजत नाही." माझा विश्वास बसेना! हें खरं होतं का अेक गोड स्वप्न होतं? माझ्या पूजेची एका शद्बानेहि जाणीव करून न देतां माझ्या देवतेच्या लक्षांत ती आली होती काय? नक्कीच! मी पुढे ऐकू लागलें, ' तूं काय म्हणा आत्ता मॅट्रिक होशील अन् जाशील निघून. मग बाई कोण. ह्याची आठवणहि रहाणार नाही तुला. होय ना?"

माझं मन भरून आलं खूप खूप बोलावसं वाटलं मला. वाटलं आपण सांगावं, " बाई! ह्या जन्मीच काय पण जन्मोजन्मी तुम्हाला विसरणं शक्य नाही मी " पण मी प्रत्यक्ष कांहीच बोलूं शकलें नाही मी फक्त कृतज्ञतेने त्यांच्याकडे पाहिलं अन् नज़रेनेच त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडलें वाऱ्यावर तरंगणाऱ्या पिसासारखं हलकं हलकं वाटलं होतं मला. कोणाशींहि बोलण्याची इच्छा होत नव्हती मी अन् माझं मन! बस्स!

दुसऱ्याच दिवशीं बाईंनी कांही फोटो दाखवायला आणले. त्यांतला अेक मला फारच आवडला मी हळूच विचारलं, ' बाई हा फोटो उद्यां दिला तर चालेल?" परवानगी मिळतांच मला खूप आनंद झाला. शाळेंतून येतां येतांच मी ती बातमी निशेला आणि विजयाला–मैत्रीणीला–सांगितली त्याबरोबर त्यांनी जवळ जवळ ओढतच मला घरीं नेलं! विजया शेजारींच दप्तर फेकून परत आली आणि "दाखव, दाखव" म्हणून त्या दोघींनी ओरडा केला. पारिजातकाचं फूल जितक्या हळूवार हातानं उचलावं तितक्याच हळूवार हातानं मी फोटो बाहेर काढला. उजवीकडून निशानं आणि डावीकडून विजूनं अेकाच वेळीं झडप घातली आणि... काय होतंय हें कळण्यापूर्वीच फोटोचे दोन तुकडे झाले. डोळे विस्फारून मी पाहातच राहिलें! आणि मग फोटो फाटला हें लक्षांत येतांच मला रडं कोसळलें. मी फोटो आणतें काय, तो दाखविते काय आणि तो लगेच फाटतो काय? हें काय झालं? आता बाई नक्की रागावतील त्या म्हणतील " आशा म्हणजे अेक बावळट मुलगी आहे झालं. फोटो पण संभाळतां येत नाही तिला." कालच मी आनंदाच्या शिखरावर होतें. माझ्या दैवानं मला तिथं नेलं होतं पण कर्मानं अेकदम पाताळांत ढकललं मला! आपण फोटो तत्परतेने सांधून दिला तरी आपली आशाताई कां रडते आहे इतकी, हें बिचाऱ्या निशाला कुठून समजणार?

दुसरे दिवशीं शनिवार होता. सकाळची शाळा होती. शाळेंत जायला उत्साहच नव्हता मुळी. पण जाणं भाग होतं. पाळत ठेवून मी बाईंना प्रवेश द्वारापाशींच गाठलं. पण " बाई " ह्या शद्बापुढे कांही बोलतांच येईना मला. शेवटीं कसं तरी, कांही तरी, करून डोळ्यांतलं पाणी लपविण्याचा निष्फळ प्रयत्न करीत मी सगळी हकीकत सांगितली आणि शेवटीं, ' बाई माझ्यावर नाराज नका होऊं " म्हणून विनंती करून तडक वर्ग गांठला. सदा हंसरी अन् गडबडी आशा खुशाल रडतेय हें पाहून वर्गांतल्या मुलींना अचंबा वाटला पण मी कोणाच्याच प्रश्नाला उत्तर दिलं नाही प्रार्थनेची घंटा झाली. मी बसलेलीच पाहून मुली मला उठवायला लागल्या. ' मी नाहीं येत ग आज!" मी म्हटलं पण त्या थोड्याच अैकतात?

" वा ग वा! तूं नाही आलीस तर प्रार्थना कोण सुरूं करील? तुला यायलाच हवं " त्या माझी समजूत घालूं लागल्या आधीच मी चिडलें होतें स्वतःवर, त्यांत ही भर. माझा तोल सुटला " नाहीच येत जा मी आज! मी मेलें असतें तर काय केलं असतं तुम्ही?" मी फणफणत उद्गारलें मुलींनी काढता पाय घेतला.

मराठीचा तास सुरू झाला. मी पुस्तक काढणार तोंच " आशाताईला परभाबाई बोलावत्यात " म्हणून सखुबाई निरोप घेऊन आली. अेकदम धस्स झालं माझ्या छातींत! बाईंनी कशाला बोलावलं होतं तें उघडच होतं! बाईंचे रागाचे शद्ब झेलण्यासाठीं मनाचा दगड करीत मी शिक्षिकांच्या खोलीकडे निघालें. बाई एकट्याच होत्या. त्या कितपत रागावल्या आहेत हें पाहण्याची इच्छा असूनहि त्यांच्याकडे पाहण्याचं



धैर्य झालं नाही मला. मी खाली मान घालून उभी राहिलें. अखेर बाई म्हणाल्या, " काय ग आशा, आज प्रार्थनेला कां नाही आलीस? त्या फोटोचं इतकं लावून घेतलंस होय मनाला? मी तर अेका शद्बानेहि बोललें नाही तुला."

" बाई! तुम्ही बोलला असतां तर फार बरं झालं असतं जो फोटो तुम्ही इतका जपून ठेवलात तो कांही वेळहि मला नीट ठेवता आला नाही, इतकी नालायक आहें मी." मी हळूच म्हटलं.

" अग पण तो जुनाच तर होता. माझ्या हातून फाटला असता तर? अन् तुला काय वाटतं तुझ्या हातून फोटो फाटल्यामुळे तूं माझ्या मर्जीतून उतरशील म्हणून?" जी शंका कालपासून माझं मन भुंग्यासारखं पोखरीत होती, तीच बाईंनी विचारतांच मी अत्यंत आतुरतेने वर मान केली माझा सारा जीव कानांत गोळा झाला. " होय ना? माझी तुझ्यावर गैरमर्जी होईल असंच वाटलं ना तुला? वेडी कुठची. प्रेम मागून मिळत नसतं पण अेकदा दिलं कीं परतहि घेतां येत नाही. समजलं का? जा! आता जर का रडका चेहेरा ठेवशील तर मात्र मी रागावेन हं!"

माझ्या उरावरचं दडपण अेकदम नाहीसं झालं. कित्ती चांगल्या होत्या माझ्या बाई! मी परतलें, इतक्यांत बाई म्हणाल्या, " मराठीच्या बाईंनी कशाला बोलाविलं होतं म्हणून विचारलं तर काय सांगशील?" खरंच कीं! काय सांगूं? मी बाईकडे पाहिलं.

" म्हणावं वर्गासंबंधीं कांही सूचना द्यावयाच्या होत्या " मी आश्चर्यानें बाईकडे पाहातच राहिलें. अखेर मी विचारलंच! "बाई, खोटं बोलूं?" " हो! आज खोटं बोलणंच आपल्या दोघींच्याहि दृष्टीने ठीक आहे." बाई गंभीरतेने म्हणाल्या मी त्यांच्या आदेशानुसार परतलें.

आज खोटं बोलण्यांत काय फायदा असावा? मी जोरजोरानं विचार करूं लागलें. अन् मग माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला आपण बाईंच्या लाडक्या आहोंत हें इतरांना समजणं ठीक नव्हतं. इतरांना जर तें कळलं असतं तर त्याची प्रतिक्रिया आमच्या शाळेच्या चिमुकल्या जगांत फार जोरानं झाली असती कदाचित वैयक्तिक हेवेदावे सुरुं झाले असते बाईंच्या पहिल्या शद्बांवर कोणी विश्वास ठेवला नसता आपणा सर्वांना सोडून आशानं अेका परधर्मीय बाईंची पूजा करण्याइतकं महत्व त्यांना द्यावं, हें पाहून कांही हिंदुत्वनिष्ठ शिक्षिकांना ' कसंसच" वाटण्याचा संभव होता " प्रभाबाईंची लाडकी, म्हणूनच आशाचा पहिला नंबर आला" असं म्हणायला मुलींना जागा होणार होती. हें सगळं माझ्या बाईंना टाळायचं होतं. जगाच्या दृष्टीने मी बाईंची अेक सामान्य विद्यार्थिनीच रहाणार होतें. आमच्यांत हें जें नवं नातं निर्माण झालं होतं तें आमचं अेक गुपित होतं! आमच्या शाळेच्या जगांत तें कुणालाच कळणार नव्हतं!

आज ह्या गोष्टीला किती तरी काळ लोटला आहे. व अजूनहि अेखाद्या अमोल ठेव्याप्रमाणे मी त्याला जपत आहें आईला, वडिलांना, लाडक्या भावाला इतकंच काय जिवश्च कंठश्च मैत्रिणीलाहि मी त्याची दाद लागू दिली नाही नाही! मी कोणालाच सांगणार नाही! आमचं दोघींचं अेक गोड गोड गुपित आहे तें!

---

★ सुप्रसिद्ध विनोदी लेखक मार्क ट्वेनच्या वाढदिवशीं एका वाचकाने त्यांना अभिनंदनपर पत्र लिहिलें. परंतु दुर्दैव असें कीं मार्क ट्वेनचा पत्ता त्याला माहीत नव्हता. म्हणून त्याने पत्ता लिहिला होता. "श्रीयुत मार्क ट्वेन, पत्ता माहीत नाही, परमेश्वर करो नि हें पत्र त्यांना मिळो."

कांही दिवसांनी वरील वाचकास मार्क ट्वेनचें पत्र आलें. त्या पत्रांत फक्त एवढेंच लिहिलें होतें—" परमेश्वराने कृपा केली."

— मार्क ट्वेन.

# =: सोळावा प्रेमभंग :=

[ लेखक :— पी. वसंत प्रथम वर्ष, विज्ञान. ]

" ठण्... ठण्... " घड्याळांत सहाचे ठोके पडतात न पडतात तोंच सारे होस्टेल साईबाबांच्या भजनाने जागे झालें. प्रत्येकाला प्रश्न पडला कॉलेजच्या होस्टेलमध्यें एखादे हिंदी सिनेमांतील किंवा लता मंगेशकरचें भावगीत म्हणण्याऐवजी साईबाबाचें भजन करण्याची हुक्की येणारा महाभाग कोण? सर्व विद्यार्थी आवाजाच्या दिशेने धावले. तों काय! बन्या गोखलेच्या खोलींतून भजन ऐकूं येत होतें. प्रत्येकाने आश्चर्याने तोंडात बोट घातलें. बन्यासारख्या नास्तिकाला साई-बाबाचें भजन करण्याची लहर यावी हें खरोखर आश्चर्यच होतें.

शेवटीं एका विद्यार्थ्याने धीर धरून आंत डोकावलें. त्या बरोबर तो विंचू डसल्याप्रमाणे मागे सरकला. त्याचा डोळ्यावर विश्वासच बसेना त्याने आपले डोळे चोळले व पुन्हा एकदा डोकावून पाहिलें. बन्या चक्र मांडी घालून साईबाबाच्या तसबिरीपुढे हात जोडून बसला होता आणि तोंडाने आपल्या भसाड्या आवाजांत त्याचें भजन चाललें होतें.

बन्याच्या या मधुर (?) भजनाने त्याचा पार्टनर मधु कडुलिंबे, क्रिकेटपटू व कॉलेजचा लाईफ मेंबर, खडबडून जागा झाला. बन्याचा तो अवतार पहाताच तो तर गार झाला स्वतःला चिमटे घेऊन शुद्धींत असल्याची त्याने खात्री करून घेतली आणि जवळ जवळ ओरडलाच. " बन्या लेका हे काय चालवलं आहेस? या तुझ्या मधुर भजनाने माझी तर साखर-झोप मोडलीच पण प्रत्यक्ष साईबाबासुद्धा आपल्या समाधींतून खडबडून जागे होतील. शुद्धींत आहेस ना? ही खोली तुला साईबाबाचा मठ वाटला कीं काय? हें तरुणांचें होस्टेल आहे म्हाताऱ्यांचा निवृत्तिनिवास नाही. जरा बाहेर बघ. सगळे विद्यार्थी गोळा झाले आहेत. मला वाटतं तुझ्यावर कोणीतरी जादूटोणा केला असावा. "

" मध्या, असा कुत्र्यासारखा माझ्यावर वसकन अंगावर येऊं नकोस. कोणी माझ्यावर जादूटोणा केला नाही कीं कांही नाही. मी पूर्णपणे शुद्धीवर आहे. आजपासून संन्यास घ्यायचा निश्चय केला आहे. मी या साईबाबापुढे प्रतिज्ञा करतों कीं आजपासून प्रत्येक स्त्रीला माता मानेन व आजन्म ब्रह्मचारी राहीन. अरे! ये दुनिया सब झूठ आहे, माया आहे. संसार हा मृगजळ आहे. एकदा का तुम्ही त्यांत फसला कीं चिखलांत रुतलेल्या गाईप्रमाणेच तुमची गत होणार. ' ब्रह्म सत्यं जगमिथ्या ' असं काल प्रत्यक्ष साईबाबांनी स्वप्नांत येऊन मला सांगितलं. संसार हा गुलाबाप्रमाणे..."

" म्हणजे गुलाब साठे प्रमाणेच ना? " मध्याने मधेच विचारलें.

" अंहं. गुलाबाच्या फुलाप्रमाणे आहे. लांबून दिसायला सुंदर, आल्हदकारक पण जवळ गेला कीं मग कांट्याचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही.

" पण महाराजा, कालपर्यंत हें ज्ञान कुठे दडी मारुन बसलं होतं. " मधूने त्याला मध्येच अडवीत विचारलें,

" मधु, ती फार मोठी कहाणी आहे. ऐकणार असशील तर सांगतों. " व बन्या दार उघडण्यास पुढे गेला. विद्यार्थी आश्चर्यचकित मुद्रा करीतच खोलींत शिरले. कारण खोलीच्या दारावर " श्री साईबाबा प्रसन्न " हे वाक्य व साईबाबांचा फोटो असलेली अंगठी, गळ्यांत साईबाबांचा ताईत, व भिंतीला त्यांचाच मोठा फोटो या सर्व गोष्टी त्यांना बन्याच्या बाबतींत तरी आश्चर्यचकित करणाऱ्या होत्या. कारण कालच खोलींत राजकपूर, नरगीस इ. प्रिय नटनट्यांचे फोटो त्यांनी पाहिले होते. ते सगळे जाऊन त्याजागीं आज साईबाबांची स्थापना झाली होती. हें परिवर्तन सर्वांनाच धक्का देणारें होतें.



" या... या... मित्रांनो, माझ्या या कहाणीमुळे तुम्हांला तरी सत्याचा व ज्ञानाचा मार्ग सापडो " बन्या गंभीर चेहऱ्याने त्यांचें स्वागत करीत म्हणाला बन्या कांही तरी नवीन किंवा विचित्र ऐकवणार अशी प्रत्येकाची खात्री होती. आणि म्हणून प्रत्येकाने खोलींत प्रवेश करून आसन ठोकलें.

कारण कॉलेजांत बन्या एक विक्षिप्त वल्ली म्हणून प्रसिद्ध होता. तो केव्हा काय करेल याचा नेमच नसे

एकदा त्याने रात्रीच्या वेळीं गुपचुप जाऊन पाण्याच्या टाकीचा नळ सोडून दिला. रात्रभरांत सगळी टाकी कोरडी खणखणीत. सकाळीं हा गोंधळ झाला म्हणता मुलांना तोंड धुण्याला पाणी नाही. अशी फजिती त्याने होस्टेलच्या मुलांची केली. कारण काय तर होस्टेलच्या मुलांनी कॉलेजच्या इलेक्शनमध्ये त्याला मतें दिलीं नसल्यामुळे तो पडला होता.

एकदा तर त्याने कमालच केली. रात्रीं चारच्या दरम्यान उठला. त्यावेळीं आमचे संडास वरून उघडे असत. तेव्हा बन्याने आंतून सर्व संडासांना कड्या लावून टाकल्या. शेवटीं एक संडास राहिला. त्याचे दार कांही उघडेना. म्हणून तो वरून आंत उतरला त्याने आंत उडी टाकली. तो काय! आंत कोणी तरी गेलेले. आता बन्याला ही कल्पना नव्हती. पण तो त्याचाच पार्टनर असल्यामुळे प्रकरण तेथेंच मिटलें. सकाळीं हा हलकल्लोळ माजला कीं ज्याचं नांव तें. एकेकाची स्थिति बघून इतरांची हंसता हंसता पुरेवाट झाली. ( अर्थात प्रत्येकावर पाळी आली होती. ) आम्ही चहा साखरेकरतां लिप्टनचे टिनचे डबे वापरीत असूं. अर्थात सर्वांचे सारख्या रंगाचे डबे असत. याचा बन्या मोठा हुशारीने फायदा घेत असे दुसऱ्याचा भरलेला डबा लंपास करून त्याजागीं रिकामा डबा ठेवायचा. तेव्हा बन्याकडे वांकड्या नजरेने पाहण्याची कुणाची छाती नसे. सर्व विद्यार्थी सभोंवताली आसनस्थ झालेले पाहून बन्यानें आपल्या कर्मकहाणीला आरंभ केला. " मित्रांनो सहामहिन्या-पूर्वीची गोष्ट. कॉलेज सुरूं होऊन चार पांच दिवस झाले असतील. मी व मधु कॉमन रूमकडे जात होतों. तोंच ती एक अप्सरा आमच्या दृष्टीस पडली. ( तिचें नांव सुधा साठे हें आम्हांला मागाहून कळलें ) मी तर तिच्या सौंदर्याने वेडा झालों. तिची ती बांधेसूद देहयष्टि ते तिचे गुलाबी टपोरे गाल, हृदयाचा वेध घेणारीं नेत्रकमलें लांब शेपटा, त्यांत खोवलेलें रुइचें नाही गुलाबाचें फूल, ती चालण्याची ढब, मध्येच लहान मुलाप्रमाणे तोंडांत बोट घालायची संवय...... तुम्हाला जास्त सांगायची कांही गरज नाही तुम्ही सर्वांनी तिला पाहिलंच आहे. मधु मला कोपराने ढोसीत म्हणाला, " बन्या असा टक लावून काय पहातोस? दृष्ट लागेल कीं. अन् दसऱ्याच्या मुहूर्तावर मुलीच्या प्रेमांत न पडण्याची प्रतिज्ञा विसरलास का? " मी त्यावेळीं त्याला म्हटलें, " अशा छपन्न प्रतिज्ञा या अप्सरेवरून ओवाळून टाकीन " नंतर माझा एकच उद्योग सुरू झाला. ती कोणत्या वर्गांत आहे? तिचे नांव काय? ती राहते कुठे? तिचे वडील काय करतात? तिला कसली आवड आहे याची यादी मी मिळविली. आणि त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करूं लागलों. उदाहरणार्थ तिला क्रिकेट खेळ फार आवडत असे. लगेच मी क्रिकेटच्या टीममध्ये नांव दाखल केलें सुधाला नाटकें आवडतात हें कळतांच मीं नाटकें वाचण्यास सुरुवात केली. अशारीतीने मी तिच्यांत व माझ्या आवडीनिवडींत साम्य आणण्याचा प्रयत्न ( निष्फळ ) करूं लागलों. मला तिच्यामुळे जेवण खाण सुचेना. मनांत एकसारखा हाच ध्यास. सुधा साठेला प्रसन्न कशी करावयाची! हळूहळू पुस्तकें अगर नोटस् मागण्याच्या निमित्ताने तिच्याशीं ओळखहि करून घेतली. इथपर्यंत तर गाडी येऊन थडकली.

पांचची वेळ. सुधा आपली छत्री व पर्स संभाळीत उगीचच मधुन मधुन पदर सारखा करीत, लगबगीने कॉलेजच्या दारांतून बाहेर पडत होती. ही संधि साधून मी तिला सामोरा गलों.

" नमस्ते मिस साठे. कुठे निघालात? तुम्हाला वेळ असेल तर मला तुमच्याशीं बोलायचं आहे. "

" मग सांगा कीं, मी ऐकायला तयार आहें.

" तसं नाही. आपण समोरच्या कॉलेज रेस्टारंट-मध्ये गेलों तर मोकळ्या मनाने बोलतां येईल. "

' कांही हरकत नाही. "

आम्ही कॉलेजच्या रेस्टारंटमध्ये शिरत होतों. तेव्हा मीं सहज मागे पाहिलें. तो कांही मुलें हंसून 'आहे ब्बुवा' म्हणत माझें अभिनंदन करीत होतीं. आणि मुली मत्सराच्या अग्नींत जळून निघत होत्या.

चहा घेत असतांना मीच बोलण्यास सुरवात केली.

"त्याचं असं झालं. आज चित्रा टॉकीजमध्ये "श्यामची आई" हा चित्रपट लागला आहे तेव्हा मीं दोन तिकीटें काढलीं. माझ्या बहिणीचें डोकें दुखत असल्यामुळे ती येत नाही. तेव्हा तुम्ही याल का? अर्थात आपली इच्छा असली तर"

"अहो मीं सुद्धा तिकीट काढायला माझा नोकर पाठवला होता. पण तिकीटेंच संपल्याचें कळलें बरं, झालं तुम्ही विचारलं. तुम्ही सहा वाजतां चित्रा टॉकीजवर या. मी सुद्धा तेथे येतेंच. अच्छा मी जातें. मला तास आहे आतां चहा बद्दल थँक्स हं! व ती एक दिलखेचक कटाक्ष माझ्याकडे टाकून निघून गेली. माझी तर पाऊलें जमिनीवर टिकेनात. अहो अजून कोणती पाहिजे प्रेमाची खूण?

अशारीतीने एकत्र सिनेमाला जाणें, फिरायला जाणें, मधूनच पिकनिक करता आसपास जाणें सुरू झालें. अर्थात् पैशाची चाट माझ्या खिशाला लागत होती. पण भावी सुखाच्या आशेने सर्व सहन करणें भाग होतें. पण पोरगी मात्र महा धूर्त व बिलंदर हं! तिने मला शेवटपर्यंत ताकाला तूर लागूं दिला नाही किंवा कधी वाचवीपेक्षा जवळ येऊं दिले नाही. अनेक प्रयत्न केले पण कांही उपयोग झाला नाही. अशावेळी ती सीता, सावित्री, द्रौपदी या स्त्रियांच्या शीलासंबंधी व पातिव्रत्यासंबंधी व्याख्यान ऐकवत असे वर म्हणत असे "मनाने आपण दोघं एक आहोंच बाबांची परवानगी मिळाली कीं लग्नाचा बार उडवून देऊं. मग कायमचीच तुमची होईन" व असा कांही मदनबाण सोडी कीं भक्ष्य घायाळच होत असे.

दहाची वेळ. मी धांवतच खोलीकडे गेलों. खोलींत मधु पुस्तक वाचीत पडला होता.

'मधु आज आपलं काम करायचं. त्याचं असं आहे. सुधाने हिऱ्याच्या कुड्यांचा हट्ट धरला आहे. तेव्हा.."

"तेव्हा त्या करतां पैसे पाहिजे असतील. माझ्याकडे दिडकी नाही." "कां खोटं बोलतोस? कालच तुला दीडशें रुपयांची मनीऑर्डर आली आहे"

"म्हणजे तूं आमच्यावर डिटेक्टिव्ह सारखं लक्षच ठेवतोस कीं काय? तुला स्पष्ट सांगतों कीं त्यांतली एक दिडकी मिळणार नाही तुला"

"मध्या अडचणीच्या वेळीं मित्राला मदत करायची नाही तर केव्हा? अगदी देवाची शपथ घेऊन सांगतों की त्यांतली पैन् पै परत करीन"

"म्हणे पैन् पै परत करीन. त्या नीला नाडकर्णीला पार्कर पेन घेऊन दिलें त्याचे पैसे तसेंच नंदा फाटकेला टी सेट भेट दिला त्याचे पैसे, यांतली दिडकी तरी परत केलीस का"?

'मला तूं जर दूर लोटलंस तर मी काय करूं कुठे जाऊं?

"मसणांत जा" मध्या म्हणाला.

त्याबरोबर माझ्या डोळ्यांतून गंगा यमुना (खोट्या) सुरू झाल्या. त्याबरोबर मधुकरराव विरघळले. व त्यांनी दीडशें रुपये माझ्या हवाली केले. मी अत्यानंदाने त्याला मिठी मारली. त्यावर तो हंसून म्हणाला "अरे! मी कांही सुधा नाही मिठी मारायला" पैसे घेऊन मी धांवतच बाहेर पडलों

नंतर चारपांच दिवसाची गोष्ट. दुपारची वेळ. मी सेव्हन ओ क्लॉकच्या ब्लेडने दाढी करत होतों दाढीनंतर आंघोळ आंघोळीकरतां सिंथॉल साबु व दांत घासण्याकरितां 'बिनाका' टुथपेस्ट वापरायची हें माझं ठरलेलं असे. नंतर सनलाईट साबणाने धुतलेले परीट घडीचे कपडे घालणें. त्यानंतर बाटाचे बूट पायांत चढवणें. व सुधाला भेटण्याकरितां बंडगार्डन जाणें. असा मला मोठा कार्यक्रम ठरलेला होता. तोंच एक मनुष्य मला लग्नपत्रिका देऊन गेला ती लग्नपत्रिका नव्हती तर माझ्या आयुष्याला लागलेला सुरुंग होता. म्हणजे आपल्या लक्षांत आलें असेल कीं ती सुधा साठेच्या लग्नाची पत्रिका होती. माझ्या दुःखावर डागण्या देण्याकरितां तिने ती पत्रिका मला पाठवली होती. पण आता काय उपयोग. "जब चिडिया चुग गअी खेत" कपाळाला हात मारून नशिबाला दोष दिला. दुसरं काय करू शकणार होतों मी?



लग्न झाल्यावर तिने मला मुद्दामहून चहाला बोलावलें. आपल्या संसाराचें प्रदर्शन करून माझ्या जखमेवर मीठ चोळायचें होतें तिला दुसरें काय? चहा घेतल्यावर ती सहज आंत गेली मी भोंवताळी पहातों तों काय! समोरच्या कपाटावर नीला नाडकर्णीला भेट दिलेलें पेन दिसलें. तोंच माझें लक्ष समोरच्या टेबलावर गेलें. नंदा फाटकेला दिलेला टी सेट माझ्याकडे जणू उपहासाने पाहत असलेला मला आढळला. तरीच म्हटलं मी नांव टाकत असतां कां त्या मुलींनी अडथळा केला. "पण मी जाता जाता हळूच तें पार्कर पेन लांब वेलेंच. मित्रांनो माझा हा सोळावा प्रेमभंग. काल अचानक साईबाबांचा साक्षात्कार झाला. आता संन्यास! प्रेमबीम सारे बंद!

'पण बन्या, सुधा साठेने तुझ्याकडून हिऱ्याच्या कुड्या लाटल्याच." गंपू जरदाळे मध्येच म्हणाला.

'अरे! ती एक ठग तर मी महाठग. खऱ्या कुड्यांची किंमत आहे सातशें ते नऊशें रुपये. मी दिलेल्या कुड्या फक्त पन्नास रुपयांच्या होत्या कारण त्या नकली होत्या." त्याबरोबर सर्व खोलींत जोरांत हंशा पिकला.

"मग काय मित्रांनो, माझे हे अनुभवाचे बोल ऐकूनही प्रेमाच्या भानगडींत पडणार का?"

त्याबरोबर हळूहळू एक एक जण बाहेर सटकूं लागला त्यावर बन्या येशू ख्रिस्ताप्रमाणे मुद्रा करीत म्हणाला. "साईबाबा यांना तूं क्षमा कर. आपण काय करीत आहों हें त्यांना कळत नाही."

---

# स्नेहरीत

आकाशांगणीं लीलया विचरतां पूर्णेंदुतें पाहुनी
होई हर्षित सिंधु धांवत निघे भेटावया इन्दुला
दावी इन्दु परी तिरस्कृति तदा, दृष्टीहि ने बाजुला
होई सागर खिन्न, ये निजस्थळी, दृष्टी विधू लागुनी
पाही इन्दु मुदे धरेप्रत, रमे भूसंग आराधनीं
दावी ती शशितें तिरस्कृति परी, निस्तेज हा चंद्रमा
सूर्याचें अवनीस वेड, परि ना भानूस त्याची तमा
तो हासे न धरेस पाहुनि, परी पृथ्वी रवी-चिंतनीं
चंद्रार्थें उदधी, धरेस्तव विधू, सूर्याप्रती मेदिनी
अन्यार्थेंच रवी, असे सकल हे अद्यापि व्याकूळती
ज्यांची मोहिनि ना मनास लव, ते प्रेमादरे वाहती
ज्यांची मोहिनि, ते दुज्यांस बघती घालावया मोहिनी
ज्यांचा स्नेह नकोच, भेटति इथे ते नित्य, त्यां टाळणें
ज्यांचा स्नेह हवा, न भेटति कधी ते, नित्य व्याकूळणें

कविः— वामन बोंडे
चतुर्थवर्ष-कलाविभाग.

# थोडं अधिक रुसा

कु. शकुंतला खावे तृतीय वर्ष-कला

"अग काय हें रुसणं आहे कीं काय आहे? केव्हाची रुसून बसलीस तूं इथं?" माझ्या काकांनी माडीवरच्या खोलींत येऊन माझी चौकशी केली. परंतु आमचे काका कोणाचंही रुसणं काढण्याच्या बाबतींत किती रसिक आहेत हें मला माहीत होतं! त्यांचं रुसणं काढणं म्हणजे रुसलेल्या व्यक्तीला अुपदेशामृताच्या माऱ्याने बेजार करणंच होय! त्यामुळे सरळपणे मी खाली पळ काढण्याच्या बेतांत होतें. पण मला काखोटीला धरून म्हणतात कसें, "रुसणं हा एकप्रकारचा दुबळेपणा आहे बरं ताईसाहेब!"

झालं! त्यांच्यापुढे बोलायची तर सोयच नव्हती!! परंतु रुसणें ह्या एका मानवी भावनेला त्यांनी दुबळे म्हणावें म्हणजे काय? आणि म्हणे केव्हाची रुसून बसलीस! रुसून बसतात तें काय घड्याळ लावून वाटतं? असल्या लोकांचं सगळंच काम यांत्रिक! पण मी म्हणतें आयुष्यांत आजपर्यंत न रुसलेला माणूस आपणांला शोधूनही सांपडेल काय? जर असा कुणी निघाला तर त्याला मी दुर्दैवीच म्हणेन. खरोखरीच रुसणं ही एक स्वाभाविक मानवी भावना आहे. रुसणं हा दुबळेपणा नसून मानवी मनांतली दुसऱ्यावर हक्क गाजवून घेण्याची एकप्रकारची इच्छाच होय. आणि आपण रुसतों तरी कुणावर? आपल्या प्रिय व्यक्तींवरच ना? मग त्यांत दुबळेपणाचा आणि कणखरपणाचा प्रश्न येतोच कुठे? उलट ज्या ज्या वेळी आपला रुसवा काढण्याला कुणीतरी निश्चित येणार अशी आपल्याला खात्री असते त्यावेळींच आपण रुसतों. नाहीतर रुसण्याचें पर्यवसान रडण्यांत -नाही तर-संतापण्यांत होतें पुष्कळदां अबोला हा शद्बही रुसणें ह्या अर्थी वापरला जातो. परंतु ह्या दोन शद्बांत सुरवंट आणि फुलपांखरू ह्यांच्या इतकाच फरक आहे रुसण्यांत एकप्रकारचा लाडिकपणा, एकप्रकारची माधुरी, आणि विविधता तरी किती असते? ती अबोल्यांत नसते. एका वाक्यांत सांगायचें म्हणजे रुसण्यांत अबोला नसतो तर अबोला होण्याची भीतिच असते. आपण एखाद्या व्यक्तीशीं अबोला धरतों, त्याला कांही तरी सबळ कारण लागतें. पण रुसण्याला कांहीच सबळ कारण लागत नाही. कोणी असं म्हणतात कीं रुसणं हा एक पोरकटपणाच आहे. पण ह्या जगांत लहानापासून थोरापर्यंत सगळीं माणसं एकांतांत म्हणा अगर कुठेही म्हणा रुसतातच ना? आणि मग सगळींच्या सगळींच माणसं स्वतःला पोरकट म्हणवून घ्यायला तयार असलीं तर माझी कांही ना नाहीं. पण मला म्हणायचं आहे तें हें कीं रुसण्यांतही एकप्रकारचें सुख असतें. एवढेंच नव्हे तर पुष्कळदां रुसण्याने सुखाची उत्कटता अधिक काळ टिकून रहाते. त्यामुळे प्रत्येकाने रुसलं पाहिजे एवढं म्हणूनच मी थांबत नाहीं तर आपण जाणूनबुजून अधिक रुसलं पाहिजे

रुसण्याचा तो प्रसंगच मोठा मजेशीर असतो. त्यांत दुःख असतें पण डोळ्यांतून अश्रू पडण्याइतकें दुःख नसतें. किंबहुना तो एक दुःखाचा भासच आपणांस होत असतो आणि विशेष म्हणजे हा भास आहे हें आपणांस कळत असूनहि आपण जाणूनबुजून का गावखोरपणा करीत असतो. जगांतला प्रत्येक माणूस हा एक रंगभूमीवर काम करणारा नटच आहे ह्या म्हणण्याचा एक गोड पडताळा आपणांस पहावयाचा असेल तर स्वतःच्या रुसण्याचा प्रसंग आपण आठवावा त्या वेळेस आपण केलेला नाटकीपणा खरोखरीच तो आपणच केला का? असा प्रश्न पडल्यावांचून रहावयाचा नाहीं. परंतु पुष्कळदां आपण रुसतों तें वेळप्रसंग पाहून रुसत नाहीं व त्यामुळे आपल्या रुसण्याची मात्रा कांही चालत नाही आणि मग जेवायची अगर चहाची वेळ होईपर्यंत आपण रुसलोंय हें कुणाच्या लक्षातही येत नाही माझी एक मावशी ह्या बाबतींत मोठी चतुर आहे. ती रुसते. पण आपल्या रुसण्याची तात्काळ



दाद लावून घेते. असं दोन दोन तास कुणाच्याहि लक्षांत न येण्याजोगं ती कधीच रुसून बसत नाही. मीं ह्या बाबतींत तिला विचारलं असतां ती म्हणते कशी "अग रुसण्या रुसण्यांत देखील फरक आहे बरं! कांही माणसं रुसलीत म्हणजे आपल्याशींच पुटपुटत बसतात तर कांही अजिबात बोलत नाहीत तर दुसरी स्वतःच्या स्वतःला तरी वाइट साईट बोलून घेतात अगर दुसऱ्याला तरी असें तोडून बोलतात. पण त्या तीनही सर्वसामान्य प्रकारांतल्या रुसण्यांतल्या थोड्या थोड्या भागाचा उपयोग केला तर जें रुसणं होतं तें खरं रुसणं! त्याला म्हणायचं ideal रुसणं! रुसलं म्हणजे बोलावं पण थोडं दुसऱ्याला ऐकूं जाईल असं बोलावं, आणि दुसऱ्याला वाईट साईट बोलण्यापेक्षा स्वतःला वाईट बोल लावून घ्यावेत, म्हणजे पहा मग तें रुसणं कसं रंगतं तें! रुसणं ही देखील एक कला आहे बरं!" "हो, पण मग असल्या रुसण्यांत कृत्रिमता नाही का येत?" मीं तिला विचारलं "अग पण त्या थोड्याशा कृत्रिमतेनेच रुसण्याची गोडी अधिक वाढते." रुसण्याची शास्त्रशुद्ध माहिती सांगणाऱ्या, व रुसणं ही एक कला आहे असं मोठ्या ऐटीने सांगणाऱ्या तिच्याकडे मी पाहतच राहिलें

परंतु मला पुष्कळदां इतकें आश्चर्य वाटतें कीं असलें रुसण्याचे प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यांत कित्येकदा घडत असतांना आपल्या एकाहि संस्कृत कवीला ते रंगविण्याची बुद्धि होऊं नये अं! ते त्यांनी कां रंगविले नाहीत ह्याची कारणमीमांसा मला येथे करायची नाही. पण ते त्यांनी रंगविले नाहीत एवढें मात्र खरें. पुष्कळदां अशी मोक्याची वेळ येते कीं ह्या कवींनी जर त्यावेळीं असला एकादा प्रसंग दाखविला असता तर खरोखरीच त्या त्या प्रसंगांना मोठी गोड कलाटणी मिळाली असती ह्यांत शंका नाही. उदा० आपण कुमारसंभव घेऊं या. ह्यांत ५ व्या सर्गाच्या शेवटीं पार्वती शंकराला प्रसन्न करून घेते असें दाखविलें आहे. शंकर तिच्यापुढे उभा राहतो व म्हणतो, 'हे चारुगात्री तूं आपल्या तपोबलाने मला विकतच घेतलें आहेस. मी आजपासून तुझा दासच आहें असें तूं समज. परंतु पार्वती ह्यावर कांहीच उत्तर देत नाही तर आपली इच्छित गोष्ट प्राप्त झाल्यामुळे तिच्या कष्टाचें चीज झालें, ती खूप आनंदित झाली असें आपल्या अर्थांतरन्यासाने (क्लेशं फलेन हि पुनर्नवतां विधत्ते) दाखविलें आहे. मला वाटतं शंकराने असे म्हटल्यानंतर पार्वतीने थोडे तरी रुसायला हवे होतें. पार्वतीचें तपश्चर्या करीत असतांनाचें वर्णन नसतें आणि रुसण्याचा भाग जर कालिदासाने आणला असता तर तो प्रसंग अमर ठरला असता अशी माझी खात्री आहे. जो माणूस आतांपर्यंत तिला केवळ दुष्प्राप्य होता तो 'मी आतां केवळ तुझ्या पायाचा दास आहें' असें म्हणत असतांना त्याच्यावर रुसूं नये तर कुणावर? खरोखरीच पार्वती जर शंकरावर रुसली असती तर त्या प्रसंगाची गोडी आणखी कांही काळ तितकीच उत्कट राहिली असती ह्यांत शंका नाही. आणि रुसायला कारण तरी काय घ्यायचें? जें सुचेल तें कारण घ्यायचें. शंकर आपल्या सौंदर्यावर प्रसन्न न होता आपल्या तपश्चर्येवर प्रसन्न झाला नाही का? मग रुसायचें. कोणतेंहि क्षुल्लक कारण घेऊन ती रुसलेली कालिदासाने जर दाखविली असती तर मोठी बहार आली असती. पण हा अद्वितीय भोळा शंकर हिचें तें रुसणें कोणत्या मोठ्या रसिकतेने काढणार ह्याविषयीं कालिदासाला शंका आली असावी आणि त्याचा हिरमोड झाला असावा. हो! कारण रुसणं ही जरी एक कला असली तरी रुसणं मोठ्या रसिकतेने काढणं ही सुद्धा एक कलाच आहे फुलाला पानांची पार्श्वभूमि असेल तर तें अधिक खुलून दिसेल! तसेंच रुसण्याचें!

रुसणं ही एक कला आहे ही गोष्ट मला अगदी पटते. थोडासा चाणाक्षपणा, थोडीशी चतुराई असली कीं असलें कलापूर्ण रुसणें कुणाच्याहि साधेल. आणि असल्या रुसण्याने तर सुखाची गोडी अधिक वाढते. रुसणारा आणि रुसवा काढणारा दोघेहि शेवटीं प्रसन्न होतात आणि ज्याचा शेवट कमी अधिक प्रमाणांत का होईना पण गोडच होणार हें अगदीं ठरलेलं असतांना आपण कां बरं असल्या काव्यमय प्रसंगांत अधिक काळ राहूं नये?

# भैय्या जयकरण !

[ ले. राजा महाजन F. Y. Arts ]

★

" कितने सोते हो आप मास्टरसाऽऽहब ! " ती बारीक आवाजांतील जयकरणाची ललकारी ऐकून मी ताड्कन् अंगावरील रग बाजूला फेकला. अन् एखाद्या यंत्राप्रमाणे उठून अंथरुणांत डोळे चोळीत बसलों. पुस्तकाला रजा देऊन मधून मधून स्वैंपाकघरांत डोकावून पाहाणाऱ्या खट्याळ अन् लबाड बालकाप्रमाणे उगवत्या सूर्याचे सोनेरी किरण खिडकींतून आत डोकावत होते मीं घड्याळाकडे दृष्टि वळविली. सात वाजायला फक्त पांचच मिनिटें कमी होतीं. झटपट मी उठलोंच. माकड छाप काळ्या दंतमंजनाची बाटली व टॉवेल घेत नळाकडे धांव घेतली.

मुखमार्जन आटोपून खोलींत प्रवेश केला. जयकरणचें देखील काम संपतच आलेलें दिसत होतें सामान व्यवस्थित लावून त्याने खोली झाडून पुसून अगदी साफ केली होती माठांत पाण्याने भरलेली बादली ओतीत असतां माझी चाहूल लागतांच त्याने किंचित मागे वळून बघितले तोंच काय ! पाणी माठांत न पडतां बरेंच खाली सांडलें गेलें मग काय विचारतां स्वारीची तारांबळ ! सांडलेलें पाणी निपटून झाल्यावर कुठे स्वारीच्या जीवांत जीव आला. मी नुसतें स्मित केलें.

" जयकरणऽऽ " मी उद्गारलों.

" बोलो मास्टरजी " असें म्हणत व आपल्या धोतराच्या सोग्याला हात पुशीत पुशीत तो माझ्या पुढील हुकुमाची वाट पहात मागे येऊन उभा राहिला.

" मद्रासीबाबूंच्या श्रीकृष्ण–विजय हॉटेलांत — "

" एक इस्पेशल चाय कहूँ, यही ना ? " मला मध्येच थांबवीत त्याने अपूर्ण वाक्य पूर्ण केलें.

" शाबास, शाबास. " असें म्हणत मी त्याच्या पाठीवर हलकेच थाप मारली.

" लेकिन मास्टर, अपना सरदारजी पैसेकी चार चार बिडी देता है. "

त्याच्या चेहऱ्यावरील तो भाव, वाकडी केलेली मान अन् बोलण्यांतील सूचकता पाहून मला किंचित हसूं आलें. अन् लगेच दोन पैसे त्याच्या हातावर मी ठेविले.

" चहांत साखर जास्त घालायला सांग बरं कां ? "-मी म्हटलें पण इतकें पुढचें ऐकायला जयकरणाचा पत्ता कोठे होता ! स्वारी जिन्याच्या पायऱ्या धड्धड् उतरीत रस्त्याला पण लागली होती.

× × × ×

मुंबई म्हणजे जगांतील लोकांचें प्रदर्शनच आहे. विविध रंगांचें, विविध पोषाख करणारे. भिन्न भिन्न भाषा बोलणारे अन् भिन्न भिन्न चालिरीति अनुसरणारे असंख्य लोक कुणी कीडामुंगीप्रमाणे तर कुणी डोमकावळ्या- प्रमाणे या मुंबापुरीच्या परिसरांत वावरत असतात. सायंकाळी चौपाटीवरील आपल्या ' मोतीमहलांत ' कांही मूठभर लोक समुद्रावरून येणाऱ्या गार वाऱ्याची मजा लुटत असतात तर परळ वरळीच्या कुंदट अंधारी कोठडीमय चाळींत असंख्य जीवांची सारखी तगमग होत असते मलबारहिलवरील आपल्या प्रशस्त दिवाण- खान्यांत कुणी प्रातःकालचीं गोड स्वप्नें पहात असतात तर फुटपाथचा आश्रय करून पडलेले लाखो निराधार भगवंताची दया भाकीत भाकीत इकडच्या कुशीवरून तिकडच्या कुशीवर होत असतात.

भारताच्या कानाकोपऱ्यांतून मुठीएवढ्या पोटाची खळगी भरण्याकरिता आलेल्या लाखो जीवांपैकी जय- करण हा एक ! उत्तर प्रदेशचा भैय्या तो ! दोन बिघे शेतीचा तुकडा अन् दहा तोंडें खाणारीं ! कसें शक्य



होतें आपल्या कुटुंबियांचें पोषण करणें जयकरणला ! पाठच्या भावावर सर्व घरदार सोंपवून तो मुंबईंत आला होता. इतर भैय्याप्रमाणे त्यानेंहि हमालीचा धंदा पत्करला होता. तिशीला तीन वर्षं कमी होती त्याच्या वयाला. मेघदूतांतील यक्षाप्रमाणे त्याचा देह म्हणजे केवळ हाडांचा पिंजरा होता पिंजरा ! उंची असेल साधारण पांच फुटाच्या आंत. डोक्यावर नारदाच्या शेंडीसारखी शेंडी. अन् त्याभोंवती साधारण तीन इंच व्यासाच्या वर्तुळांत गव्हाच्या दाण्याएवढे केंस अन् इतर भाग चिकण लोट्याप्रमाणे गुळगुळीत. कमरेला गुढग्याच्यावर असणारें लालसर काळे धोतर. अंगांत छप्पन्न भोंके असलेलें मळकट जाकीट. अन् पायांत कांहीच नाही. असा आमच्या जयकरणचा थाट!

भायखळ्यांतील ' गोल्ड मोहोर ' मार्केट ( सध्या तिला न्यू मार्केट असे म्हणतात ) हेंच त्याच्या धंद्याचें क्षेत्र होतें. माझ्या खोलीशेजारी असलेल्या सोसाय- टीच्या केळीच्या वखारींतच त्याला दिवसांतून बराच वेळ काम मिळत असे इतर वेळांत भाजीपाला, केळीच्या फण्या अथवा उसाचीं खांडें आपल्या भल्या मोठ्या पाटींत भरून ते पोहोचविण्यचें काम तो करीत असे. वरून जरी किडकिडीत दिसत असला तरी मोठमोठी ओझीं वाहाण्यांत अथवा उचलण्यांत तो मोठा वाकबगार होता. ओझीं वहाण्याच्या वेळी मात्र तो डोक्याला आपलें फाटकें उपरणें बांधायला विसरत नसे. मण दीड मणाचे केळीचे घड ( मार्केटांत याला लोंगर म्हणतात ) खटाऱ्यांतून उतरविणें व चढविणें किंवा तितक्याच वजनाचे पदार्थ पाटींत घालून भायखळ्याहून लॅमिंग्टनरोड अथवा ग्रँटरोडपर्यंत वाहून नेणें ह्या त्याच्या अंगमेहनती- कडे पाहून मला नेहमीच आश्चर्य वाटत आले आहे.

× × × ×

सकाळीं ४ वाजेपासूनच मार्केटमध्ये गोंधळ व गलबला सुरूं होतो भाजीपाला व फळें यांच्या मोटारी खाली केल्या जातात अन् जो तो आपापला माल नीट व्यवस्थित रचून ठेवीत असतो. बिहिरीवर मोट धरतां धरतां गाणें म्हणणाऱ्या मोटकऱ्याप्रमाणे मार्केटमधील दुकानदार मोठमोठ्याने गाण्याच्या लकेरी मारीत असतात. मोटारीवरचे हमाल ' जान दो बाजू हटो ' ह्या आपल्या मंत्राने त्यांत अधिकच भर घालीत असतात. आणि ह्या भूपाळी बरोबरच आमच्या जयकरणचीसुद्धा दिनचर्या सुरू होत असते. पांच वाजतां स्नान करून वखारीच्या दरवाजाजवळ चहाच्या पेल्यांत पावाचे तुकडे भिजवून खाणें हा त्याचा पहिला नित्यक्रम असतो नंतर मग त्याच्या कामाला सुरवात होत असते. बारा एकच्या सुमारास सर्व लोक जेवावयास गेले कीं तोहि समोरच्या मद्राशाच्या हॉटेलांत जाऊन एक चहाचा कप अथवा एक उसळपाव घेतो अन् दोनतीन मोठे प्याले भरून पाणी पितो. अन् पुन्हा हमालीला सुरवात, ती संध्याकाळीं ८ वाजेपर्यंत ! पुन्हा ९ वाजतां स्नान करून तो आपल्या निवासस्थानीं जातो मार्केटच्या दुसऱ्या टोकाला एक लहानशी मोडकी केळीची वखार आहे. त्यांत त्याच्यासारखे ५।६ भैय्ये रात्रीं ९ वाजतां एकत्र येतात व हाताने स्वयंपाक करण्यास सुरवात करतात. एकदीड तासांत स्वयंपाक करून ११।१२ ला ते जेवण करतात अन् त्या मोडक्या वखारींत अंगावर उपरणें घेऊन निद्रादेवीच्या आधीन होतात. अशा तऱ्हेने जयकरणचें यांत्रिक व विचित्र जीवन सुरू असतें. दिवसभर दोन पावाच्या तुकड्यांवर राहून रात्रीं एकदांच जेवण करणें, अंगावर दुसऱ्यांकडून मागून आणलेले फाटके तुटके कपडे घालणें अशा तऱ्हेने आत्यंतिक काटकसरीचे व हलाखीचे दिवस तो काढीत असतो. दिवसाकाठीं १॥।२ रुपया तो हाडांचीं काडें करून मिळवीत असतो. मुंबईसारख्या शहरांत राहून महिन्याकाठीं ४०।४५ रुपये नित्यनियमाने तो आपल्या मुलुखांतील मंडळींना पाठवीत असतो. त्याची ती कुटुंबाकरितां चाललेली अखंड साधना पाहून मी तर अगदीं बर्फासारखा गार होऊन गेलेलों आहें. सात आठशें मैलांवर बायको व पोरांबाळांना टाकून येथे मुंबईंत वर्षांच्यावर्षें राबणाऱ्या जयकरणला पाहून मति कुंठित होते, विचारचक्रें उलटीं फिरूं लागतात.

\+ + + +

खळऽऽ खळऽऽ खळ्...... ६-२० ची ठाणा लोकल व्ही. टी. स्टेशनकडे जात होती. लोकलच्या या खळखळाटाने पुस्तकांतील दृष्टी काढून मी खिडकीं- तून बाहेर पाहिले ( वार्षिक परीक्षा जवळ आल्यामुळें मी आताशा सकाळीं अभ्यास सुरू केला होता ) चोहीकडे फटांग उजाळले होते. पूर्वेला तांबड फुटू

लागलें होतें. ट्रॅमचा धड्‌धड्‌ आवाज सारखा सुरू झाला होता. खण्‌खण्‌ ..... मीं एकदम मागे वळून बघितले. जयकरण बादली घेऊन नळावर जात होता. न बोलतां व न गडबड करतां जयकरण गेलेला पाहून मला एकदम आश्चर्यच वाटलें. एरव्ही जिन्यावरून पाय आदळीत ‘उठो मास्टरसाऽहब’ असें ओरडत येणारा जयकरण आज असा शांत कां याचें मला कोडें पडलें. जयकरण जरी हमाली करणारा भैय्या, व मी कॉलेज स्टुडंट असलों तरी आमच्यांत बरीच मैत्री होती. तो माझ्यावर खूष होता. व मला पण त्याचा सहवास गमतीचा वाटे. पुष्कळदा काम नसलें म्हणजे १०–१५ मिनिटें त्याने माझ्या खोलींत यावे, माझा बुशकोट आपल्या अंगांत घालावा, फेल्ट हॅट डोक्यावर चढवावी अन् मला उठवीत स्वतः खुर्चीवर जाऊन बसावे. टेबलावरील पुस्तकांतून एकादें जाड पुस्तक काढून ते वाचण्याचा अभिनय करावा. ग, म, भ न सुद्धा शिकण्याची बिचाऱ्याला संधि मिळाली नव्हती. कदाचित् आपली वाचनाची शिकण्याची हौस तो अशा रीतीने फेडून घेत असावा. ‘मास्टरजी, आपको कुछ पढने नही आता, देखो मै कसा पढता हूँ.” असें म्हणत कांही तरी बावळटासारखे तो बडबडत असें. अशा तऱ्हेच्या त्याच्या चेष्टांना मी कधीच हरकत घेतली नाही. त्यामुळे तो फार खूष असे. मलाही त्याच्या या रिकाम्या उठाठेवीची मौज वाटे पण आज त्याचा तो गंमती स्वभाव कोठे गेला होता?

थोड्याच वेळांत जयकरण बादली घेऊन वर आला. तो माठां पाणी ओतूं लागला. मी खुर्चीवर बसल्या बसल्या पण पुस्तकावरची दृष्टि न काढतां म्हणालों, “जयकरण, अरे तुला आज झालें तरी काय? असा हळूहळू पावले टाकीत काय चालतोस? अन् काय रे, तुझा चेहरा अस उतरल्यासारखा काय दिसतो?” मी पुस्तकावरची नजर काढीत त्याला म्हणालों. पण जयकरण एक नाही की दोन नाही. मी त्याला निरखून पहातों आहें असें त्याच्या ध्यानांत येताच एकदम काय झालें कुणास ठाऊक? त्याने एक मोठा हुंदका दिला. अन् त्याबरोबर हातांतील बादली निसटून त्याच्या पायाच्या बोटावर पडली. झटकन् मी खुर्ची सोडली व त्याच्या जवळ जावून बोटाला लागले किंवा काय तें पाहूं लागलों पण तो झटकन् बाजूला झाला अरे असें काय करतोस? मला कळूं तर दे काय भानगड आहे ती. का मला सांगायचीच नाही? नसेल तर राहूं दे” असें म्हणत मी उठलों. तितक्यांत त्याने आपल्या जाकिटाच्या खिशांतून कसलासा घडी केलेला कागद काढला अन् माझ्या हातात ठेवला अन् लगेच तोंड फिरवलें व तो चटकन् खालीच बसला. मी झटपट कागद मोकळा केला व वाचूं लागलो. त्यांत लिहिलं होतं.

“Wife dead; start immediately”

हळूच मी पुन्हा कागदाची घडी केली व वाटले जयकरणच्या अगदी जवळ जावे व खांद्यावर हात ठेवून त्याला धीर द्यावा. पण माझेच पाय जागचे हलेनात ‘जऽयऽकऽरऽण’ हळूंच माझ्या तोंडांतून शब्द बाहेर पडले

‘माऽस्टऽरऽऽजी’ इतके शब्द बाहेर पडतात न पडतात तोंच पुन्हा जोराचा हुंदका त्याने दिला

## तीन कुत्रीं

तीन कुत्रीं बरोबर फिरायला निघालीं एक म्हणाला “ह्या ‘श्वान युगां’त आपल्याला किती आराम आहे! जळीं स्थळीं आणि आकाशीं– कुठेंही आम्ही निर्वेध-पणें फिरूं शकतो!”

दुसरा म्हणाला, – “आमचें सौंदर्य पण वाढलें आहे–पाण्यांत आपलें प्रतिबिंब पाहिल्यास समजून येईल!”

तिसरा म्हणाला– “सर्वांत अधिक आश्चर्याची गोष्ट अशी आहे कीं ह्या युगांत विचार-साम्य किती स्थिर आहे!”

आणि तेव्हा समोरून कुत्रे पकडणारा येतांना दिसला. तात्काळ तिसरा कुत्रा बोळीकडे पळतां पळतां ओरडला “लवकर पळा, सभ्यतेनें आपला पाठलाग सुरू केला आहे!”

— खलील जिब्रान.



# बोरकरांची कविता

कु. शकुंतला जोशी ज्यु एम् ए.

कविवर्य भास्करराव तांबे यांच्यानंतर त्यांचा वारसा उचलणारा एकमेव कवि म्हणून आपल्याला गोमंतकीय कवि बा भ. बोरकर यांचेकडे बोट दाखवितां येईल. ‘तांब्यांच्या घराण्याची गायकी पुढे चालविण्याच्या निष्ठेने मी कलेच्या उपासनेला लागलों.’ असें ते आपल्या ‘जीवनसंगीत’ या पहिल्या काव्य-संग्रहाच्या प्रस्तावनेंत लिहितात. त्यांची कविता वाचल्या-नंतर तांब्यांच्या कवितेची गेयता, नादमाधुर्य व चित्रमयता त्यांनी पूर्णपणें आत्मसात केलेली आहे हें ताबडतोब प्रत्ययास येते. आपला ‘जीवनसंगीत’ हा पहिला काव्यसंग्रह त्यांनी ‘कविवर्य भास्करराव तांबे यांस’ अर्पण केला व त्यांतील पहिलीच ‘कविवर भास्करास’ ही कविता तांब्याच्या (श्लेषार्थाने सूर्याच्या) स्तुतीपर गायिली यावरून तांब्यांच्या कवितेची किती विलक्षण मोहिनी त्यांच्या मनावर पडली होती हें स्पष्टपणें निदर्शनास येते. परंतु तांब्याच्या कवितेचें अंधानुकरण मात्र त्यांनी केलें नाही. तांब्यांची सर्व वैशिष्ट्यें आत्मसात करून त्यांनीं शिवाय स्वतःचें स्वतंत्र असें वैशिष्ट्य राखलें. व तें म्हणजे त्यांनी आपल्या सर्व कवितेला गोमंतकीय सौन्दर्यांचा साज चढविला. त्यामुळेंच तांब्यांच्या व इतर समकालीन कवींच्या कवितेपेक्षा त्यांच्या कवितेला एक निराळेंच गहिरें सौन्दर्य प्राप्त झालेलें दिसतें.

बोरकरांनी लिहिलेलीं प्रेमगीतें हा त्यांच्या काव्याचा एक प्रमुख भाग आहे. तांब्यांच्या कवितेचे त्यांच्या मनावर जे संस्कार झाले त्यांच्यामुळे, व स्वतःच्या स्वाभाविक अशा मनःप्रवृत्तीमुळे त्यांच्या कवितेंत प्रणयालाच प्राधान्य मिळालें प्रणयाच्या विविध छटा त्यांनीं रंगविल्या असल्या तरी तांब्यांच्या कविते-प्रमाणेच त्यांच्याहि प्रेमकाव्याचा सूर प्रीतीच्या सफलतेचाच आहे. गोविंदाग्रजाप्रमाणे नैराश्याचे सुस्कारे त्यांनी सोडलेले नाहीत त्यांची बहुतेक सर्व प्रेमकविता आत्मपरच आहे. प्रारंभीच्या कांही कवितांत त्यांनी स्त्रीसौन्दर्याचें उन्मादक वर्णन केलेलें आढळेल.

‘मृदु मादक मुखचुंबनें। दृढ निर्दय आलिंगनें’ किंवा

‘सूज्ञपणाच्या बेड्या तोडूं ।
संवत्सरांचीं वसनें सोडूं ।
दो हृदयांतील पराग जोडूं ।
जडवुनि अधरांवर अधरा’ । किंवा
‘उन्नत चंचल तव वक्षःस्थल ।
चाल मस्त ही, पद उच्छृंखल ।
तुडवित जाशी मदनाचे दल ।
जणु झाडाचा पाला ग’ ।

अशा ओळी ते सहज रचतात. पण नंतर नंतर त्यांची प्रेमकविता भोगाकडून भावनेकडे झुकलेली दिसते. स्त्रीविषयक आदरभाव व प्रेमाकडे पाहण्याचा उदात्त दृष्टीकोन यांचा आढळ आपल्याला त्यांच्या नंतरच्या कवितामध्ये होतो.

‘आले जग जरि मागुनि सजणी ।
आपण उतरूं सागरभुवनीं ।
देहवेलि वर देऊं फेकुनि ।
सागरपोटीं आमुच्यासाठी नवरत्नांची नगरी ग’।

असें ते आपल्या प्रेयसीला सांगतांना दिसतात. ‘पाठमोरी पौर्णिमा’ या कवितेंत निसर्गाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी उच्च पातळीवरून आपली प्रेम–भावना प्रकट केली आहे. ‘घरांतले चांदणें’ या कवितेंत मीलनोत्सुक प्रेयसीचें दर्शन ते आपल्याला घडवितात, तर ‘सखि ये गे’ या कवितेंत प्रेयसीला अत्यंत आतुरतेने साद घालणारा प्रियकर आपल्याला दिसतो. ‘कशि तुज समजावूं सांग’ असें म्हणून आपल्या प्रेयसीचा व्याकुळपणें अनुनय करणारा नायकहि त्यांनी रंगविला आहे ‘सायुज्यमुक्ति’ ही त्यांची कविता तर प्रियकर प्रेयसी यांच्यांतील प्रेमाच्या अद्वैताचें स्पष्ट

दर्शन घडवितें. ‘ प्रभातरवि तूं मी नवकमलिनि ’ असे म्हणून त्यांची प्रेयसी पुढे म्हणते,

“ सोन्याच्या तव हृदयीं पोहुनि ।
मन रे माझें गेलें हुरळुनि ।
तुझ्यांत गेलें विश्व लोपुनी ।
मज तुजविण कांहि न ये दिसुनी । ”

त्यांच्या कांही प्रेमकविता लावणी वाङ्मयाच्या धर्तीवर आहेत. त्यांत त्यांनीं निःसंकोचपणें आपली प्रेमभावना व्यक्त केलेली दिसते. ‘ तुझी माझी ग प्रीत साजणी चांदण्यांतली लावणी ग ’ अशी मनोहर व कांहीशी अमूर्त उपमा ते प्रेमाला देतात ‘ गेलें भिडनि मनांत ’ या कवितेंत विरहाकुल नायिकेचें मनोगत त्यांनीं व्यक्त केलें आहे. प्रथम विरहामुळे व्याकुळ झालेली व नंतर प्रियकराच्या मधुर मीलनामुळे आनंदित झालेली नायिका तेथें दृष्टिस पडते ‘ अशि मारिशिल न कुणाला ग ’ या कवितेंत ते म्हणतात.

‘ बघुनि जरा लीलेने मुरडुन ।
चिडविसि मानेवरची नागिण ।
आणि क्षणीं ती जाई डंखुन ।
सहजपणे कितिकांला ग । ’

‘ डोळे तुझे बदामी ’ व ‘ माझी बेगम ’ या दोन्ही कविता म्हणजे कवीच्या निःसंकोच प्रेमभावनेचें प्रतीक होय. मोंगली विलासप्रियतेचें दर्शन त्यांत आपल्याला घडतें. त्यामुळे त्यांना एक प्रकारचें नावीन्य आलेलें आहे. ‘ आगीचें पांखरू ’ ‘ खाईतला स्वर्ग ’ इ. कांही कवितांत त्यांनी विरहाची भावना रंगविली असली तरी त्यांच्या प्रेमगीतांचा स्थायी भाव सफलतेचाच आहे. प्रेमाच्या भावनेंत ते पूर्णपणें रंगून जातात पण त्यांचें प्रेम आंधळे वा सांकेतिक नाही. तें डोळस आहे.

‘ क्षणभंगुर जरी जीवन, सखे सुखसुंदर करुं आपण ।
सखे ग शाश्वत करुं आपण ।

असें म्हणण्याइतका आत्मविश्वास त्यांच्या ठिकाणीं आहे ‘ मी प्रीतीचा पाइक न सखे केवळ रतिसुखभोगासाठी ’ ही जाणीव त्यांना आहे संसारातील मोहकतेचा त्याग करून साबरमतीच्या कांठीं जाऊन राहण्यास ते सहजपणें तयार होतात. कारण त्यांचें प्रेम हें केवळ सुखोप भोगांत गुरफटून राहणारें व आंधळे नाही. त्यांची भूमिका सौंदर्यवादी कवीची आहे. सौंदर्याचे कण न् कण टिपून घेण्यांत त्यांची तरल प्रतिभा कुशल आहे. ते म्हणतात त्याप्रमाणें,

‘ माझा छंद दिवाणा ।
न कळत मन्मुखिं सुंदरतेचा तरळे तरल तराणा । ’

अशी त्यांची वृत्ति आहे व म्हणूनच त्यांची प्रेमकविता सौंदर्याने न्हाऊन निघालेली दिसते. तरल भावना व मधुर कल्पनाविलास यांच्या मनोज्ञ मिलापाने त्यांनी प्रेमाच्या विविध अनुभूति आपल्या प्रेमकवितांत साकार केलेल्या आहेत.

प्रेमगीतांप्रमाणेच निसर्गगीतें लिहिण्यांतहि त्यांनीं कमालीचें यश मिळविलें आहे. निसर्गातील अभिनव सौंदर्याची मोहिनी एकदा त्यांच्या मनावर पडली कीं, त्यांच्या तरल व संवेदनाक्षम प्रतिभेला निरनिराळ्या कल्पना सुचूं लागतात. बालकवि निसर्गाला दिव्यत्व देतात, त्याच्यावर मानवी भावनांचा साज चढवितात. बोरकर हें तर करतातच, पण शिवाय विविधरंगी गोमंतकीय निसर्ग आपल्यापुढे साकार करतात. रंग, नाद, स्पर्श, गंध इ. अनेक अनुभूतींचा प्रत्यय त्यांच्या निसर्गवर्णनपर कविता वाचीत असतांना आपल्याला येतो. नागमोडी वळणें घेत गेलेल्या पाऊलवाटेचें वर्णन ते

फुरशासम मधुनी एकच पाऊलवाट
वळकांडी घेउनि होती दूरच जात.

असें करतात. ‘ मुशाफिरा ’ या कवितेंत सायंकाळच्या कातरवेळेचें वर्णन करतांना ते म्हणतात,

“ काळवंडली जळें । चिंचही न सळसळे ।
वाटतें भयाण सर्व सलत आंत कातरा । ”

‘ सांध्यसुंदरी ’ चें ‘ इंद्रनील चंद्रकांत साध्यसुंदरी ही ।
येइं हंसत मधुर मंद विश्व मंदिरीं ही ।
नेसुनि ये वसन नरम तलम अंजिरी ही ।

असें चित्रमय वर्णन ते करतात. ‘ स्पर्श ’ या कवितेंतील

“ भुई वाळुची संगमरवरी ’
तीवर काळ्या फेनिल लहरी... ” या किंवा
‘ धूप जळे तिमिराचा पवनीं ।
विनिद्रनयना व्याकूळ अवनी, ।



पिकुनी लवल्या नक्षत्रांच्या द्राक्षलता पिवळ्या । ’

या ओळीमध्ये नाद, स्पर्श, रंग, चित्र इ चा प्रत्यय उत्कटत्वानें आपल्याला येतो.

‘ गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले ।
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले । ’

या ओळींतल्या नादाने मन धुंद होत नाही तोंच, चित्रकाराच्या ऐटीने रंगविलेलीं एकेक चित्रें डोळ्यापुढे येऊं लागतात.

दिन लंघुनि जाय गिरी ।
पद उमटे क्षितिजावरि ।
पद्मरागवृष्टि होय माड भव्य न्हाले । ’ हें किंवा
धूसर हो क्षितिज वरित ।
ढोर पथीं अचल चकित ।
तृण विसरुनि जवळिल तें खिळवि गगनिं डोळे । ’

हें चित्र कुणाला मोहित करणार नाही। ‘ बांगड्या ’ या कवितेंत वासंतिक सौंदर्याचें अतिशय सुंदर वर्णन करून त्यांनी मूर्तिमंत निसर्ग आपल्यापुढे चितारला आहे.

‘ क्षितिजासम या जांभुळ ।
जलदासम या श्यामल ।
वत्सल या गंगेतिल सांध्य-मेघ छाया । ’

हें निसर्गाचें कल्पनाप्रचुर, नादमय व विविधरंगी चित्र रेखाटणारी प्रतिभा अतिशय तरल व संवदनाक्षम आहे यांत शंकाच नाही. ‘ आकाशमाऊलीचे ’ चें

‘ कोर बिलोरी तुझ्या कपाळीं शिरिं मोत्यांची जाळी ग।
तुझ्या लोचनीं मुक्तात्म्यांची शाश्वत नित्य दिवाळी ग ।
हरिकान्तीचें वस्त्र तनूवर त्यावर ज्योतिश्चित्रें ग ।
रुवती ज्यांतुनि परमपवित्रें अलिखित संतचरित्रें ग ’।

असें उदात्त वर्णन ते करतात ‘ श्रावणदर्शन ’ या कवितेंत श्रावणांतल्या उत्साही वातावरणाचें अतिशय हृद्य चित्रण त्यांनी केलें आहे. ‘ माझ्या गोव्याच्या भूमींत ’ या कवितेंत त्यांनी गोमंतकीय सौन्दर्याचे कण न् कण टिपून घेतलेले दिसतात गोमंतकाविषयी वाटणारी आत्मीयता व जिव्हाळा यामुळे या कवितेंत एक निराळेच माधुर्य ओसंडत असलेलें दिसतें.

‘ माझ्या गोव्याच्या भूमींत । येतें चांदणें माहेरा ।
ओलावल्या लोचनांनी । भेटे आकाश सागरा ।
माझ्या गोव्याच्या भूमींत । काळे काजळाचे डोळे ।
त्यांत सावित्रीची माया । जन्मजन्मांतरी जळे । ’

अशीं अनेक मनोज्ञ चित्रें त्यांनी अत्यंत कुशलपणें रेखाटलीं आहेत ‘ इतुक्या लवकरि येइ न मरणा ’ या किंवा इतर कांही कवितांतील गोमंतकीय वातावरण पाहिले म्हणजे—

‘ माझ्या गोव्याच्या भूमींत । सारा माझा जीव जडे ।
पुरा माझ्या कवनांचा । गंध तेथे उलगडे । ’

हें त्यांचें म्हणणें खरें वाटतें. आणि याच निसर्गांत त्यांना दिव्यत्वाचा साक्षात्कार होतो. ‘ दूधसागरा ’ च्या खळखळणाऱ्या ओघांत त्यांना पवित्र वेदघोष ऐकूं येतो व आनंदाचा आणि आशेचा संदेश ते देतात.

परंतु बोरकर हे केवळ प्रेमकवि अगर निसर्गकवि नाहीत. कल्पनारम्य जग स्वतःभोवती निर्माण करून केवळ स्वप्नरंजन करीत राहणें ही त्यांची वृत्तीच नाही. देशांतील अनेक घडामोडींचा परिणाम त्यांच्या संवेदनाक्षम मनावर झाला व त्यांतूनच त्यांच्या देशभक्तिपर कवितांचा जन्म झालेला दिसतो. कुसुमाग्रजाप्रमाणें तीव्र भावनांचा प्रत्यय आपल्याला त्यांत येत नसला तरी त्यांच्या अंतर्यामीची तळमळ व कळकळ स्पष्ट दिसते.

‘ रणवाद्यें या फुंकित बडवित ।
भैरव तांडव करा देशभर ।
हर हर हर सावेश गर्जुनी ।
रुद्र करा भारतभर जागा ’ ।

अशी साद ते कवींना घालतात ‘ जुन्या काळच्या इमारती ’ हाणून पाडायला ते सांगतात पण त्यांतलेच सुदृढ चिरे घेऊन त्यांचे उत्तुंग मनोरे उभारण्याची त्यांची मनीषा आहे.

‘ रोकडे होउनी खडे, सुधेचे धडे ।
देऊ दुबळ्यांसी । विष खावुनि ग्रासोग्रासी ।

अशी उमेद त्यांना आहे. समता, शांति विश्वबंधुत्व व स्वातंत्र्य यांचा पुरस्कार करणारे निशाण फडकाविण्याची आकांक्षा त्यांना आहे ‘ स्वातंत्र्याचा दीपोत्सव ’ या कवितेंत स्वातंत्र्योत्तर देशाची झालेली फाळणी व तीमुळे मनाला आलेली विषण्णता तीव्रतेने प्रकट झालेली दिसते स्वातंत्र्याचा दीपोत्सव

साजरा करावासा वाटत नाही. 'भगवती स्वतंत्रतेस' ते

'आण गे श्रमास मान । आणखी कलेंत प्राण'

अशी विनवणी करतात. गोमंतकीय स्वातंत्र्याच्या चळवळीवरहि त्यांनी अनेक कविता लिहिल्या. 'तिरंगी झेंडया'स कवळण्यास त्यांच्या भुजा आतुर झालेल्या दिसतात. त्याच्या पूजनास ते सिद्ध झालेले आहेत 'स्वातंत्र्यलक्ष्मी' च्या दिव्योज्ज्वल स्वरूपाचें वर्णन त्यांनी 'स्वातंत्र्यलक्ष्मीस' या कवितेंत केलें आहे. मात्र बोरकरांची नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा प्रेम कवितांत किंवा निसर्गकवितांत जशी बहरून आलेली दिसते तशी या राष्ट्रीय कवितांत दिसत नाही परंतु त्याबद्दल त्यांना दोष देणें अन्याय्य ठरेल. कारण तो त्यांच्या प्रतिभेचा स्थायी भावच नाही या कवितांवळे त्यांच्या प्रतिभेचा एक निराळाच पैलू आपल्याला दिसला हें मात्र निश्चित.

बोरकरांनी सामाजिक कविताहि अनेक लिहिल्या. समाजांतील दंभ, विषमता यांची त्यांना चीड येते. या त्यांच्या कवितांचा एक विशेष हा की, त्यांनी बहुतेक ठिकाणीं अत्यंत सूक्ष्म व यथार्थ प्रतीकें योजून आपला आशय व्यक्त केला आहे.

'धाड देवा ऐशा संकटांच्या कोटी ।

होवो तातातुटी दांभिकांची ।'

अशी प्रार्थना ते देवाजवळ करतात. जनतेच्या पोटीं असणाऱ्या सुप्त सामर्थ्याची जाणीव त्यांना आहे व म्हणूनच 'लोकसागरा स्थिरपद कां तूं?' असा रोकडा सवाल करून 'विपन्नतेंति शालिन्याला लाचारपणा जडतो हेतु' असा स्पष्ट इशारा ते देतात 'मुखवट्यास' या कवितेंत विश्वबंधुत्वाची जाणीव ते करून देतात. मानवतेने दंभाचा मुखवटा घातलेला आहे. त्यामुळ मानवाच्या अंतर्हृदयाची ओळख पटत नाही. मानवतेची ओळख पटली म्हणजे हा मुखवटा गळून पडेल व सगळीकडे समतेचा ध्वज फडकेल असे ते म्हणतात. 'इमानी कुत्र्यास' या कवितेंत कुत्र्याचें प्रतीक योजून ब्रिटिशांची हांजी हांजी करणारांचा तीव्र उपरोध त्यांनी केला आहे. 'कानफाट्याचा फटका' हि असाच उपरोधानें नटलेला आहे. 'घेऊं लक्ष्मीला घरीं' या कवितेंत ते अस्पृश्यासारख्या उपेक्षितांच्या अंतरंगांत शिरलेले दिसतात. इतके दिवस अस्पृश्यांना उपेक्षेनें वागविले याचा कवीला विषाद वाटतो. अमंगल निवारणाऱ्या अस्पृश्य जनतेसाठी 'केरसुणीचें प्रतीक' वापरून अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे असा आशय ते व्यक्त करतात. कै साने गुरुजींनी पंढरपूरचें देऊळ हरिजनांना खुले करण्यासाठी प्रायोपवेशन आरंभिले त्या प्रसंगावर 'पंढरीस वाजे घंटा पांडुरंग झाला जागा' ही उत्कट कविता त्यांनी रचली. श्रमिकांच्या श्रमांचा योग्य तो मोबदला त्यांना दिला तरच त्यांचे श्रम घेण्याचा हक्क आपल्याला आहे हें त्यांनी 'धन नाही हें पाणी' या कवितेंत श्रमिकांसाठी भगीरथाचे प्रतीक वापरून सांगितलें. प्रसिद्धीची हांव न बाळगतां निःशब्दपणें कार्य करणाऱ्या महात्म्यांना योग्य तो मान द्यावयास हवा हें त्यांनी 'शिव ते, द्या त्यांस पिंडावळ' या कवितेंत कावळ्याचें सूक्ष्म प्रतीक योजून सांगितलें आहे. अहंभाव न बाळगतां दलितांची सेवा करणाऱ्यांनाच जीवनाचा खरा अर्थ समजला आहे असें ते म्हणतात.

म. गांधीवरहि त्यांनी अनेक कविता लिहिल्या आहेत. गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा व तत्वज्ञानाचा खोल ठसा त्यांच्या मनावर उमटला आहे. गांधीजीबद्दलचा नितान्त आदर आपल्याला त्यांच्या या कवितांत आढळून येतो. त्यांच्याबद्दल वाटणारी असीम श्रद्धा व निष्ठा यांचा प्रत्यय उत्कटत्वाने येतो. गांधीजींच्या दर्शनाचा त्यांच्या मनावर झालेला परिणाम त्यांनी 'सायंप्रार्थना' या कवितेंत चित्रित केला आहे. 'दिसला प्रभु साकार' असें त्यांना गांधीजींचें दर्शन झाल्याबरोबर वाटलें. गांधीजींची मूर्ति 'गंगेपरि गेली पुढुनी संथ गतीने' असें ते म्हणतात, यांतच त्यांच्या पवित्र भावनांचा व गांधीजीविषयीं वाटणाऱ्या आदराचा प्रत्यय येतो. गांधीजींच्या पायाखालचा मार्ग होण्याचें भाग्य आपल्याला मिळावें अशी विनवणी ते करतात. अस्पृश्यतानिवारणाच्या मोहिमेच्यावेळीं त्यांनीं 'भंग्याच्या घरीं' ही कविता लिहिली. नौखाली यात्रेंत संदेश स्वाक्षरी मागणाऱ्याला गांधीजींनी 'माझें जीवन हाच माझा संदेश' असें उत्तर दिलें त्याचा विलक्षण परिणाम कवीवर झाला व त्यानें 'आमार जीबनई आमार बानी' ही कविता लिहिली. गांधीजींच्या



अमानुष वधानंतर त्यांनी 'हांसत लावा वज्रटिळा' ही भावनेने अथंबलेली कविता लिहिली. या हत्त्येचें पातक घडल्याचा विषाद त्यांना वाटतो व

'व्हा अमुच्या जठरात हुताशन, अनृत सगळं जाळा हो
पाप न शमलें तोंवर फुलवा सर्वांगांतून ज्वाळ हो'

अशी प्रार्थना त गांधीजींना करतात. स्वातंत्र्य मिळतें न मिळतें तोंच देश दुभंगला व गांधीजींचा वध झाला याचा त्यांना खेद वाटतो 'कसतो त्याला ना घड भाकर, श्वान धनाचा चघळी पोळी' असें देशस्थितीचें विदारक चित्र त्यांनी रेखाटलें आहे. गांधीजींच्या जीवनावर रामायणाच्या पद्धतीने ते 'महात्मायन' रचीत आहत इतका गांधीजींच्या व्यक्तित्वाचा व तत्त्वज्ञानाचा खोल ठसा त्यांच्या मनावर उमटलेला दिसतो. गांधीजीविषयींच्या त्यांच्या उत्कट भावनांचा प्रत्यय आपल्याला या कवितांत येतो.

बोरकरांच्या बहुरंगी कवितेंतील एक रंग अध्यात्म्याचा आहे. संत वाङ्मयाचा व ज्ञानेश्वरीचा सखोल अभ्यास केल्यामुळे त्यांचा काव्यौघ सहजपणें तत्त्वज्ञानाकडे झुकतो. ॐकार, प्रणव, चराचर इत्यादि शब्द त्यांच्या कवितेंत वारंवार येतात. मृत्युनंतरच्या स्थितीविषयी वाटणारें गूढ आकर्षण त्यांनी 'यमदर्शन' या कवितेंत व्यक्त केलें आहे.

'रहस्य कानडें । सांगतां न ये ।
सर्वांग जाळतां । सर्वांगीं दिसे !
पोटांत हंसे । लावुनि पिसें ।
ज्याविण सारे । असूनि नसे ।
ज्यामुळे सारे । नसूनि असे ।

अशी कांहीशी गूढ चमत्कृतिपूर्ण व विरोधी भाषा ते वापरतात त्यांना 'चिरंतनाचा ध्यास' लागलेला आहे, कारण जगाच्या व जीवनाच्या क्षणभंगुरतेची त्यांना पूर्ण जाणीव आहे. 'तूं छेड अशीच शरीरसतार' या कवितेंत त्यांनी आध्यात्मिक शब्दांच्या साहाय्याने सर्व नादब्रह्म साकार केलें आहे. 'करिं सुंदरि स्वरशृंगार' या कवितेंतहि त्यांची आध्यात्मिक वृत्ति डोकावतेच. 'जादुगारा' 'विरोधीभक्ति' 'गोड कळ' 'ये पुढल्या दाराने' 'भिडली रात्र पहाटे' 'हरिच्या स्मरभुवनीं' इ त्यांच्या गीतांतहि अध्यात्माचा चांगलाच प्रत्यय येतो. मनाला मांजराचें प्रतीक योजून त्यांनी मनाच्या गूढ व्यापारांचें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांत अंधुकपणा जाणवतो.

'तवपणिं हें माझें पण । वितळुनि हिमसम कणकण ।
लोचनिं तव होउनि जळ । विश्व मी पहावें । व
सरुनि सकळ द्वैतपणा । नटवुनि जीवन-मरणा ।
होउनि निःश्वास तुझा । असुनि मी नसावें'

अशी प्रार्थना ते देवाजवळ करतात. 'देह उरो उपकारापुरता' अशी त्यांची मनीषा आहे. त्यांच्या मनाच्या अशा आध्यात्मिक घडणीमुळेच त्यांना दिव्यत्वाचे साक्षात्कार होतात व

'दिव्यत्वाची जेथ प्रतीती । तेथे कर माझे जुळती'

असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडतात.

'सागरसम जीं विशाल हृदयें
गगन धराया करितीं धडपड ।
अपेश जडलें तरी जयांना ।
धडपडण्याची दुर्दम आवड ।'

अशा दिव्य अलौकिक व्यक्तींवर असीम प्रेम करून स्वतःचें जीवित कृतार्थ करण्याची त्यांची आकांक्षा आहे. स्त्रीच्या सामर्थ्याची जाणीव त्यांना आहे. तिच्या बाबतींत आपण अनंत अपराध केले याचा त्यांना विषाद वाटतो. व ते क्षमस्व' मांगल्यखनी' असें म्हणतात. लोकांसाठी देह झिजविणाऱ्या मित्रांबद्दल त्यांना असीम आदर वाटतो. आपल्याला त्यांच्याप्रमाणे देह झिजवितां येत नाही याचा त्यांना खेद वाटतो. अशा मित्रांचीं गाणीं गाऊन ते त्यांची पूजा करतात व मनाचें समाधान करून घेतात. दिव्यत्वाचा साक्षात्कार घडविणाऱ्या त्यांच्या कविताहि उत्कट भावनाविलासांमुळे मनोहर झाल्या आहेत.

बोरकरांची कविता ही अशी बहुरंगी आहे. आरंभीच्या त्यांच्या कांही कवितांवर तांब्यांच्या कवितेची स्पष्ट छाप दिसत असली तरी नंतर त्यांनी आपलें स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविलें. 'जीवनसंगीत' दूधसागर' व आनंदभैरवी' या त्यांच्या तिन्ही काव्यसंग्रहांतून त्यांच्या विकासशील व्यक्तिमत्वाचा

प्रत्यय आपल्याला येतो. त्यांचा पिंड कवि, चित्रकार व संगीतज्ञ यांचा मिळून बनलेला आहे. व म्हणूनच ते

अधर जरा वळलेला खाली।
भुवइ जरा चढलेली भालीं।
खळी जरा झुकलेली गालीं।
नयनिं विषारी भाला ग। किंवा,
स्तब्ध मार्ग तांबडा।
वळत जाय वांकडा।
मोडक्या पुलाकडून तार जाय बंदरा।'

अशीं चित्रें सहज रेखाटतात त्यांचा आशावादी व सौंदर्यवादी दृष्टिकोन त्यांच्या सर्वच कवितांतून जाणवतो. विफलता, कुरूपता यांचा प्रत्यय आपल्याला त्यांची कविता वाचत असतांना येत नाही. लालित्य व माधुर्य यांनी त्यांच्या कवितेला एक गहिरें सौंदर्य प्राप्त झालें आहे आजच्या नवकवींमध्ये आढळणारी चीड उबग, त्वेष इ कोणतेंहि वैशिष्ट्य त्यांच्या कवितेंत नसतांना तिने स्वतंत्र व मानाचें स्थान पटकाविलें आहे. हाच रसिकांनी तिला दिलेला कौल होय.

---

## ★ फुलें आणि मानव ★

[ वृत्त – शार्दुलविक्रीडित ]

बागेंतील फळें, प्रफुल्ल सुमनें आहेत नेत्रांपुढे
वापीपासुन तोय वाहत दिसे डाळिंबवृक्षांकडे
नाना वृक्ष, फुलें तशाच लतिका बागेंत चौंबाजुला
हिंडे नित्यच बागवान कदळी पुष्पाहि रक्षायला
वाटे भूवरि लोक चारू असती उद्यानशोभेमुळे
लोकांना जगतीं असे अभिरुची नामी निसर्गामुळे
कौमुदीसमयीं सुरेख दिसतें उद्यान भूमीवर
पक्ष्यांचा रव फार गोड घुमतो व्योमांतरी सत्वर
नाना शोध नरें अचाट मतिने लावून सृष्टींतले
संहारास्तव आणि चैन करण्या सामर्थ्य संपादिलें
बागेंतील फुलें सुहास्यवदनें लोकांकडे पाहती
मानावा बहु हर्ष येथ परि ही कुंठीत होई मती

× × ×

शास्त्राचा महिमा अतीव म्हणुनी युद्धास हो साधन
आनंदी सुमनें मजेंत डुलती, 'धोक्यांत तें जीवन'

— दि. शं. भोळे, प्रथम वर्ष विज्ञान.

GATHERING MANAGING COMMITTEE
1954



Sitting ( L to R ) : Prof. ( Mrs. ) Tarlekar, Prof. Sirdesai, Prof. Tarlekar, Prof. Nadkarni ( Chairman ), Prin. Mahajan ( President ), Shri Prithviraj Kapoor ( Chief Guest ), Shri D. T. Gajare ( Gen. Secretary ), Prof. Bhave, Prof. Chiplunkar, Prof Kelkar and Miss S. Pradhan.

Standing ( L to R ) : Shri R. S. Rane, Shri A. T Javale, Shri G. S. Kulkarni, Shri S. G. Hartalkar, Shri S. V. Joshi, Shri A. D. Patil, Shri M. B. Sharma, Shri P. N. Deshpande and Shri V. N. Rane.

ANNUAL SOCIAL GATHERING

1954



FLAG HOISTING



OUR PRINCIPAL
getting set for breaking the pot



REFRESHMENTS



CHIEF GUEST
with the Principal & the Gen. Secretary



FESTIVAL CRICKET MATCH



ENTERTAINMENTS



FANCY DRESS

Photos by Ghanekar, Patil & Merchant.



# [ झोंप

कु. सरला अत्रे
तृतीय वर्ष–कला. ]

' झोप हा एक रोग आहे व तो नष्ट करतां येईल असा एका प्रख्यात शास्त्रज्ञाने नुकताच शोध लावला आहे " वरील बातमी वाचून मला सखेदाश्चर्य वाटलें आश्चर्य अशासाठी की झोप आणि रोग यांची सांगड कुणी घालेल हें मला स्वप्नांतहि खरें वाटलें नसतें आणि ही बातमी मीं वाचत होतें नी जागेपणी, सकाळच्या वेळेस माझा माझ्या डोळ्यावर विश्वास बसे ना तीनतीनदां मीं ती बातमी वाचली. बातमी तशीच होती. खेद अशासाठी की मी अत्यंत निद्राप्रिय आहें. अत्यंत उद्योगप्रिय माणसाला ती बातमी वाचून आनंद झाला असेल पण माझ्यासारख्या निद्राप्रिय माणसाला मात्र खेद वाटण्यासारखीच बातमी होती ती.

चिंतेचा विसर पाडणाऱ्या व श्रमपरिहार करणाऱ्या जगांत कांही गोष्टी आहेत त्यापैकी झोंप ही एक गोष्ट. दारूसारखे व्यसन माणसाला चिंतेंतून थोडा वेळ मुक्त करते पण त्याचे परिणाम किती भयंकर होतात! झोपेचें तसें नाही चिंताग्रस्त माणसाला झोंप लागत नाही असें म्हणतात. पण झोंप न लागण्याला सुद्धा मर्यादा आहेतच कीं! तेव्हा थोडा वेळ तरी तो चिंतांना रजा देऊं शकतो. एखादा माणूस थकलेला भागलेला असेल तर ही ममताळू निद्रादेवी त्याला आपल्या कुशींत घेऊन त्याचा श्रमपरिहार करते. पण ही झोंप नाहीशी झाली तर चिंताग्रस्तांना, थकल्या भागल्यांना कोण दिलासा देणार? कोण त्यांच्या दुःखावर फुंकर घालणार? आणि त्याहिपेक्षा माझ्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न म्हणजे माझ्यासारख्या निद्राप्रिय माणसांचें कसें होणार? मनुष्य हा स्वार्थी असतो किंबहुना प्रत्येक प्राणी स्वार्थी असतो. तेव्हा माझ्या दृष्टीने हा विचार महत्वाचा ठरवा हें अगदी साहजिक आहे.

ही झोंप नाहीशी झाली तर आणखी एक मोठाच तोटा होणार आहे माझ्या दृष्टीने हाच सर्वांत मोठा तोटा होय. ही झोंप जर नष्ट झाली तर स्वप्नसृष्टीचा चक्काचूर होणार आणि स्वप्नसृष्टी हें मानवाला मोठेंच आकर्षण आहे. स्वप्नें पडण्यासाठी तरी आपल्याला झोंप लागावी असंहि मला कित्येकदां वाटते.

हीं स्वप्नें किती नाना प्रकारचीं असतात! कांही स्वप्नांना कांहीच अर्थ नसतो. त्यांत सुसंगति नसते. पण गंमत अशी की आपण ज्या वेळेस स्वप्नसृष्टींत विहार करीत असतो त्या वेळेस मात्र आपल्याला त्यांत कांही विसंगत आहे असं वाटत नाही. कांहीं स्वप्नें हीं अद्‌भूतरम्य असतात. तेव्हा आपण कुठे कुठे जाऊं त्याचा पत्ताच लागत नाही अशा स्वप्नांत आपण इंद्राचें ऐश्वर्य पहातों तसेच पाताळांतील क्रूर प्रकारहि पहातों भूतवाड्यांत जातों तसेच एखाद्या सुंदर, रमणीय महालांतहि जातों. त्रिभुवन मोकळें असतें आपल्याला हिंडावयाला! तेथे कोणी आपल्याला अडवीत नाही. सदर परवानगी असते अगदी! पण मला ज्या स्वप्नां-बद्दल विशेष आकर्षण वाटतें तीं हीं असलीं नव्हत! मला ज्या स्वप्नांबद्दल विशेष आकर्षण वाटते ती ' मनी वसे ते स्वप्नी दिसे ' असल्या प्रकारची. मी जीं नाना मनोराज्यें करतें तीं मला स्वप्नांत सफल झालेली दिस-तात. वक्तृत्वाचा मला गंधहि नाही. पण स्वप्नांत मी मला व्यासपीठावर हजारों लोकांसमोर मोठे आवेशपूर्ण भाषण करतांना दिसते. गाण्यांची देखील मला फार आवड आहे. मला गाणें मुळीच येत नाही. आपल्या-शीच गुणगुणेन तेवढेच. पण स्वप्नांत अनेक श्रोते माझें गाणें तल्लीन होऊन ऐकतांना मला दिसतात व मीहि रगून गेलेली असते आलाप ताना घेण्यांत!

आणखी एक प्रकारच्या स्वप्नांबद्दल मला आकर्षण वाटते. त्यांत मला अनेक व्यक्ति भेटतात. माझ्याशी संभाषण करतांना दिसतात. त्यांतील एकहि व्यक्ति मला वास्तवसृष्टींत भेटलेली नाही. पण त्या व्यक्तीबद्दल मला विलक्षण आपलेपणा वाटतो.

मला स्वप्नांत नेहमी एक व्यक्ति भेटते. ती व्यक्ति आता माझ्या खूप परिचयाची झालेली आहे. ती आणि मी - आम्ही टेकडीवर गप्पा मारीत आहोंत, असें मला दिसते. आम्ही चर्चा, वाद-विवाद फारसं कांही करत नाही अगदी साध्या गोष्टी आम्ही जिव्हाळ्याने बोलत असतों एकमेकींशी ! त्या माझ्या मैत्रिणीविषयी मला विलक्षण जिव्हाळा वाटतो. इतका जिव्हाळा वास्तव सृष्टींतील माझ्या मैत्रिणींपैकी कुणाविषयींच वाटत नाही मला !

थंडीच्या दिवसांतील पहाटेच्या झोपेला कसलीच उपमा देता येणार नाही. पहाटेच्या वेळीं अंगावर रग घेऊन झोपण्यांत एक वेगळीच मौज असते पहाटेची साखरझोप - साखरेपेक्षा कितीतरी अधिक गोडी असलेली असते तिच्यांत ! अगदी अवीट असते तिची गोडी ! पहाटें लौकर उठून फिरावयास जाण्यापेक्षा सकाळपर्यंत अंगावर रग घेऊन निद्रादेवीच्या सहवासांतच राहण्यांत अधिक गोडी आहे मला तर हा मोह अगदी आवरत नाही. सूर्योदयापूर्वी उठून ज्यांना कामासाठी बाहेर जावे लागते त्यांच्याबद्दल मला सहानुभूति वाटते. त्यांची गोष्ट वेगळी. पण सूर्योदयापूर्वी उठलेच पाहिजे अशा नियमाने ज्यांनी उगीचच स्वतःला बांधून घेतले आहे त्यांची मनोवृत्तीच मला समजत नाही. खरी रसिकता लौकर उठून निसर्गाचें अवलोकन करण्यांत नाही. खरी रसिकता सूर्यवंशी होऊन निद्रादेवीच्या सहवासाचें सुख अनुभवण्यांतच आहे ! पहाटेच्या साखरझोंपेंत अंगावर रग घेऊन आपण अंथरुणावर पडलेलो असतांना कानावर आजीच्या भूपाळीचा स्वर पडला आणि त्यानें आपण जागे झालों तरी अंथरुणावर पडून राहण्यांत विलक्षण मौज वाटते.

अशी ही झोंप नाहीशी होणार असली तर माझ्यासारख्या व्यक्तीला खेद नाही होणार तर काय वाटेल ? विज्ञानाची जसजशी प्रगति होत गेली तसतशी अनेक अत्यंत उपयोगी व चांगल्या गोष्टीबरोबर अनेक हानिकारक गोष्टींचीहि वाढ झाली. त्यांतीलच ही एक होईल.

श्रमपरिहार करणाऱ्या, चिंतांना रजा देणाऱ्या, गोड स्वप्नसृष्टींत नेणाऱ्या व अशी अनेक सौख्यें देणाऱ्या या निद्रादेवीचा विरह म्हणजे काय साधीसुधी गोष्ट आहे !


सर्वोत्कृष्ट वक्तशीर व सुबक छपाई ....
करून मिळण्याचें जळगांवांतील एकच ठिकाण—
स्वस्तिक प्रिंटिंग प्रेस
[ जळगांव पू. खा. ]
एकवेळ ऑर्डर देऊन अवश्य खात्री करा.
★ तुमचा संतोष हेंच आमचें अंतिम ध्येय. ★




# त्यागांतील समाधान

ले. :- कु. सुशीला झवर
प्रथम वर्ष, कला.

९-९॥ ची वेळ असेल. सुलभा घरांतलं सारं काम आटोपून नुकतीच खिडकीशी येऊन उभी होती. साऱ्या दिवसाच्या कामाने थकल्याची जाणीव तिच्या चेहऱ्यावर दिसत होती. खिडकींतून येणारा चंद्रप्रकाश तिच्या श्रांत चेहऱ्यावर पडला होता. तिचा मूळचाच सुंदर असलेला चेहरा अधिकच खुलून दिसत होता त्या चंद्रप्रकाशांत खिडकीशी टेकून बाहेरच्या गंभीर शांततेकडे पहात कसल्यातरी गंभीर विचारांत गढून गेली होती ती.

गांवाच्या बाजूलाच असलेल्या एका चाळींतल्या दोन खोल्यां महत्प्रयासानें मिळवून त्यांत ती तिची सावत्र आई आणि दोघं भावंडं यांच्यासह रहात होती. तिचे वडील त्यांना तीन वर्षांपूर्वीच सोडून गेले होते. सुलभा मॅट्रिकच्या वर्गांतच होती तेव्हा. तिच्या वडिलांचा मृत्यु म्हणजे त्यांच्या कुटुंबावर वज्राघातच होता तो. त्यांचं कुटुंब खाऊन-पिऊन सुखी होतं. पण अचानकपणें झालेल्या या आघाताने मात्र त्यांचे अति नुकसान झालें होतें.

सलभा जात्याच हुशार अन् बुद्धिमान् होती. त्यामुळे आपला फारसा खर्च आईवर पडूं न देतां ती मॅट्रिक झाली. सुलभाला पुढे शिकण्याची खूप इच्छा होती; पण ती पूर्ण होणं शक्यच नव्हतं. घरची झालेली हलाखीची स्थिति, आईला होत असणारे कष्ट अन् लहानग्या दोघा भावंडांचं शिक्षण इत्यादि गोष्टीकडे पाहून आपण ही इच्छा मनांत बाळगणं वेडेपणाचं आहे हें तिला कळत होतं. खूप शिकावं, निरनिराळीं काव्यं वाचावीं, शास्त्रांचा अभ्यास करावा अशी जबरदस्त इच्छा तिच्या मनांत होती. पण या साऱ्यांचा त्याग करणं आज तिला भाग पडलं होतं. आपल्या साऱ्या इच्छा गुंडाळून, ध्येयाचा त्याग करून तिने आज नोकरी पत्करली होती.

ती ७-८ वर्षांची असतांनाच तिची सख्खी आई तिच्या धाकट्या भावंडांना ठेवून गेली होती. त्यावेळीं तिची सावत्र आई त्यांच्याशी प्रेमळपणें वागत असे. तिलाही आपल्या सख्या आईची आठवण फारच थोड्या वेळां येत असे. पण तिला सावत्र बहीण झाल्यानंतर ही परिस्थिति हळूहळू बदलत होती. सुलभेच्या सावत्र आईच्या वागणुकींत तुसडेपणा डोकावूं लागला होता. तिच्या वडिलांसमोर तिची आई त्यांच्याशी पूर्वीच्याच प्रेमळपणाने वागत असे. पण नंतर ही स्थिति टिकत नसे. वडिलांच्या निधनानंतर ४-६ महिने तिची आई तिच्याशी नीट वागे. आपल्या अंगावरचें जें किडूकमिडूक होते ते मोडून ७-८ महिने त्यांनी आपला चरितार्थ कसा बसा चालविला होता. मॅट्रिक झाल्यावर टायपिंगचा कोर्स पूर्ण केल्यावर सुलभाने नोकरी शोधायला सुरवात केली. सुदैवाने तिच्या प्रयत्नांना यश येऊन एक-दोन महिन्यांतच तिला ७० रु पगाराची नोकरी मिळाली

दिवसभर टायपिंगची कटकट सुलभेच्या डोक्याला असह्य होत असे; आणि एवढं करूनही घरीं आल्यावर मिळायला हवी ती शांतता तिला कधीच लाभत नसे. तिच्या आईचा स्वभाव दिवसेंदिवस अधिकच तुसडा अन् चिडखोर बनत चालला होता पतीच्या अचानक निधनाने तिच्या मनावर बराच परिणाम झाला होता व ती तेव्हापासून सारखी आजारीच असे. पण तरीही शांत पडून न रहातां तिची व्यर्थ बडबड, चिडणं चालूंच असे. पण सुलभा हें सारं शांतपणें सहन करीत होती. आपल्या आईची मनःस्थिति लक्षांत घेऊन ती शक्यतोंवर तिच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत असे !

पण इतकें करूनही सुलभा कांही कांही वेळां विषण्ण होत असे. आयुष्य हें कर्तव्यासाठी आहे हें तिला पटत होतं, पण त्यांत थोडीही मौज नसावी या विचाराने ती मधूनमधून उदास होत असे. विवेकाचा पगडा मनुष्याच्या मनावर कितीही असला तरी व्यावहारिक परिस्थितीच्या परिणामाने तो सैल होत नाही असें थोडेंच आहे ? एका प्रेमळ माणसाच्या शाबासकीच्या जोरावर कितीतरी कार्य अगदी सुलभतेने होऊं शकतें. पण आईच्या या रोजच्या कटकटींनी कांही कांही वेळां तिचें मन अगदीं उदास होऊन जात असें.

आजही याच खिन्न मनःस्थितींत ती खिडकीशी उभी होती हा सारा जीवन चित्रपट तिच्या डोळ्यापुढून सरकत होता अन् मधूनमधून तिच्या डोळयांत अश्रु जमा होत होते पण ह्या प्रकाराची तिला आता संवय झाली होती. आणि तरीही आज ती फारच खिन्न झाली होती. आज नुकताच घडलेला प्रसंग आठवून तिला सारखं रडूं येत होतें.

आज जरा उशिराच ती ऑफीसमधून आली आणि नंतर तिने कामाला सुरवात केली होती. तोंच आईचें रडणें तिला ऐकूं आलें. आश्चर्यचकित होऊन ती शेजारच्या खोलींत आली अन् बघतें तों पांघरुण घेऊन, भिंतीकडे तोंड करून तिची आई झोपली होती. तिला बरं वाटत नसेल असं तिला वाटलं अन् एखाद्या चांगल्या डॉक्टरचं औषध आपण तिला पैशाच्या अभावीं देऊं शकत नाही या विचारानं तिला वाईट वाटलं. पण ती तरी काय करूं शकणार होती?

तिने जवळ जाऊन आईला ताप आहे कीं काय तें पाहिलं अन् विचारलं, 'आई, काय होतय ग? केव्हा ताप भरला पुन्हा तुला?'

तिच्या या प्रश्नाचं उत्तर तर तिला मिळालं नाहीच पण तिचा हात झटकून तिची आई म्हणाली, 'चल, हो बाजूला! आता आठवण होती आहे तुला माझी. थोडी फार घरची काळजी आहे कां कांही तुझ्या मनाला? इतक्या उशीरा सुटतं होय तुझं ऑफिस? आई मेली तरी तूं आपली खुशाल चैन करत फीर गांवभर. कितीही केलं तरी सवतीची मुलगी तूं! तूं कशाला करणार आहेस माझी काळजी?'

तिच्या या बोलण्याने सुलभा दिङ्मूढ होऊन स्तब्ध उभी राहिली. तिचा तिच्या मनावर संयम राहिला नाही. तरी सुद्धा शक्य तेवढ्या शांतपणाने ती म्हणाली, 'आई, काय बोलतेस तूं हें? काय चैन केली आहे मी? माझ्या बरोबरीच्या मुली किती मौज करूं शकतात आणि मी कांही करीत नाही तरी तूं एवढं बोलतेस? मला कां वाटत नाही कीं तुला एखाद्या चांगल्या डॉक्टरचं औषध द्यावं? पण घरची परिस्थिति कां तुला कळत नाही? हे सर्व माहीत असूनही तूं असं बोलावंस?'

पण तिच्या या बोलण्याने तिची आई जास्तच चिडली व ओरडूनच म्हणाली, 'हो, माहीत आहे मला सारं! तूं नकोस तें मला शिकवायला. जा, चालती हो माझ्या डोळ्यासमोरून.' आणि नंतरचें तें तिचें रडणें, धुसफुस करणें जें चाललं होतं, तें पहायला सुलभा तेथे थांबली नव्हती

तिने काम आटोपलं. तिचा भाऊ व बहीण जेवून अभ्यास करीत होती. त्यांच्यासमोर आणखी तमाशा नको म्हणून आईला जेवायला बोलवावे कीं नाही हें तिला कळेना. पण तिला ताप असतांना ती जेवणार नाही असं स्वतःशीच म्हणून तिने कसेंबसे दोन घास खाल्ले. आईला कांही हंवय् कां म्हणून ती विचारायला गेली. पण तिच्याकडे वळूनही बघितलं नाही तिच्या आईनं. ती सुद्धा कांहीशा रागानेच परतली. तिच्या भावंडांनी बिछाने टाकले होते तीं आपल्यापरी तिला मदत करण्याचा प्रयत्न करीत असत. सकाळीं लवकर उठून अभ्यास करायची तीं. आणि म्हणूनच तीं आता लवकर झोपी गेलीं होतीं.

पायाला कळ लागली म्हणून तिच्या आपण फार वेळ झालं उभे आहोंत हें लक्षांत आलं. एक दीर्घ उसासा टाकून ती आंत वळली. 'चालायचंच हें असं आता किती दिवस सहन करावं लागेल देव जाणे?" असं ती पुटपुटली.

तिचीं दोन्हीं भावंडं किती शांतपणें झोपली होती. तिच्या मनांतल्या या खळबळीची त्या दोन चिमण्या जीवांना काय कल्पना असणार? पण वयाच्या मानानं खूपच समंजस होतीं तीं! तितकीच हुशारही होतीं. त्यांच्या शिक्षणाकरिता तिला फारसा खर्च करावा लागत नव्हता पण कांही कांही वेळेला त्यांच्या साध्या साध्या हौशी पुरवणंही तिला जड जात असे. पण दोघंही कधीच फारसा हट्ट धरीत नसत. इतकी समंजस अन् हुशार भावंडं मिळाल्याबद्दल तिला स्वतःचा खूप अभिमान वाटत असे. आताही तिचे उदास विचार क्षणार्धांत नाहीसे झाले, अन् त्यांची जागा या विचारांनी घेतली होती. तिच्या चेहऱ्यावरची खिन्नता नाहीशी होऊन अभिमानाने तो फुलला होता. त्या श्रांत चेहऱ्यावर समाधान पसरलं होतं. आप या कष्टाचं, आपल्या आशा-आकांक्षांचं चीज हीं भावंडं करणार याची तिला पुरेपुर खात्री होती. आपण लावलेल्या वृक्षाला फळं फुळं येणार अशी चिन्हं दिसत असतांना कुणाला आनंद होणार नाही? सुलभाही त्याच आनंदाने भारली गेली होती. आपल्या धाकट्या भावंडांचं भवितव्य घडविण्याकरिता तरी आपल्याला कष्ट केले पाहिजेत या विचाराने तिच्या मनांत एक नवीनच आनंद उत्पन्न झाला. त्या समाधानांत त्या आनंदांत केव्हा झोप लागली तेंही तिला कळलें नाही!



# बोलपटांनो! तुमची धन्य आहे!

[ लेखक— **रा. भा. सोनार** तृतीय वर्ष-शास्त्र ]

हे बोलपटांनो, तुमची धन्य आहे! साऱ्या जनतेला वेड लावण्याचं काम ह्या जमान्यांत फक्त तुम्हींच करून दाखविलं आहे. आम्हा आजच्या तरुणांना तुम्ही म्हणजे दैवत झाला आहांत 'आजचे तरूण' ही संज्ञा तुम्हींच आम्हाला मिळवून दिली. कोणत्याहि पुढाऱ्याने, कार्याने किंवा ध्येयाने आम्ही जितकें 'बदललों' नाहीं, तितकें तुम्ही आम्हाला कांही वर्षांत बदलून टाकले! कमाल नव्हे तर काय? तुमच्या कार्याला तोड नाही! एकादी गोष्ट लोकांच्या रोमरोमांत भिनते म्हणजे काय, याचं प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे तुम्ही! जगाचं नियंत्रण करणारी शक्ति, राष्ट्राचा अभ्युदय करणारे महान् लोक, उलथापालथ करणाऱ्या राज्यक्रांत्या ह्या साऱ्यांपेक्षा तुमची पकड आम्हावर जास्त आहे. धन्य तुमची करणी!

हे बोलपटांनो! तुम्ही आम्हाला काय दिलं नाही? जग कसं आहे, त्यांत रहावं कसं लागतं हें आम्हाला तुम्हीच नाही का शिकवीत? 'दुनियाको लात मारो, दुनिया सलाम करेगी' असे शंभर टक्के खरे उपदेश तुम्हीच आम्हाला देत असतां. अनुभवी लोकांच्यापेक्षा तुमचे 'लाखमोली' आदर्श पाळणं आम्हाला जास्त श्रेयस्कर वाटतं. जग हें आनंदाने जगण्यासाठी आहे, Life is to enjoy, enjoy it असें सांगणारे तुम्ही, तुम्हाला आम्ही कसें दूर लोटणार? अक्षरशः 'नाचत-कुदत' सांगितलेल्या तुमच्या वचनामृतांमुळे आमच्या आचार विचारांत बदल घडवून आणणाऱ्या बोलपटांनो, तुमची धन्य आहे! मानसशास्त्राचा गाढा अभ्यास केलेल्या लोकांना आमच्या मनावर जितका लवकर संस्कारी-परिणाम करता येणार नाही, तोच तुम्ही २-३ तासांत करून दाखवितां! पैशाची महती साऱ्यांना आता तुमच्यामुळेच कळूं लागली आहे. लहान मुलगाही आता म्हणूं शकतो, 'बाप भला ना भय्या भय्या, सबसे भला रुपया!' किती सहज असतं तुमचं शिकवणं. बोलपटांनो, तुमची धन्य आहे!

समाजाच्या गरजा वाढविणारी गोष्ट समाजाला कल्याणकारक होते, असं एका प्रसिद्ध लेखकाचं अर्थात् परदेशी) म्हणणं आहे. गरज वाढली की उत्पादनसाधनं वाढतात, लोकांना कामधंदा मिळतो, भांडवल पुढे येतं. बोलपटांनो, याचं जिवंत उदाहरण म्हणजे तुम्ही! किती लोक तुमच्यावर जगतात. कित्येकाचं तुम्हाला पाहिल्याशिवाय 'पोटच' भरत नाही! निर्माता, दिग्दर्शक, वितरक लेखक, संगीतदिग्दर्शक, छायालेखक, ध्वनिमुद्रक...... बबब! किती तरी नवीन 'जाती' तुम्ही निर्माण केल्या! अमुक लेखकाचा वाचक वर्ग ह्याऐवजी आता आम्ही म्हणतों अमक्या तऱ्हेच्या बोलपटांचा प्रेक्षकवर्ग! काम नसलेल्या लोकांना पैसे मिळविण्यापेक्षा वेळ मजेने घालविण्याचं तुम्ही म्हणजे साधन झाला आहात. केसांच्या तेलापासून तो पायांतील बूटापर्यंत तुम्ही आमच्या गरजा वाढविल्या नुसत्या वाढविल्या नाहीत तर त्यांत आपली कल्पकता (कच्चा परदेशी माल) ओतून 'फॅशन' नावाची मनपसंत चीज़ तुम्ही आम्हाला दिली! पाश्चिमात्य गोष्ट पौर्वात्यांच्या गळी उतरविण्यांत, हे बोलपटांनो, तुमचा हातखंडा आहे! हे बोलपटांनो, तुम्ही आमच्या शरीराच्या प्रत्येक भागावर सत्ता गाजविता! केस, मिशा, कपडे, आणि ओठ, कान, नाक, गाल, कपाळ ह्या सर्वांवर तुम्ही अप्रत्यक्षपणें अधिराज्य गाजवतां! भारत खेड्यांत पसरला आहे, त्या लोकांत जा, त्यांच्यांत नवीन विचारांचे वारे वाहूं द्या, हा नेत्यांचा उपदेश फक्त तुम्ही मनापासून पाळला आहे. आपलं काम करीतच तुम्ही आमची बुद्धि, जीभ आणि रहाणी हे ताब्यांत घेत असतां. आमच्यांत 'नखशिखान्त' बदल करणाऱ्या बोलपटांनो तुमची धन्य आहे!

कांही लोक तुमच्यावर किती टीका करतात! पण तुम्ही आहांत खरे निधड्या छातीचे! तुमचा बाणा तुम्ही कसचे सोडतां! टीका करणाऱ्यांच्या नाकावर टिच्चून तुम्ही थेटर भरभरून लोक आपल्याकडे

खेचतां. मालकाचा, निर्मात्याचा गल्ला भरतां. आमच्या गप्पांना १-२ दिवस पुरणारं खाद्य तुमच्याकडून आम्हाला मिळतं. रात्ररात्रभर आमच्या मनाचा 'ठाव' तुम्ही सोडीत नाही. स्मरणशक्ती वाढविण्याचं तुम्ही म्हणजे किती साधं-सोपं साधन! इतिहासांतील वेगवेगळ्या महान व्यक्ति, त्यांचे एकमेकांचे संबंध, त्यांचें कार्य ह्या साऱ्यांचा शाळा कॉलेजांतील शिक्षणामुळे आमच्या बुद्धीवर काय ठसा उमटेल? पण तुमचं मिळणारं शिक्षण? जुन्यांत जुन्या नटीपासून कालच्या न्यूफाईंड नव्यांपर्यंत सर्वांचे इतिहास' आमच्या लगेच लक्षांत रहातात. नटनट्यांचे 'संबंध' आम्हाला विचारा! कोणता सिनेमा कोणत्या सालीं किती आठवडे चालला, त्यांतलं सर्वांत जास्त 'चित्त' 'थरारक' नृत्य कोणतं, कोणतं गाणं कसं 'दिलफोडक' होतं हें सारं आमच्या लक्षांत रहातं! बोलपटांनो, काय हा तुमचा प्रभाव! बुद्धीचीं क्षितिजें वाढविणाऱ्या बोलपटांनो गाणेच्या गाणे लगेच पाठ होईल इतकी स्मरणशक्ति दांडगी करणाऱ्या बोलपटांनो, तुमची धन्य आहे!

बोलपटांमुळे राष्ट्राची हानी होते असे म्हणणाऱ्या दिल्लीच्या तेरा हजार स्त्रियांना काय म्हणावें? तुम्ही राष्ट्राची किती महान सेवा बजावीत आहात हें त्यांना दिसत नसावं! जनतेच्या खालच्या थरापर्यंत राष्ट्रभाषा हिंदीचा – हिंदुस्तानीचा म्हणायला पाहिजे – प्रचार करण्याचं काम मोठमोठ्या अखिल भारतीय संस्थांनाही जमलेलं नाही! हिंदीच्या परीक्षा तर सोडाच, पण त्या देतां न येणाऱ्या निरक्षर लोकांनाही हिंदुस्तानी बोलायला लावणाऱ्या बोलपटांनो, तुमची कमाल आहे! ६-६ वर्षांच्या मुलालाही त्या भाषेंत गाणं यायला लागणं, ह्यांत तुमचंच कौशल्य दिसतं! हिंदीचं एकही पुस्तक न उघडतां त्या भाषेचे कितीतरी शब्द तुम्हीच आम्हाला आत्मसात करायला लावले आहेत. ते शब्दही कसे, नेहमीच्या उपयोगांतले दील, दर्द, प्यार, मुहब्बत, जवानी, धडकन्, बालम, साजन, असले शब्द आणि गमका फसाना, दिलकी कुर्बानी, तीरकी चोट, असे शब्दप्रयोग तुमच्या प्रभावानेच नाही का आम्हाला मिळाले? इंग्रजीची जागा हिंदीने घेतली पाहिजे असे दिल्लीचे लोक येथे येऊन सांगत असतात. पण बोलपटांनो, तुम्ही तें काम आमच्याकडून सक्रीय करून घेत आहांत! साध्या बोलण्यांतहि आता उर्दुमिश्रित हिंदी आम्ही धडाधड बोलत असतों! चुकलों तरी आम्ही म्हणतो 'हयँ! हम हिंदुस्तानी बोलते है!' बोलपटांनो ही सारी तुमचीच जादू! यक्षिणीची कांडी घेऊन येणाऱ्या बोलपटांनो तुमची धन्य आहे!

स्वातंत्र्यानंतर तरुणांना ध्येय उरलं नाही. ह्यांच्या डोळ्यासमोर कांहीतरी नेहमी हवं, ही नेत्यांची मागणी तुम्हीं किती जिव्हाळ्याने आपल्या शिरावर घेतली आहे! किंवा, आधीपासूनच पूर्वसिद्धतेने कार्य सुरू करून तुम्हीं आपली दूरदृष्टीच नाही का व्यक्त केली? बोलपटांनो, तुम्हीं दाखविलेले मार्ग आम्ही फार लवकर हाताळतों हा तुमचा किती महान गुण! नीटनेटकं रहाणं, स्त्रीदाक्षिण्याला केव्हाही उतूं जाऊं देणं, नजर नेहमी 'शोधक' आणि वाणी 'बोधक' ठेवणं, हे व असेच हल्लींच्या दिवसाला उपयोगी सभ्यतेचे धडे तुम्हीच आम्हाला शिकविता 'धक्के' देऊन समाजात खळबळ माजवणाऱ्या आणि सामाजिक जीर्ण बंधनें ताडकन् तोडून टाकणाऱ्या गोष्टी करण्याची स्फूर्ति आम्हाला तुम्हीच देतां. प्रेमविवाह, घटस्फोट, विचारस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष स्वातंत्र्य वगैरे वगैरे गोष्टी तुम्ही आम्हाला लगेच शिकवतां. जातिबंधनें समाजाला किती विघातक असतात, हे नटनट्यांचे संबंध, त्यांचीं बोलपटांतील कामें पाहून, आम्हाला पुरेपूर पटतं. मुसलमान नटी कुंकु लावते, लग्नांत सप्तपदी करते, हिंदू नटी मुसलमान नटाच्या घरीं भाकरी भाजते असलीं दृश्यें पाहिलीं म्हणजें आमचं सळसळतं रक्त सारी जातीबंधनं थेटरमधेच सोडून देते. हरिजन नट्या पार्वती, सीता बनलेल्या पाहि या की धार्मिक बंधनं आम्हाला नकोशी होतात. गर्भश्रीमंत माणसांची आपल्या शेजारच्या गरीब स्त्रीवरील प्रेमार्द्रदृष्टी, हे बोलपटांनो ज्यावेळीं तुम्ही दाखवतां, बादशहाचा बेटा एखाद्या रस्त्यांतल्या मुलीसाठी बापाविरुद्ध बंड करतांना जेव्हा आम्ही पाहातों, त्यावेळीं आमच्यांत उच्चनीच भाव उरत नाही! फक्त २ फुलांच्या मालांनी होणारे विवाह पाहिलें कीं हुंड्याचा हंडा आम्ही जमिनींत गाडून टाकतो! प्रत्यक्षांत आम्ही काय करतों हे पहाणं आमचं काम, असं समजून तुम्ही किती निरलसपणें आपलं काम करीत असतां? खरंच बोलपटांनो, तुमची धन्य आहे! कोणताहि धंदा करण्यांत कमीपणा तो कसला, हे छातीठोकपणें तुम्हीच आम्हाला सांगतां! नायकिणीच्या तमाशांत ढोलकं



वाजविण्यापासून तो बूटपॉलीश करण्यापर्यंत सारे धंदे सारखेच, हें महान तत्त्व तुम्हीच आम्हाला समजावून देतां! शहरांत डिग्री घेऊन, खेड्यांत जाऊन, एखाद्या जमीनदाराचा-शेतकऱ्याचा नव्हे-जावई होऊन (तुमच्या म्हणण्याप्रमाणे त्याची मुलगी सुंदर असतेच) शेती करण्याचा आदेशही द्यायला तुम्ही कमी करीत नाहीं! चोऱ्यामाऱ्या करणाऱ्या दरोडेखोरावर कुलीन स्त्रियांचं प्रेम बसणं अगदी साहजिक आहे, प्रेमाच्या राज्यांत कांहीही चालतं, हें सारं तुम्हाशिवाय सांगण्याची हिंमत कोणांत आहे! बोलपटांनो, आपलं म्हणणं आमच्या माथीं सहज मारण्यासाठी तुम्ही किती प्रयास घेतां! टेक्नीकलरमधे येतां, गेव्हाकलरमधे, थ्रीडीमधे आमचे 'सेन्सेशन' जागवतां! बोलपटांनो! तुमची धन्य आहे!

हे बोलपटांनो, तुमची 'गति' धन्य आहे. तुम्ही सर्वगामी आहात. २-३ हजार वस्तीच्या गांवापासून ते ३५ लाखाच्या महानगरापर्यंत तुम्हाला कुठे मज्जाव नाही. शाळेच्या सभागृहापासून तो राष्ट्रपतीभवनापर्यंत तुम्हाला मोकळीक आहे. तुमच्या उत्पत्तीस्थानापासून ७०० मैल लांबीपर्यंत तुम्ही तुमचा प्रभाव पाडतां! अहो लोक तुमची वाट पहात असतात. इतक्या आतुरतेने कोणी कोणाच्या येण्याची सार्वत्रिक चर्चा करीत नसेल! धन्य तुमचें भाग्य! बोलपटांनो, तुम्ही सर्वव्यापी आहांत! सकाळच्या प्रहरीं नळावर तुमचं नांव घेतलं जातं! निरुपा रॉय विषयी ती चर्चा असते न्हाव्याच्या दुकानांत न्हावी दाढी करतांना आपल्या गिऱ्हाइकाशी कक्कूच्या डान्सविषयी बातचीत करीत असतो. शाळेंतील मुलें घंटा होईपर्यंत नादीयाच्या हाय जम्प्स आणि दणादणीची मुठी आवळून वर्णनें करीत असतात कॉलेजांतील आम्ही मुलं शंकर जयकिसनच्या संगीताची बहार खिडकींतून दूरवर पहात लुटीत असतो. कोणी नट्यांच्या सॉलिड जॉमेट्रींत गर्क असतात मिलच्या खडखडाटांत आज कोणता नवीन बोलपट लागला असे प्रश्न होत असतात. काय तुमची प्रसिद्धी! टेलिफोनवरून बोलणं चालू असतं. 'हॅलो डीअर, आज शामको छे बजे, नटवर टॉकीज!' सरकारी ऑफिसांतून प्यून घरीं निरोप नेतो. 'बाईसाहेब, आज सिनेमाला......'! सर्वांच्या अंगांत वारं संचारतं! तहानभूक विसरायला लावणाऱ्या बोलपटांनो, तुमची धन्य आहे! बोलपटांनो, तुम्ही सर्वज्ञही आहांत. तुम्हाला कोणत्याहि विषयाची माहिती असते. किती नानाविध असतं तुमचं ज्ञान! तुम्ही आकाशांत भराऱ्या मारतां, समुद्राच्या छातीवर नाचतां, घनदाट जंगलांत भटकतां आणि पर्वतावर विहार करतां! ईश्वराचीं सारी लक्षणं तुमच्याजवळ आहेत. सर्वव्यापी, सर्वगामी, सर्वज्ञानी आणि सर्वांच्या अंतःकरणांत वास करणाऱ्या बोलपटांनो, तुमची धन्य आहे!

तुम्ही किती लोकांवर किती उपकार करतां! तरुण तरुणींना शृंगाररसाची गोडी प्रॅक्टिकलसह चाखवतांना तुमचं कौशल्य उतूं जातं! राजेशाही थाट, बादशाही वैभव, स्वर्गीय दृश्यें, रंभा तिलोत्तमा यांचं सौन्दर्य हे सर्व दाखविण्यांत तुमचा हातखंडा आहे. ५-१० आण्यांत देशाचं पर्यटन, धार्मिक स्थळांची यात्रा तुम्ही आमच्या घडवून आणतां! पुस्तकांतील कल्पनेच्या भराऱ्या तुम्ही प्रत्यक्ष दाखवितां. कमाल आहे तुमची! वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने तुम्ही अडवतां. तुमच्यामुळे वृत्तपत्रांना कांही तरी अर्थ मिळतो! एका दगडांत तुम्ही दोन पक्षी मारतां. वृत्तपत्रें लोकांना घेण्याची सवय लावण्याचं महान कार्य तर करतांच पण त्याबरोबर आपला झगमगाटही तुम्ही दाखविता! तुमच्यासाठी वाहिलेलीं (वाहत गेलेलीं नव्हे) कित्येक नियतकालिकें आहेत. ही तुमची थोरवी! हे बोलपटांनो, तुम्ही जाहिरातदारांचा अमाप फायदा करता. निम्मी म्हणते, लक्स साबू माझी त्वचा मुलायम करतो., वैजयंतीमाला म्हणते, कॉमिनीया हेअर ऑईलने माझे केस लांबसडक बनतात. लोकांवर त्यांचा भारी प्रभाव! बोलण्याचालण्याच्या मॅनर्स तुम्ही आम्हाला शिकवितां! तुमचा आमच्यावर किती परिणाम! या बसा, किंवा वेलकम् याऐवजी 'ओ, आप है, पधारीये, तशरीफ रखीये' असें आम्ही बोलूं लागलों आहोंत. कोणत्या वेळीं कसं बोलावं याचं अचूक ज्ञान तुम्हीच आम्हाला करून देतां. मित्राचा चेहरा उदास दिसला की आम्ही म्हणतों. 'क्यो, दिलका मकान सूना लग रहा?' त्याची कळी लगेच खुलते! काय जादू! बोलपटांनो तुम्ही काय करणार नाही? बस्स! तुमची धन्य आहे!

एवढं सारं करून सरकारला लाखो रुपये, नव्हे करोडो रुपये घरबसल्या देणाऱ्या बोलपटांनो तुमची धन्य आहे!

# भविष्याचे पाठिराखे

[ लेखक— शं. बा. कुळकर्णी प्रथम वर्ष–कला. ]

संध्याकाळीं सहा वाजतां रोज आनंदी अन् उत्साही मनानं घरीं येणारे गुंडोपंत आज जरा लवकरच आणि चिंताक्रांत चेहऱ्याने आल्याचें पाहून मला आश्चर्य वाटलें. डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना. कांहीतरी भयंकर वेगळेपणा मी पाहात होतों. मी पेपर घेऊन ओटीवर वाचीत बसलों तोंच ते आले आणि जरा गूढपणें मला म्हणालें, "अरे, आजचें तें मेहेरबाबाचें भविष्य वाचलें कां?'

वास्तविक मला भविष्याशीं कांही कर्तव्य नव्हतें. मला आपलीं राजकारणी लोकांचीं खुसखुशींत भाषणें, हवामान वगैरे विषयींची आवड! कोडीबहाद्दर ज्याप्रमाणे कोड्यांच्या चौकटी ह्याच आपलें विश्व मानतात आणि राजकारणी पक्ष प्रचलित राजवटीच्या चुकांवर भक्ष्यांवर टपून बसलेले असतात तसें या कचेरींतील कारकुनाला काय हवें होतें? मला वाटलें नोकरकपातीविषयीं......! पण गुंडोपंताच्या भविष्यप्रियतेचा मासला अजब वाटला खरा!

आणि गुंडोपंतांना त्याच्या वर्गांतील लोकांना आपल्या कागदी अगर तोंडीं 'भविष्यांसाठी' तीं सांगणाऱ्या लोकांचे उंबरठे झिजविणाऱ्या लोकांना काळजींत टाकण्यासारखें तें भविष्य होतें. तुफान सागरांत एकाद्या बोटीला ढकलून दिलें जावें तशी त्यांची त्यांच्या मनाची अवस्था झाली होती.

काय भविष्य होतें?......

हो, म्हणे बावा म्हणतात, "येत्या सहामाहींत निद्रिस्त ज्वालामुखी जागृत होतील, आगी लागतील, तिसरें महायुद्ध होईल आणि याचा परिणाम......! तर सारी मानवजात नष्ट होईल. मला गुंडोपंतांच्या निराशेचें कारण उमजलें.

मृत्यु!

किती भयंकर. आणि तो प्रत्यक्ष नाही म्हणून बरें! तर केवळ त्या पत्रांतील चार ओळींतील 'भविष्या'-नेच कित्येक भविष्यप्रिय लोकांना केवळ काल्पनिक मृत्यूने किती हवालदील करून सोडलें बिचारे आपल्या उज्ज्वल, फायदेशीर "भविष्या"च्या आशेने गेलेले सारे भविष्यांचे पाठिराखे आज त्या भविष्याच्या भयंकरतेमुळे निराशेच्या खाईंत लोटले गेले.

अरेरे!

मानवी मन अजब आहे खरें. भविष्याच्या पोटांत आपल्यासाठी काय वाढून ठेवलें आहे तें जाणून घेण्याची तीव्र इच्छा त्याला असते. आणि मग तें...... तें आपल्या संवेदनाक्षमशील स्वभावाला विसरून अशा निराशेने मुग्ध होऊन जातें. गुंडोपंत निघून गेल्यावर मला हसूं आलें तें त्यांच्या या अजब आवडीचें.

ज्योतिषशास्त्रावर माझा संपूर्ण विश्वास आहे. पण त्याला व्यवहारांतील चलनी नाणें बनविणाऱ्या या 'भविष्य' शास्त्रावर मात्र नाही. विश्वांत नवग्रह आहेत आणि पृथ्वीवर तर अनेकांचे अनेक 'ग्रह' आहेत. आता पहा "लोकसत्तेतील 'मकर" राशीचें 'भविष्य' गांवकरींतील 'वृषभ' राशीशीं जमतें तेव्हा या सायनाचार्य विषयीं पहा कसे ग्रह होतील ते. म्हणजे या दोन्ही सायनाचार्यांच्या त्या भविष्यांत देखील मगर आणि बैलाइतके अंतर असतांना त्यांच्यावर विश्वास ठेवावा तो कसा? माझा खाक्या दुसराच आहे.

आज चांगलें भविष्य ज्या राशीला असेल तीच माझी राशी होते. पण मला भविष्याची आवड आहे असा मात्र ग्रह–गैरसमज करूं नका हं! पण मला वाटतें हें माझें करणें तरी भविष्याविषयींच्या माझ्या अविश्वासाचीं प्रतिकें नाहीत कां? म्हणूनच त्या दिवशीच्या एका फेरीवाल्या ज्योतिषाने अगदी मेहेर-



बाबांच्या उलट भविष्य सांगितलेलें पाहून गुंडोपंतांची आठवण झाली आणि मी मनाशीं म्हणालों, 'गुंडोपंत येथे हजर असते तर?

"सुंठेवाचून खोकला जावा" तशी गुंडोपतांची निराशा पार नाहीशी होऊन ते परत आनंदी झाले असते.

आमच्या येथें एक भटजी येत असतात. ते मला नेहमी माझा तळहात दाखवायला सांगतात. आणि त्या तळहातावरील रेषावरून विधिलिखिताचे धागे जुळवून सांगण्याचा प्रयत्न करतात. म्हणे "शनीच्या दर्शनाला जात जा."

कां? तर शनीची साडेसाती जावी म्हणून. म्हणजे शनी हा ग्रह आमच्या पृथ्वीपासून इतक्या दूर असूनही त्याचें हें साडेसातीचें कर्ज आपल्यावर कां? आणि तें फेडण्यासाठी दररोज शनीच्या मंदिरांत तेल घेऊन जावें तें कशासाठी? याचा विचार अर्थात मी करीत बसलों नाहीं.

पण माझ्या जागेवर जर चुकून गुंडोपंत असते ना? तर त्यांनी शनीचा ऋणको म्हणून तें काम आनंदाने पत्करलें असतें.

यंदा काय तर वक्री मंगळ आहे म्हणून "पाऊस पडणार नाही, रोगराई वाढेल इ. इ." तर मग काय यंदा संक्रांत हत्तीवर आहे म्हणून हत्तीरोग जडेल? अहो सूर्यांच्या संक्रमणाचा आणि या रोगाचा कांही एक संबंध नसतांना असें भविष्य तुम्ही कसें सांगतां? पण जगांत चाललें आहे तें असें.

परवाचीच गोष्ट घ्या ना! माझ्या मित्राने एका उपवधू मुलीला नापसंत केलें. मुलीला 'मंगळ' हवा. कारण त्याला मंगळ होता. हें काय विचित्र! या भविष्यांच्या राज्यांत इतर गुणांना दुसरें स्थान मिळतें. मला हसूं येतें तें या विचित्र भविष्यांच्या पाठीस लागून सुंदर रत्नांना गमवून बसायच्या कृतीचें! आणि समजा मंगळ ते पृथ्वी असा एक वायुमार्ग शास्त्रज्ञांनीं येत्या दोन वर्षांत शोधून काढला आणि रहदारी सुरू केली तर!...... तर त्या मंगळावरील मुलींशीं बेटीव्यवहार आपले पृथ्वीवासीय करणार कीं नाही?

आणि जेव्हा जेव्हा मला माझा एक मित्र अगदी छातीठोकपणें सांगतो कीं, "भविष्यें हीं जीवननौकेला दीपस्तंभांप्रमाणे आहेत" तेव्हा मी उत्तरतों "ती जलमिश्रित तेलावर चालणाऱ्या दिव्यांची आहेत. मार्ग दाखविण्याची शाश्वती नाही. चांगल्या भविष्यांनी एक आनंदित होतो तर दुसऱ्याच वेळीं वाईट भविष्य वाचून तो निराश होतो.

'अपघात घडेल, जपून प्रवास करा" असें वाचल्याबरोबर ते दिवसभर घराबाहेर पडणार नाहीत आणि त्याबरोबर दिवसांतील अनेक मजांना ते मुकतील. तो अपघात खरा ठरो अगर खोटा ठरो पण हे भविष्यप्रिय लोक मात्र आपल्या दैनंदिन जीवनाला जरा विचित्रच कार्यक्रम देऊन त्यांत व्यत्यय मात्र आणतात. आणि याच्या अगदी उलट प्रकार– 'चांगलें भविष्य" वाचून घडतो. "फायदा" वगैरे विषयी वाचले कीं शेजारचा शिवा अशा चौकटी (?) भरून पाठवितो कीं विचारूं नका.

म्हणजे या भविष्यांच्यावर विसंबून कांही लोक आपला दैनंदिन, साप्ताहिक एवढेच नव्हे तर वार्षिकसुद्धा– व्यवहार करीत असतात. कोठेही जा. एखादा अशिक्षित असूनसुद्धा आठवड्याच्या राशिभविष्यासाठी साप्ताहिक वर्तमानपत्र विकत घेत घेत असतो आणि तें दुसऱ्याकडून वाचवून घेऊन आपली मनीषा पूर्ण करीत असतो.

वर्तमानपत्रांचा खप इतका कां वाढला? त्याला कारण आमचे भविष्यप्रिय लोकच ना? या वर्तमानपत्रांची राशि कोणती असेल? उज्वल भविष्य आहे बेट्यांना! यांची संघटना ही फार मोठी आहे. भारतांतील बहुसंख्य वर्ग म्हणून भविष्यप्रिय लोकांकडेच बोट दाखविता येईल.

ज्यावेळीं दोन भविष्यामध्ये दोन ध्रुवाइतके अंतर असते त्यावेळीं हंसावें कीं रडावें तेंच समजत नाही. तरी पण हे भविष्यप्रिय लोक दोघांमधून आपल्याला किफायतशीर असे उचलून घेण्यांत पटाईत असतात म्हणा! परवाच पहाना. एका पत्रांत गुंडोपंतांच्या मकर

राशीला ‘प्रवास घडेल’ असें लिहिलेलें होतें. तर दुसऱ्यांत अपघात संभवतो असें लिहिलें होतें. तेव्हा गुंडोपंतांनी काय केलं असेल अशी तुम्ही कल्पना करता बरं? दुसरी बाब उचलून त्यांनी प्रवासास जाण्याचें टाकलें.

प्रत्येकाला भूत, वर्तमान आणि भवितव्य आहे. वर्तमानाचें भूतांत, आणि भविष्याचें वर्तमानांत रूपांतर करीत दिवस रजा घेत असतो. तेव्हा अशा कागदी भविष्यावर विसंबून उज्वल भविष्यांतील अमूल्य रत्नांना कदाचित मुकण्यापेक्षा त्यांच्यावर विश्वास न ठेवलेला बरा नव्हे काय? भविष्याचा हा कृष्णमेघ उत्साहाच्या बालसूर्याला जर झाकोळण्यास निघाला असेल तर डोळस दृष्टीच्या फुंकरीने त्याला बाजूला सारणें रास्त नाही का होणार? रात्रीच्या गर्भांत उद्याचा उज्ज्वल भविष्यकाल दडला असल्याची ग्वाही अंतर्मनांत ठेवून असल्या कागदी अन् लबाड विधानांवर इतःपर विसंबून न राहाणेंच योग्य.

तेव्हा भविष्यें हीं भोंदू लोकांनी काळावर केलेलें शुद्ध विडंबन आहे. आणि त्याचे गुंडोपंतासारखे पाठिराखे खरोखरच वेडे असून आपल्या भवितव्यांतील अमूल्य रत्नांना मुकण्यांत त्यांच्या हातून चूक होत आहे. जीवन हें सुखदुःखांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणलें जाणारें जाळें आहे असें थोर साहित्यिक म्हणतात, त्यांत आणि या कागदी भविष्यांना जागा देऊन ते अधिकच निगूढ करणाऱ्या या भविष्यवाद्यांना काय म्हणावें बरें?

---


**नेवे ब्रदर्स, बुकसेलर्स**

जळगांव, पू. खा.

आमचेकडे सर्व प्रकारचीं शालोपयोगीं, बालवर्ग, एस्. एस्. सी. व कॉलेजपर्यंतचीं पुस्तकें व सर्व प्रकारची शालोपयोगी स्टेशनरी, ऑफिस स्टेशनरी व सायक्लोस्टाईल करितां लागणारे स्टेनसिलपेपर, कॉर्बनपेपर इत्यादि सामान योग्य भावाने मिळेल.

पत्ताः— नेवे ब्रदर्स बुकसेलर्स, जळगांव, पू. खा.

**नेवे ब्रदर्स, बुकसेलर्स ब्रँच नं. १**

**शारदा बुक डेपो**

जळगांव, पू. खा.

आमचेकडे सर्व प्रकारचीं शालोपयोगीं, बालवर्ग, एस्. एस्. सी. व कॉलेजपर्यंतचीं पुस्तकें व सर्व प्रकारची शालोपयोगी स्टेशनरी, ऑफिस स्टेशनरी व सायक्लोस्टाईल करितां लागणारे स्टेनसिलपेपर, कॉर्बनपेपर इत्यादि सामान योग्य भावाने मिळेल.

पत्ताः— जयस्तंभाजवळ जळगांव, पू. खा.




# अखिल-महाविद्यालयीन मंडूक संमेलन १९५४

[ लेखक— ना. सी. पाटील चतुर्थ वर्ष-विज्ञान ]

[ स्थळः- कॉलेजजवळील बॉटनीगार्डनमधील हौद. वातावरण – सगळीकडे भयाण शांतता पसरली आहे. सगळ्यांचीं तोंडें काळजीने काळवंडलीं आहेत त्यांच्यांतील श्री. डोळस सुरवात करण्यास उभे राहातात व संमेलनास सुरवात होते. ]

माझे मंडूक बंधुभगिनींनो, आज आपण येथे मोठ्या संख्येने हजर आहांत यावरूनच तुमची आपल्या समाजाविषयीची निष्ठा दिसून येत आहे. आपण ज्या एका ध्येयाने प्रेरित होऊन येथे जमलों आहोंत अशाच एकीने आपण पुढे जाऊं या. आजच्या संमेलनाला आपल्याला योग्य असेच अध्यक्ष लाभले आहेत. त्यांची ओळख करून देणं म्हणजे एक ‘मंडूकायन’च होईल परंतु मी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करतों. आजचे अध्यक्ष श्री. लांबटांगे हे नुकतेच येथल्या बायॉलॉजीच्या प्रयोगशाळेंतून (‘शाळा’ हा शद्ब चुकून दिला गेला असावा असें मला वाटतें. कारण आपलं जेथें मरण ओढवतं ती शाळा कसली?) मोठ्या शिताफीने सुटून आले आहेत. अध्यक्ष महाशय तो प्रसंग स्वतःहून सांगणार नाहीत. कारण त्यांना माणसाप्रमाणे स्वस्तुति करणं कधीच आवडत नाही. तेव्हा मीच तो प्रसंग सांगतों. त्या प्रयोगशाळेंतील प्यूनने आज क्लोरोफॉर्म थोडा दिल्यामुळे त्यांना थोडी ग्लानी आली (अर्थात् तें त्यांना त्यावेळेस समजत नव्हतें.) परंतु त्यांचं दैव खडतर असल्यामुळे ते लवकर शुद्धीवर आले व तो हडकुळा प्यून टांचण्यांनी यांना पक्के करीत असतांनाच यांनी आपली शक्ति एकवटून खिडकींतून खाली उडी मारली व ज्याप्रमाणे एखादा दे. भ. तुरुंगांतून सुटून यावा त्या आवेशाने ते येथे हजर झाले आहेत. त्यांचें वैशिष्ट्य म्हणजे ते लांबपल्याची उडी मारण्यांत पटु आहेत. या बाबतींत त्यांचा ‘पाय’ धरणारा कुणी नाही आणि म्हणूनच आज त्यांचा पुनर्जन्म झाला आहे त्यांनी जें धाडस दाखविलं तें आपल्यासारख्या येरागबाळ्याचं काम नव्हे. असो, त्यांचें गुणवर्णन करायला माझी ही उलटी जीभ माणसाप्रमाणे सरळ झाली तरी तें संपायचें नाही. तेव्हा, मी आपला अधिक वेळ न घेतां अध्यक्ष महाशयांनी भाषणास सुरवात करावी अशी विनंति करतों.

(अध्यक्ष महाशय बोलावयास उभे राहातात. लहान पोरें काठावरून पाण्यांत सुरकांडी मारून डोके वर काढून बसतात.)

माझे मित्रांनो, आजची आपली स्थिती किती बिकट आहे याची प्रत्येकाला जाणीव आहे. आज जगांत आपली किती हानी होत आहे? आज तेंच मीं डोळ्यांनी पाहिलं. आणि आज मीं जें दिव्य केलं त्याचं कारण हेंच. त्या प्रयोगशाळेंतील वातावरण पाहून तर माझी छातीच बसली आपल्या बांधवांची प्राणासाठी चाललेली धडपड पाहून मला मनुष्य जातीबद्दल अत्यंत चीड आली. आणखी एक महत्वाची गोष्ट माझ्या कानावर तेथे आली दोन प्यून कसल्या तरी बातमीवर मोठ्याने हंसत होते मी कान देऊन ऐकूं लागलों तेव्हा कळलं कीं, सिंगापूर येथे काळे व गोरे बेडूक यांचं युद्ध चालू होतं व तेथील लोक हे अशुभ समजतात. मला फार वाईट वाटलं तें ऐकून. झगडावं कोणाशी हे देखील त्यांना कळत नाही. आज आपल्यावर कोणाकडून संकट आलं आहे? या प्रयोगशाळामधून आपले बांधव मृत्युमुखी पडत आहेत, किती बांधवाचे बळी पडत आहेत याची त्यांना कल्पना नसावी. आणि आपलं मरण कशाकरिता तर डॉक्टर्स निर्माण करण्याकरिता! डॉक्टर्स कशाकरिता तर माणसांची मृत्युसंख्या कमी करण्याकरिता!! खासा न्याय! स्वतःच्या जीवनासाठी दुसऱ्याचं मरण ओढवावयाचं. आता आपल्याने हें सहन व्हायचं नाही. ‘भूतदया’ ‘भूतदया’ म्हणून हे उपदेश करतात आणि पहावं तर कोरडे पाषाण. आपल्या जिव्हा उलट्या आहेत तर माणसांचीं काळजं उलटीं आहेत. हो, आणि पुष्कळदा ते ‘उलट्या काळजाचा’ म्हणून शब्दप्रयोग वापरतात त्यावरून एकजात सगळ्यांची काळजं उलटी असलीं पाहिजेत त्याशिवाय इतकी

निष्ठुरता कशी? जिभा सरळ पण काळीज उलटं! दुसऱ्यांचा जीव म्हणजे कांहीच वाटत नाही त्यांना! आमच्या जीवाची किंमत काय फक्त 'सहा आणे'! (अपमान! अपमान!!) तेव्हा याचा अगोदर आपल्याला प्रतिकार करावयाचा आहे.

वास्तविक पहातां आपण त्यांच्यापेक्षा गुणांनी श्रेष्ठ आहोत. पावसाळ्याच्या सुरवातीस दरवर्षी आपल्या अंगावर जी पिवळी धमक कांति चढते आणि शरीर कांतीने झळकूं लागतं. तशी कांति आयुष्यांतून एकदां तरी चढते का माणसाला? (हुर्यो? हुर्यो??) आणि वर फुकट बडेजाव. कालपर्यंत आपण सुखी होतों. परंतु हें विज्ञानयुग आलं आणि आपलं मृत्युयुग सुरु झालं. दोघांच्या शरीररचनेंत साम्य सापडलं म्हणून आम्हाला शिक्षा! मऊ दिसलं म्हणजे माणूस कोपरानंहि खणायला लागतं. लहानपणापासून माणसाची आपल्या विषयीची दया (?) किती आहे हें दिसतें. त्यांचं लहानसं पोर बघा. आपण दिसलों की, त्यानं खडा मारलाच आणि हीं मोठीं माणसं या लहान मुलांना बालबोध पुस्तकांतून उपदेश करतात की 'प्राण्यावर दया करा' व मोठेपणी जिवंत मारतात! प्रोफेसर्स त्यांना मारावं कसं याचं शिक्षण देतात म्हणे? किती पवित्र (?) शिक्षण आहे नाही? 'जीवनशिक्षण' नव्हे, 'मृत्युशिक्षण' आहे हें! आणि याचा आपल्याला नायनाट करायचा आहे. नुसते पुरुषच कठोर नाहीत तर त्यांच्या स्त्रियासुद्धा. त्यासुद्धां इतक्या कठोर कशा बनतात? आश्चर्य वाटतं! तिला ते 'कोमल हृदयी' अशी उपमा देतात. कसलं कोमल हृदय तिचं. नुसता भास आहे तो. (टाळ्या) असो! तर आपल्यावरचं हें संकट नाहीसं करण्याकरितांच आपण येथे जमलों आहोंत. प्रथम आपल्याला शांततेच्या मार्गाने प्रयत्न करावयाचे आहेत. तत्पूर्वी मला आणखी कांही गोष्टी सांगावयाच्या आहेत. त्या ह्या कीं, आपल्या प्रयत्नांचा निकाल लागेपर्यंत सगळ्यांनी मौनव्रत धारण करावयाचें आहे. 'डरॉंव' हा शब्द पुढील क्रांतीचे वेळेस वापरावयाचा आहे. कारण त्याचा अर्थच 'भीति दाखवणें' असा आहे. तेव्हा त्याकरिता कांही ठराव येथे पास करायचे आहेत. ते खालीलप्रमाणेः—

(१) एक 'मंडूक संरक्षण मंडळ' स्थापन करणें. हें मंडळ प्रिन्सिपॉल साहेबाकडे वाटाघाटीसाठी जाईल. त्या मंडळाबरोबर सगळ्यांच्या सह्यांचा विनंति अर्ज असेल. त्यावर 'जीवनदान हेंच खरें दान' असें शीर्षक राहील. त्यांतील कांही मागण्या खालील प्रमाणेंः—

(२) तुमचें कॉलेज भूतदयेच्या मार्गावर चालवावयाचें असेल तर तें तुमचें बायॉलॉजी डिपार्टमेंट (खातें) म्हणजेच आमचें 'मृत्यूखातें' ताबडतोब बंद करा.

(३) तुम्हाला डॉक्टर्सच निर्माण करावयाचे असतील तर त्यांना वनस्पतिशास्त्राचं शिक्षण द्या व कॉलेजमध्ये फार तर आयुर्वेदशास्त्र खातें काढा म्हणजे डॉक्टरांचे वैद्य बनवा.

(४) बायॉलॉजी डिपार्टमेंटमधील प्रयोगशिक्षक, व प्यून यांना बेकार ठेवून बेकारींत भर न पाडतां त्यांची दुसरीकडे नेमणूक करा. जर ते 'बेकार' राहिले तर ते घरींच 'माशा मारीत' बसतील. (हंशा) व त्यामुळे विनाकारण माशांची आमच्या सारखीच शोकजनक स्थिति होईल.

(५) आम्हाला जीवनदान देण्यासाठी आमची या हौदांतून सुटका व्हावी व इतरहि प्राण्यांची पण सुटका करावी

(६) या बॉटनी गार्डनमधील हा हौद बुजवून टाकून त्या ओट्यावर एक भव्य देऊळ बांधून त्यांत शांतिदेवतेची स्थापना करा म्हणजे मागे केलेल्या पापांचें प्रक्षालन होईल.

(७) आमच्या मृत बांधवांच्या आत्म्यांना सद्गति व शांति मिळावी यासाठी कॉलेजमध्ये दररोज सायंकाळीं प्रार्थना घेऊन त्यांत 'शोकगीत' म्हणण्याचा विधि ठेवण्यांत यावा.

(८) तुमच्या प्रयोगशाळेंतील तें विष (क्लोरोफार्म) अजिबात नाहिसें करण्यात यावें, नाहीतर त्याचा उपयोग इतर प्राण्यावर अगर तुम्हा माणसांवर होण्याचा संभव आहे.

अध्यक्षांनी मांडलेले ठराव 'डरॉंव डरॉंव' नादाने एका आवाजांत संमत झाल्या, नंतर 'सामुदायिक गीत' म्हणण्यासाठी सगळे दोन पायावर उभे राहातात व गीतास सुरवात होते. परंतु इतक्यात बॉटनी गार्डनचे फाटक अुघडल्याचा आवाज ऐकूं येतो व भीतीने सगळे दडून बसतात.

---



# माधवराव पटवर्धनांचीं खंडकाव्यें

( कु. विजया दामोदर गुप्ते, चतुर्थ वर्ष–कला विभाग )

माधवरावांचीं खंडकाव्यें त्यांची भावनावशता, अपूर्व मौलिकता, बुद्धिप्रकर्ष, सूक्ष्मावलोकन व रसिकता यांची साक्ष पटवितात. अर्वाचीन कवींवर "बिंदुस्रावी कवि" म्हणून जो आक्षेप घेतला जातो, त्याला त्यांच्या या खंडकाव्यांनी एकप्रकारें आव्हान दिलें आहे. माधवरावांच्या खंडकाव्यांत विषयांची विविधता असून सर्व प्रकारच्या रसिकांचें मनोरंजन करण्याचें अलौकिक सामर्थ्य आहे. समाजांतील दांभिकतेची चीड येवून त्या ढोंगाचें स्वरूप "सुधारक" या दीर्घ काव्यांत माधवरावांनी आविष्कृत करून दाखविलें. वाङ्मयीन झब्बूशाहीची चीड येवून "नकुलालंकारा"ची निर्मिति झाली. विप्रलंभ शृंगाराचें रमणीय चित्र "विरहतरंगां"त आहे. सुनीतांची एक साखळी जोडून "तुटलेले दुवे" निर्माण झालें. उमरखयामच्या फिट्झ् जेरल्डकृत अनुवादाचे "द्राक्षकन्या" या नांवाने भाषांतर केलें.

भावनाप्रधान प्रेमावर श्रद्धा असणाऱ्या हळूवार मनाला "विरहतरंग" वेड लावेल तर पांडित्यप्रकर्षाने व गंभीर तत्त्वज्ञानाने बुद्धीस खाद्य मिळते अशा मताच्या रसिकांना "तुटलेले दुवे" आवडतील. "टवाळा आवडे विनोद" या न्यायाने कांही रसिकांना "नकुलालंकार" हें काव्य चुरचुरीत वाटेल तर हें "सुधारक" काव्य म्हणजे सर्व पक्षाच्या व सर्व मतांच्या अहंमन्य व शिष्ट लोकांवर उपसलेला उपरोधाचा आसूडच आहे, ही जाणीव होऊन सात्त्विक रसिकांना माधवरावांच्या धडाडीचें कौतुक वाटेल.

"विरहतरंग" हें एकच काव्य माधवरावांना "प्रतिभाशाली कवि" म्हणून मान्यता देण्यास समर्थ आहे. हें काव्य म्हणजे आकर्षक रीतीने सांगितलेली नितांतसुंदर अशी प्रेमकथा आहे काव्याचें मूळ नांव "प्रियकराची विरह-पत्रिका" असें होतें. विरहाने व्याकुळ झालेला नायक संध्याकाळीं आपल्या प्रियेची आठवण झाल्यामुळे एक एक स्मृति सांगत आहे. प्रथम-दर्शन, प्रेमोद्गम, परिचय, वृद्धि, गैरसमज व विरह इ. प्रेमाच्या विकासाचा इतिहास नायकाला जसजसा सुचला तसतसा त्याने तो या तरंगांतून ग्रथित केला आहे.

माधवरावांच्या सौंदर्यभोजी व वस्तुनिष्ठ वृत्तीचें सामर्थ्य येथे व्यक्तिचित्रें रंगवितांना प्रकर्षाने दिसतें.

"जीचें भाषण मंजु गुंजन जणूं कुंजीं करी कोयळ।
जीचें अंतर भाव सुंदर जणुं ओथंबलें मोहळ।"

अशी "अभ्यासु मखरेल वाग्यत" नायिका व "जो क्रीडापटु, वेषभक्त, कवनप्रेमी कलाचाहता" असा हा नायक– ही दोघे जणूं सजीव होऊन वाचकांपुढे उभी राहतात.

"काळेभोर टपोर नेत्र चमके बुद्धि प्रभा आर्द्रता।
नांदे या हिमगौर साफ निटिलीं निर्व्याजता आर्यता।
भांगाची ऋजु शुभ्रता प्रगटवी सौंदर्य शालीनता।
दावी आर्जव नासिका, परि म्हणे येथें नसे दीनता॥"

अशा या सुस्वरूपी नायिकेच्या स्वभावांत अकालीं प्राप्त झालेल्या वैधव्याने खिन्नतेची दाट छाया आलेली आहे. ती सुधारक बापाची सुधारणाप्रिय मुलगी आहे. तिची राहणी ठाकठिकीची असून आधुनिक पद्धतीची आहे. परंतु देवाला वंदन करणें, अशारीर प्रेमावर श्रद्धा असणें "संसिद्धि, आत्मोन्नति" इ. ध्येयें बाळगणें हीं तिचीं बहुविध वैशिष्ट्यें वेळोवेळीं प्रगट होत आहेत. प्रभाकर हा एक "विद्याशील युवा" असून "बक्षिसें व पदकें" मिळविणारा आहे. वेळोवेळीं जुन्या अथवा इंग्रजी वाङ्मयाचे निर्देश तो करीत असल्यामुळे त्याचें वैदग्ध्य प्रत्ययास येतें. त्याच्या टेनिसच्या खेळाची नायिकेने "शैली मनोहारिणी" अशी केलेली स्तुति सूचक आहे. तो आपलें प्रेम प्रथम धीटाईने व्यक्त करूं शकत नाही यांत त्याची विनम्र वृत्ति व्यक्त होतें. परंतु इंदूसारख्या विधवा तरुणीशीं विवाह

करण्याची तयारी दाखविण्यांत त्याचें मनोधैर्य प्रगट होतें. शेवटीं इंदूच्या मताप्रमाणे वागण्याचें तो ठरवतो, तेव्हा प्रियेसाठी त्याग करण्याची त्याची उदार वृत्ति प्रगट होते. All the World loves a lover या न्यायाने सर्व वाचक वर्गास या विरही नायकाविषयी सहानुभूति वाटतें. प्रभाकराच्या आंदोलनांचा चित्रपटच आपण पाहत आहोंत असें वाटतें त्याचें व्यक्तिमत्व, मनोदर्शन, सविस्तर व मनोवेधक आहे त्याचे रंग डोळ्यांत भरण्यासारखें आहे. उलटपक्षीं इंदूची आकृति धुक्यांतून अस्पष्ट दिसावी असें वाटतें. कारण ती प्रत्यक्ष आपल्यापुढे उभी नसून प्रभाकराने तिची ओळख करून दिली आहे. परंतु निळ्या धुक्यांतून अस्पष्ट व धुसर दिसणारी वस्तु रसिकाला मोह पाडत नाही काय? केव्हा केव्हा सहज सुंदर संवादांनी त्यांनी व्यक्तीवर प्रकाश टाकला आहे व कथानकाची गतिहि वाढविली आहे. बाह्य सृष्टि अथवा लतावेलींनी सजलेली निसर्गसृष्टि ह्यांचें आकर्षण कवीला तारतम्याने कमी दिसतें. विरहतरंगांत निसर्गाचें वर्णन हें मानवी जीवनाची व भावनांची पार्श्वभूमि म्हणून केलेलें आढळतें. येथें सृष्टिवर्णनें सूक्ष्म, यथार्थ, तपशीलवार असून न यिकेस केंद्रस्थानीं स्थापन करून तीं तिच्या भोंवतीं फिरत आहेत. महाबळेश्वराचें वर्णन, गौरीचा मधुमास इ. चित्रांनी विरहतरंगांतील वातावरण प्रसन्न व आल्हाद-दायक झालें. परंतु या रमणीय दृश्यांनी प्रभाकराला केवळ, "दुःखाची परमावधि कवण ती? गेल्या सुखाची स्मृति!" हीच जाणीव होत आहे.

माधवरावांनी काव्यांत कल्पिलेल्या अपार्थिव प्रेमभावनेचें स्वरूप विशुद्ध आहे.

"ती ऐकान्तिक भक्ति की प्रभु तिचा राहे सदाचा भुका।
आहे प्रीति तिचीच उर्मि, रुचि ती कैशी कळे कासुका?
आसक्तीसच भक्ति भक्ति म्हणणें हा शुद्ध शद्बच्छल
होईना जर चित्त निर्मम तरी दुःखीं भ्रमे चंचल।"

माधवरावांची ही सहृदय आर्त प्रेमभावना म्हणजे प्रीतीचा निष्काम भक्तियोग आहे. "प्रेम म्हणजें एक प्रकारचा संन्यासयोग असून त्यांत सत्ता, मत्सर किंवा हक्क यांना वाव नसतो" इ. विचार या प्रेमाच्या तत्वज्ञानांत येऊन गेले आहेत. स्त्री ही केवळ भोगदासी नसून खरीखुरी सहचारिणी-किंबहुना भूपृष्ठस्थित आद्यदैवत आहे ही माधवरावांची श्रद्धा आहे. विरहतरंगांत आरंभीं जरी रचना विस्कळित वाटलीं तरी त्यामागे स्मृतीचें सूत्र असल्यामुळे त्याला कांही योजना मिळाली आहे. प्रेमाचें तत्त्वज्ञान हा केंद्रबिंदु असून आत्मपरता हा आत्मा आहे. प्रौढ अलंकार-प्रचुर भाषा, फारशी व संस्कृत शद्बांचा भरणा, postman याअर्थी डाकनोकर इ. शब्दप्रयोग, "स्त्रीप्रेमाविण जन्म नीरस उणा काडीवजा भूवरीं" इ. जागोजागीं विखुरलेलीं सुभाषितवजा पंद्यपक्ति म्हणजे या काव्याचें अंतस्थ सौंदर्य आहे. रा. श्री. जोगांना विरहतरंगाची मेघदूताबरोबर तुलना करण्याचा मोह झाला यांतच विरहतरंगाचें यश सामावलेलें आहे त्याचबरोबर मराठी विधवा नायिकेवर प्रेम करणारा नायक निर्माण करून व त्या प्रेमाला महाविद्यालयाचीं पार्श्वभूमि देऊन माधवरावांनी टीकाकारांना टीकेला विषय मिळवून दिला. "विरहतरंगा" विषयी श्री. खांडेकर म्हणतात, "टोपीने पाग ड्याची जागा घेतल्यामुळे अलीकडच्या मंडळींना पागोटें तोलण्याशी शक्तीच उरली नांही असा आक्षेप त्यांच्यावर घेतला जातो. स्फुटगीतांनी खंडकाव्यें व महाकाव्यें यांची जागा घेत यामुळे आधुनिक कवींवरहि अशाच प्रकारचा टीकाकारांचा आक्षेप आहे. ९१२ ओळींचें, सफाईदार व सुंदर रचनेचें हें खंडकाव्य लिहून माधवरावांनी या आक्षेपाला चांगलें उत्तर दिलें आहे." "सुधारक" काव्य म्हणजे माधवरावांच्या स्वतंत्र प्रज्ञेचें सुंदर फळ आहे. शंकराच्या तेजांतील उग्रता त्याच्या तांडवनृत्याच्या प्रसंगीं प्रत्ययाला येते असें म्हणतात. तद्वत् समाजांतील दंभ, ढोंग पाहून माधवरावांच्या हृदयांतील सात्त्विकता जागृत झाली, व तिने उग्र रूप धारण केलें. संभावितपणाचा बुरखा घेऊन समाजांत सुधारक नांवाचा जो एक शिष्ट, प्रतिष्ठित वर्ग आहे त्याच्या फाजील शिष्टपणाची येथ टर उडवतांना माधवरावांच्या लेखणीला आसुडाचें बळ प्राप्त झालें आहे. त्याचा वार सुधारक तसेच दुर्धारक जुने कर्मठ, शाव्य ादी जहाल किंवा नेमस्त, मवाळ इ. सर्वांवर झाला आहे. समाजाचें प्रतिबिंब कलाकृतींत पडावें अशी जी अपेक्षा असते ती माधवरावांनी येथे पुरी केली आहे. म्हणून, माडखोलकर म्हणतात. "या खंडकाव्यास 'सुधारक'



या नांवाऐवजी 'समाजादर्श' हें नांव यथार्थ झालें असतें" सुधारक हें काव्य माधवरावांनी "कविता म्हणजे संसृति-टीका" (Poetry is the criticism of life) अशी काव्याची जी व्याख्या केली आहे तिला सबळ पुरावा देत आहे.

या काव्यांत "शरीर सुखवस्तु लवथवलें" असे उच्च वर्गांतील व्यवहारैकदृष्टि नेमस्त सुधारक रावबहादुर ठोसर, रंगरावासारखे उलट्या काळजाचे संघटक, वासूसारखा ध्येयास कवटाळणारा आदर्श तरुण, नवऱ्याच्या हीन वागणुकीने कंटाळून विधवेचें जिणें जगणारी दुर्दैवी सरला, जगांतील कठोर न्यायाची जाणीव नसलेली अल्लड किशोरी सरला, सगुणेसारखी पतिता, प्रियकरासाठी वाटेल तो त्याग करण्यास तयार असलेली श्यामेसारखी गणिकाकन्या इ. समाजांत नित्य दिसणाऱ्या व्यक्ति आहेत माधवरावांनी वेगवेगळ्या प्रकृतीच्या भिन्न भिन्न क्षेत्रांतील व्यक्तींना एकत्र आणून त्यांची सांगड घालण्यांत कौशल्य दाखविलें आहे. स्विफ्टप्रमाणे अहृदय न होतां माधवरावांनी या व्यक्तीचे दोषही सहृदयतेने रंगविले आहेत. त्यांनी निर्माण केलेली स्त्रियांची सृष्टी अधिक नावीन्यपूर्ण व मोहक वाटतें "कपाळ मोठें, टपोर लोचन" अशी रावबहादुरीणबाई, "दिसे उंच कृश, किंचित् मानी" अशी हतभागिनी सरला "लहरी जितकी तितकी प्रेमळ" अशी फुलपांखराप्रमाणे अल्लड सरला, "गभीर ही परि लावण्यलता" अशी सौन्दर्यशालिनी श्यामा, कथानकांत क्षणभर चमकून जाणारी सुशीला-देवी इ. स्त्रीसृष्टींतील विविधता अपूर्व आहे 'कृष्ण कुटिल परि एकच- ते कच" असें एकाच ओळीने माधवरावांनी वासूच्या स्फटिकाप्रमाणे निर्मळ असणाऱ्या मनोवृत्तीचें वर्णन केलें आहे. "भूतदयाघन आत्मत्यागी, झाला सुखदुःखी समभागी. झाला स्नेही असून विरागी" असे वासूसारखे ध्येयवादी तरुण समाजांत सांपडतील काय हा एक प्रश्नच आहे. माडखोलकर म्हणतात, "वासू हा हुतात्मा नसून काव्यात्मा आहे. त्याच्या काव्यात्मकतेला ध्येयवादित्वाची झिलाई दिल्यामुळे त्याच्या चारित्र्याला उदात्ततेची ऐट आली आहे." श्यामेचें जीवन मात्र तेजाच्या वलयाने मोहक झालें असून तिच्यांत व निःस्वार्थी वसंतसेनेंत साम्य आहे. तिच्यामुळे उपरोधप्रधान अशा या काव्यांतील कडवटपणा कमी झाला आहे रा. ठोसरांच्या स्वभावां-तील छटान्छटा माधवरावांनी सूक्ष्मपणाने रंगविल्या आहेत. पटवर्धनांनी जरी व्यक्ति व व्यवहार यांची टर उडविलेली असली तरी त्यांच्या या भूमिकेमागे जिव्हाळा व सहानुभूती आहे पुण्यांतील राष्ट्रीय पक्षांचें, सनातनी वर्गांचें, चालिरीतींचें, संस्था व मंडळें यांतील सांवळ्या गोंधळाचें वर्णन करतांना माधवरावांची लेखणी चुरचुरीत विनोद निर्माण करते. छोटी छोटी व्यक्तिचित्रें किंवा शद्बचित्रेंहि अत्यंत रेखीवतेने त्यांनी काढली आहेत. मधून मधून त्यांनी कंसांत पुरोगामी व प्रतिगामी श्रोत्यांचे उद्गार दिल्यामुळे काव्याला वेगळीच लज्जत प्राप्त झाली आहे. काव्यांतील पांडित्यपूर्ण सूचक अुल्लेख त्यांनी त्यांच्या व्यापक ज्ञानाप्रमाणे व्यापक असलेल्या क्षेत्रांतून घेतलेले आहेत. 'पत्नी ढालच जणु अब्रूची," "वकिली म्हणजे पक्षसमर्थन" इ. रचना सूचक आहे. "सुधारकां"त कवीला दांभिक जगाचा आलेला कडवट अनुभव जसा व्यक्त होत आहे, तसेच त्यांत दुर्दम्य ध्येयवादित्वाची अुदात्तताहि आहे. जो ध्येयवादी असतो, तोच जगाच्या ढोंगी न्यायावर कठोर टीका करतो. म्हणूनच या काव्यांत उपरोधाची तीव्रता, कुत्सित टवाळी असली तरी कवीचा राग येत नाही. माडखोलकर म्हणतात, "हें वक्रोक्तिरम्य महाकाव्य लिहून पटवर्धनांनी "विश्व-गुणादर्श" सामाजिक अुपहासकाव्याचें एक नवीनच दालन मराठी वाङ्मयांत उघडलें. डॉ. केतकरासारख्या टीकाकाराला हें बंडखोर काव्य आवडलें यांतच त्यांच्या श्रेष्ठत्वाचीं बीजें आहेत.

"नकुलालंकारां"त बुद्धिचापल्य आहे पण ध्येय-वाद मात्र नाही. एखादा लटपट्या मनुष्य समाजांत प्रतिष्ठा मिरवून आपल्या चुकीचं खापर दुबळ्या लोकांवर फोडतो हें पाहून कवीस चीड येते व यांतील उप-हासाची तीव्रता शेवटपर्यंत कायम आहे. यांतील पात्रें समाजांतील कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या झब्बु-शाहीच्या प्रतिमा आहेत. कवि त्यांच्या दोषांकडे सहानुभूतीने पाहूं शकत नसल्यामुळे काव्यांत एक

प्रकारची धार आलेली आहे. येथे कवीने वाङ्मय प्रांतांतील व्यक्तींची खूप चेष्टा उडविल्यामुळे काव्याचें स्वरूप व आवाहन मर्यादित आणि तात्कालिक झालेलें आहे. प्रस्तावनेंत कवि म्हणतो, "नकुलाचें चरित्र आलंकारिक भाषेने सांगण्याचा हेतु एवढाच कीं त्यांत कांही स्वाभाविक उणीवा असल्यास त्या या शृंगाराने भरून निघाव्यात व मूळचें सौंदर्य खुलून दिसावें." नकुलराव ढिसाळ, पंडितराव, लक्ष्मी, शिप्रा, राधाबाई इ. पात्रें मनोरंजक असलीं तरी अवास्तव वाटत नाहीत. या काव्यांत कवीचें पांडित्य, कोपरखळ्या देण्याचें चातुर्य व प्रतिभेचा विलास दिसतो. परंतु उपहास तीव्र असल्याने सत्काव्य वाचल्याचें समाधान होत नाही.

"तुटलेले दुवे" यांत नैराश्य प्रकर्षाने प्रगट होतें. सुनीतांची एक सांखळी गुंफून त्यांत किंकर या कवीची प्रेमनिराशा झाल्याचें दाखविलें आहे. ही एका कवीची दैनंदिनी असून त्यांतील कित्येक पृष्ठें उपलब्ध नसल्यामुळे या काव्याला "तुटलेले दुवे" हें नांव देण्यांत आलें आहे असें म्हणतात. येथे भावनाविष्कारापेक्षा विचारगांभीर्यावर भर असून सुनीतासारख्या विचारप्रधान काव्यप्रकाराच्या द्वारें कथानक हाताळलेले असल्यामुळे काव्याचें स्वरूप दुर्बोध व विचारमंथर झालेलें आहे. कित्येक सुनीतें कथानकाच्या चौकटींत अर्थदृष्ट्या बसत नाहीत असें वाटतें. प्रथम वेगवेगळीं अर्थदृष्ट्या स्वयंपूर्ण असणारीं सुनीतें रचून नंतर ती एकत्र गुंफून कथानक जुळविण्याचा प्रयत्न केला असावा असें वाटतें. व्यक्तिरेखनहि सुस्पष्ट नसून कथानक विस्कळीत आहे. अ.ईच्या प्रेमाने भारावलेल्या, वेडावलेल्या मनांतील भावनांच्या छटा कवीने हळुवार हाताने, जिव्हाळ्याने व आत्मीयतेने रंगविल्या आहेत यातील संवादहि धांवते व कथानकाची गति वाढविणारे आहेत.

"तुटलेले दुवे" यावर अभिप्राय देतांना रा. श्री. जोग म्हणतात, "अर्थगांभीर्य, रसवत्ता, भावनोत्कटता या दृष्टीने, या संग्रहांतील कविता संस्मरणीय झालेल्या आहेत."

उमरखय्यामच्या कांही फारसी रुबायांचे फिट्जेरल्डने इंग्रजींत स्वतंत्र रूपांतर केलें व त्याचें भाषांतर "द्राक्षकन्या" यांत माधवरावांनी केलें आहे. आपल्या भाषांतरविषयक मताचें प्रात्यक्षिक देण्यासाठी त्यांनी हें भाषांतर मोठ्या चुरशीने करून त्या इंग्रजी पण जवळजवळ स्वतंत्र अशा काव्याची मराठी प्रस्तावना, भाषांतर व टीपा यांसह आवृत्ति काढली. अशा तऱ्हेचा प्रयत्न हा मराठींत पहिलाच असेल. हें भाषांतर निर्दोष, सर्वांगसुंदर व्हावें यासाठी त्यांनी जी काळजी घेतली त्याची बूज मात्र त्यांतील क्लिष्टतेमुळे झाली नाही. ह्या काव्यांतील मुख्य तत्त्वज्ञान म्हणजे "तरुणपणीं बंडखोरीच्या व शंकेखोर अशा विचारलहरी मनुष्याच्या मनांत प्रसंगोपात्त अनेकदा उद्भवतात. अशा प्रसंगीं त्याच्या भावनांना साथ देऊन हें काव्य त्याच्यांत एक प्रकारच्या सुख-करुण काव्यमय संवेदना उत्पन्न करून त्याला रिझवतें. हें काव्य कथनात्मक नसून त्यांत वादग्रस्त तात्त्विक विचार आलेले आहेत. यांत इराणी संकेतांचा उपयोग माधरावांनी केला आहे.

माधवरावांच्या खंडकाव्यांचें हें विहंगमदर्शन झालें आहे. त्यांच्या खंडकाव्यांत त्यांची अपूर्व मौलिकता, रसिकता, पांडित्य व निर्भयता हे गुण दिसतात. रचनेंत चंद्रशेखरांची टापटीप आहे. कवीचा स्वभाव धडाडीचा असल्यामुळे कांहीतरी अपूर्व करून समाजाला धक्का देणें त्यांना प्रिय दिसते. म्हणूनच त्यांचें प्रत्येक खंडकाव्य आपापल्या वैशिष्ट्याने आज वाङ्मयांत उठावदार व विलोभनीय झालेलें आहे.

## दरिद्री लेखिका

एका धनाढ्य फिल्मनिर्मात्याच्या मुलीला शाळेंत एका 'दरिद्री-परिवारा'वर एक गोष्ट लिहायला सांगितली. मुलीने गोष्ट सुरु केली– 'एक दरिद्री कुटुंब होतें. बाप दरिद्री होता. आई दरिद्री होती मुलं दरिद्री होतीं. कुटुंबांतील नोकर-चाकर दरिद्री होते. स्वयंपाकी दरिद्री होता. मोटार-ड्राइव्हर दरिद्री होता. बागेचा माळी दरिद्री होता. सारांश, प्रत्येक दरिद्री होता ...............

—'एन्. ई. ए.' मध्यें कार्लटन यंग.



# सरंजामी वृत्तीचा अवशेष

[ लेखक— **वि. ह. नेमाडे**, तृतीय वर्ष–कलाविभाग ]

तारा माझ्या नशिबांत नव्हती एवढें खास! बिचारी तारा! आज ती एकाकी जीवन कंठीत आहे. कुठेतरी मास्तरीण बनली आहे एवढे ऐकतों!

"मामा, शेजारीं नवीन बिऱ्हाड आलं आहे वाटतं!" मी मामांना प्रश्न केला मामांचा फारच आग्रह होता म्हणून मी दोन दिवसांकरिता मामाकडे गेलों होतों. मामांचें गांव तसें मोठें नाही. नुकतीच इंग्रजी शाळा उघडली आहे त्या गांवाला. त्याला शहर म्हणतां येणार नाही. दळणवळणाची धड सोयहि नाही त्या गांवाला. मामांच्या गांवीं जाणें म्हणजे मोठें दिव्यच! म्हणून आतांपर्यंत त्यांच्याकडे जाणं मी टाळीत आलों होतों.

"नुकतीच एक मास्तरीण लागली आहे आमच्या इंग्रजी शाळेंत. ती आली आहे परवांपासून राहायला." मामांनी उत्तर दिलें.

खेड्यांत इंग्रजी शाळेंत काम करणाऱ्या मास्तरणीबद्दल मला उत्सुकताच वाटली. तिच्याबद्दल आणखी माहिती मी मामाकडून काढून घेतली.

बिचारीला नवऱ्याने टाकून दिली होती. आणि नवरा मात्र तिला सोडचिठ्ठी देऊन दुसरा विवाह करून सुखानं नि चैनीनं मुंबईला संसार करीत होता.

मी मनाशीं म्हटलें, "अरेरे! दुर्दैव बिचारीचं! मुंबईला राहून संसार करायचं तिचें भाग्य नव्हतें. दुसरें काय? नाहींतर ती कशाला आली असती असल्या खेड्यांत आज नोकरी करायला?"

मास्तरीणबाईला पाहण्याची उत्कंठा मात्र मी मनातल्या मनांत दाबून धरली. अर्थात् त्या इच्छेंत केवळ माझी पाहण्याची जिज्ञासाच पूर्ण होणार होती कारण मी विवाहित असून दोन मुलांचा बाप होतों अशा परिस्थतींत केवळ जिज्ञासा म्हणूनच मी तिला पाहणार होतों.

मी मात्र माझी ही जिज्ञासा मामापासून लपवून ठेवली होती. लपवायलच पाहिजे ती पाहायला मिळावी म्हणून तिच्या शाळेंत जाण्याच्या वेळेची मी वाट पहात होतों. एकदाची माझी जिज्ञासापूर्ति झाली होय, मी तिला पाहिलें नि ओळखलें देखील! तीच होती ती, दुर्दैवी तारा!

आता मात्र मी पुन्हा आश्चर्यांत पडलों ताराला मी एकदाच पाहिलं होतं. तें माझ्या लग्नापूर्वी मी ताराला पसंतहि केलं होत. माझी आत्या ताराच्याच शेजारीं राहत असे. तिच्याच आग्रहावरून मी ताराला पाहायला गेलों होतों. आत्याने तिच्याबद्दल मला पुष्कळच चांगलें सांगितलें. आत्याच्या सांगण्यावरून मी माझ्या 'वधूपरीक्षे'ची पुढें होणारी दगदग संपविणार होतों. आत्याला मी माझ्याकडून होकार देऊनच परत आलों होतों. तोंच मला आत्याबाईचें पत्र आलें.

चि. मधु यांस

अनेक आशीर्वाद

तारा तुझ्या नशिबीं नव्हती. तुझ्यानंतर लगेच अेक स्थळ तिला सांगून आलं. तुझ्यापेक्षा तें स्थळ श्रीमंत आहे अर्थातच ताराच्या वडील भावाने तेंच स्थळ निश्चित करून टाकलें आहे. नवरा मुलगा शिकलेलाहि आहे. पण लहरी नि थोडासा चक्रम आहे असं बायांच्या तोंडून ऐकलें. तुला तर कुठेंहि बायको मिळेल. पण दुर्दैव बिचाऱ्या त्या तारेचं!

तुझी प्रेमळ-आत्या.

आत्याच्या त्या पत्रानंतर मी दुसरं स्थळ शोधलं नि लगेच लग्नाचा बार उडवून दिला. थोड्याच दिवसांनी ताराचा हा लहरी नवरा मला अचानक भेटला. त्या भेटींतच त्याच्या लहरीपणाचा मला प्रत्यय आल्यावाचून राहिला नाही. मला वाटलं होतं, आत्याबाईनं आपल्या भाच्याचं फिसकलं म्हणून कदाचित त्या नवीन वराला चक्रम म्हटले असेल. आत्याच्या प्रेमाचाच

भाग त्यांत अधिक असावा. त्यामुळेच हा पक्षपात तिच्याकडून होत असावा असें वाटणें साहजिक होतें. पण ताराच्या नवऱ्याच्या भेटीमुळे मला त्याचा हा मूर्खपणा प्रत्ययास आला. ह्या भेटीपूर्वीपासूनच तो मला ओळखत असावा. म्हणून त्यानंच मला छेडलं.

" नमस्कार महाशय, म्हटलं तुम्ही जरी मला विसरलां तरी मी तुम्हाला विसरणार नाहीं. " त्यानं मला हटकलं.

मी परिचितपणाचा आव आणीत म्हटलं. " वा वा, असं कसं होईल बरं, आपलं नांऽऽव..."

" वामनराव. विसरलाच बरं तुम्ही. " त्यानंच आपलं नांव सुचवीत म्हटलं.

" वा वामनराव, आपली जरी दोस्ती नव्हती तरी एक वर्ष आपण एकाच शाळेंत शिकत होतों. मी आपल्याला विसरणं कसं शक्य आहे ? " मी आठवणींना जागृत करण्याचा प्रयत्न करीत म्हटलें.

हा वामन एका वर्षांपुरता आमच्या गांवच्या शाळेंत शिकायला आला होता. तो त्याच्या काकाकडे राहत असावा. त्याचा नि माझा गाढ संबंध नसल्यामुळं तो माझ्या स्मृतींत जवळ जवळ नव्हताच. पण त्याच्या ह्या भेटीमुळे पूर्वस्मृति जागृत झाल्या.

ज्या गोष्टी बोलण्याकरिता म्हणून त्यानं मला हटकलं त्या गोष्टीच्या मुद्यालाच एकदम हात घालून तो म्हणाला.

" त्याचं असं आहे मधुकर, मी तुझा फारच मोठा गुन्हा केला आहे. ताराला तूं पसंत केल्यावर मीं तिच्याशी लग्न करायला नको होतं. तुमचं सर्व कांही ठरलं होतं म्हणे ! "

त्याच्या बोलण्यानं मला थोडं दुःख झालंच. पण आता मी विवाहित होतों. त्या दुःखाची मीं पर्वा कां करावी ? तसलें दुःख नि हळहळ करण्याचा मला अधिकार नव्हता. ताराबद्दलच्या माझ्या पूर्वीच्या भावना बदलणें मला क्रमप्राप्तच होतं.

मी मोठ्या तात्त्विकतेचा आव आणीत वामनला म्हटलं " हें पहा वामनराव, माणसानं लग्नापूर्वीच्या गोष्टींत दुःख मानण्यांत काय अर्थ आहे ? लग्नापूर्वी जशा मी अनेक मुली पाहिल्या तशीच तारा पण एक होती. जिथं ताराचा नि माझा योग नव्हता तिथं तुम्ही तरी माझा काय अपराध केला बुवा ? "

" पण मला तरी फार वाईट वाटतं. " वामनरावाची ही बोलण्याची पद्धति मला थोड्या मानभावीपणाचीच वाटली. " दुसऱ्याच्या पुढील पात्र स्वतःसमोर ओढून घेण्याचा मी हा गुन्हा केला आहें. केवळ स्वार्थीपणामुळेच, केवळ ताराच्या आकर्षणामुळेच...... "

असला मूर्खपणाचा व कांही अर्थ नसलेला संवाद थांबावा म्हणून मी वामनरावांना जरा नापसंती- नंच म्हटलं. " वामनराव, तारा आता तुमची झाली आहे. तिच्याबद्दल तुम्हाला आता असं बोलणं शोभत नाहीं. शिवाय मी पण विवाहित आहें. आपणाला आता पुढील संसाराबद्दलचा विचार करणं ठीक नाही का ? "

वामनरावांनाहि ते पटलं असावं. नंतर आम्ही आपापला रस्ता सुधारला.

त्यानंतर साधारण एका वर्षानंतरच वामनराव मला अचानक भेटले आणि अगदी आनंदानें डयू हंसून म्हणाले. " मधुकरराव, तुमचे पेढे झाले बुवा आमच्या- कडे " मी आश्चर्यानं म्हटलं, " कसले बुवा पेढे ? "

" अहो पुत्ररत्न प्राप्त झालं आम्हांला. परवा बारसं आहे तेव्हा अवश्य समारंभाला या हं. अन हें पहा तुम्ही साहित्यिक म्हणून सांगतों कीं चांगलीं चांगलीं शें दोनशें नांव निवडून त्यांची यादी करून घेऊन या. म्हणजे त्यांतील एकादं नांव आपण सर्वांच्या पसंतीनं आमच्या बाळाला ठेऊं. अवश्य या हं विसरूं नका. "

इतकं सांगून घाईघाईने वामनराव निघून गेले.

आमची बेबी अजारी असल्याचे आमच्या सौ. नी माहेरून पत्र आल्यमुळं मला वामनरावांच्या मुलाच्या बारशाला जातां आलं नाहीं.

वामनरावांनी जळगांव सोडल्याचं कळलं. त्यामुळं भेट होणं शक्यच नव्हतं. त्यांनी मुंबईला कुठेंशी शिक्षकाची नोकरी धरल्याचं कळलं. मुंबईचा त्यांचा पत्ताहि मला माहीत नव्हता.



अशा तऱ्हेने तारा जरी मला प्रत्यक्ष भेटत नसली तरी ताराचा नवरा – वामनराव – मात्र मधून मधून मला भेटत असत. असं म्हणण्यापेक्षा त्यांची व माझी अचानक गांठ होत असे. त्या त्या वेळी मात्र वामनराव आपल्या लहरीपणाचे पैलू दाखवीत असे. आता मात्र ह्या गांठीभेटी बंद झाल्या. कारण वामनरावांनीच जळगांव सोडलं होतं.

दुसऱ्या बाळंतपणाकरितां आमच्या सौ. ना माहेरी पोहोचविण्यासाठी म्हणून मी स्टेशनवर आलों होतों. गाडीला वेळ असल्यामुळे मी सहजच बेबीला इकडे तिकडे हिंडवीत होतों. स्टेशनांतील ' भक् भक् ' दुनिया तिला दाखवीत होतों. तोंच काय नवल? वामनराव माझ्यापुढे दत्त म्हणून हजर ! आता मात्र मीं वामनरावांना म्हटलें " काय वामनराव, आम्हांला न विचारतांच जळगांव सोडलें कीं. मुंबईहून एवढ्यांतच आला वाटतं ? कुठं जायची घाई आहे येवढी ? "

" मधुकरराव तुम्ही फारच सुखी बुवा " आमच्या संसाराबद्दल हेवा दाखवीत तो म्हणाला " त्या मायाविनीशीं तुम्हीं लग्न केलं नाही हें फारच चांगलं केलं ! "

हें बोलणं ताराबद्दलच आहे येवढें मला कळून चुकलें. पण ताराबद्दल ह्या गृहस्थानं एकदम अनुदारपणानं बोलायला सुरवात करावी याचंच मला आश्चर्य वाटलं.

" वामनराव तुम्ही लहरींत आहांत कीं शुद्धींत ? काय बोलतां आहांत तुम्ही याची जाणीव तुम्हाला तरी आहे कां ? " मी थोड्याशा रागांतच प्रश्न केला.

" अहो पूर्ण शुद्धींत ! समजून उमजूनच मी हीं विधानें करीत आहें. माझे डोळे आता चांगलेच उघडले आहेत. " मोठ्या वैतागानं वामन म्हणाला,

" अरे पण झालं तरी काय ? " मी समजुतीच्या स्वरांत विचारलं.

" व्हायचं राहिलं आहे काय, अहो आमच्या संसाराला काळोखी फासली तिनं न् दुसरं काय ? "

आपल्या बायकोबद्दल अशा तऱ्हेने बेजबाबदार विधानं करणारा नवरा हा केवळ लहरी नसून मूर्ख नि उलट्या काळजाचा देखील असावा म्हणून मला दाट शंका आली. त्यानंच आपलं दुखणं सांगायला सुरवात केली.

" माझ्या मित्रावरच मोहिनी ? मुंबईला खोली मिळत नव्हती म्हणून आम्ही माझ्या मित्राकडे राहिलों. अनायासेंच मित्राची बायको डिलिव्हरीला गेली होती. मला वाटलं ठीक आहे. याची बायको येईपर्यंत आपण इथं बिऱ्हाड थाटायला कांही हरकत नाहीं. तशी विनंती मी त्या मित्राला केली देखील. त्यानं एका शब्दावर होकार दिला. आम्ही दोघं नि तो तिसरा. आमचा बाळ त्यापूर्वीच वारला होता. अनायासेंच ताराला मोकळा वेळ मिळाला आणि म्हणूनच तसले धंदे तिला सुचले. एकाऐवजीं दोघांशी तिचा संसार सुरू झाला. "

" वामनराव, तोंड सांभाळून बोला. आपल्या पत्नीबद्दल तुम्ही काय बोलत आहांत याची जाणीव ठेवा यांत तुम्ही ताराची बदनामी करीत नसून तुम्ही तुमच्याच नालायकीचं प्रदर्शन करीत आहांत. " मी मोठ्या आवेशानं म्हटलं.

तेवढ्याच निराशेनं तो म्हणाला, " खरं आहे तुमचं म्हणणं. लग्न करण्याचाच मी नालायकपणा केला. तुम्ही मात्र सुटलांत. अन् ह्या मायाविनीच्या जाळ्यांत अडकला नाहीं. "

" वामनराव, एवढ्या बेजबाबदार विधानांना पुरावा काय ? "

" अहो त्याला पुरावा नि सिद्धता कशाला हवी ? मी माझ्या डोळ्यावरसुद्धा विश्वास ठेवूं नये ? त्यांना जवळ जवळ बसलेलें मी स्वतः पाहिलं आहे ! "

" कदाचित तुमची पाहण्यांत चूक झाली असेल. केवळ एवढ्याशा पुराव्यावर तुम्ही येवढ्या भयंकर निर्णयावर यायला नको होतं. त्या बाबतींत तुम्ही फार विचार करायला हवा होता. अन् तुम्ही जर शहाणे असतां तर असं दुसऱ्यांना सांगत न सुटतां ताबडतोब दुसरें घर शोधायच्या नादांत लागला असतां. या तुमच्या तोंडानं दुसऱ्यांना सांगण्यांत तुम्ही तुमच्याबद्दल बचाव करूं शकत नाही तर उलट तुमच्याबद्दल ऐकणाराला तरी दाट संशय येईल कीं तुम्हालाच तर यांत कांही स्वार्थ साधायचा नाही ना ? " मी उपरोधाच्या स्वरांत म्हटलं.

माझ्या या बोलण्याचा त्याच्या वर्मी चांगलाच परिणाम झालेला आढळून आला. त्याच्या चर्येवरचे भाव मीं जाणले. स्वतः कांगावखोर बनून आपल्या बायकोला दोषी ठरवून तिला सोडचिठ्ठी देण्याचा इरादा यांत लपलेला असावा असाच मला संशय आला आणि कांही दिवसांनी तो खराहि ठरला.

त्याच्या मनाचा हा चोरकप्पा मी उघडवून दाखविल्यामुळे तो माझ्याजवळ जास्त वेळ थांबला नाही. तो निघून गेल्यावर मी ताराबद्दल विचार करूं लागलों आणि जो जो तिच्याबद्दलच्या माझ्या कल्पनांना मी उजाळा देऊं लागलों तों तों तिचें चारित्र्य मला निखरलेलेच दिसू लागले. तारासारखी मुलगी असं करणंच शक्य नाही.

पैशांच्या जोरावर आपल्या सामंतशाही, केवळ उपभोगी वृत्तीची तृष्णा पुरी करणारा वामनच ताराच्या संसाराच्या मानगुटीशी बसला आहे हें कळण्यास मला उशीर लागला नाही. याचें प्रत्यंतर मला लगेच आलें.

मामांच्या ओटीवर बसून विचार करण्यांत किती वेळ गेला कुणास ठाऊक ? वेळ मात्र बराच झाला होता. तेवढ्यांत तारा येतांना दिसली. मला वाटतं शाळेला मधली सुटी झाली असावी. तारानं माझ्याकडे पाहिलं. मी तिच्याकडे पाहिलं. तीच शालीन सौजन्यमूर्ति तारा, चारित्र्याच्या प्रकाशानं उजळलेली मला दिसली, जिला मी चार वर्षांपूर्वी पाहिली होती. तिच्यांतील लग्नापूर्वीचे नवथर नि कोमल भाव जाऊन त्या जागीं आता प्रखर भाव आले होते. तिच्या त्या एकाच नजरेनं मला किती तरी गोष्टी सांगितल्या. अशा अवस्थेंत तिच्याशीं बोलणे म्हणजे तिच्या दुःखावर डागण्या देण्यासारखं होतं.

दोन दिवसांनी मी मामांच्या गांवाहून जळगांवला परत आलों. ताराची निरपराधी मूर्ति माझ्या डोळ्या-पुढून जाईना. असाच एके दिवशीं संध्याकाळीं फिरायला म्हणून निघालों तेव्हा समोरून एक जोडपं येतांना दिसलं. मी माझ्या तंद्रींत असल्यामुळं मी दुर्लक्ष करून खाली मान घालून चालतच होतों तोंच–

" हॅलो मधु, मोठ्या विचारांत पडलेला दिसतो ? " मी आश्चर्यानं समोर पाहिलं तों समोर वामनराव व त्यांची ती......नवीन..... तोंच तिची ओळख करून देत तो म्हणाला, " ह्या आमच्या सौ. नुकतेच आम्ही विवाहबद्ध झालों. ह्या पूर्वीच्या प्रभा प्रधान होत. "

' नमस्ते ' करून मी त्यांचें अभिनंदन केलें. तेवढ्यांत तो माझा परिचय करून देत होता.

" हे मधुकरराव, माझे मित्र जरी नसले तरी आमची चांगली ओळख आहे. एक वर्ष आम्ही एकाच शाळेंत बरोबर होतों आणि आता इथं इंग्रजी शाळेंत मास्तर आहेत " त्यानं माझा परिचय संपविला. प्रभा प्रधाननं मला नमस्कार केला आणि मग त्यांनाच घाई होती म्हणून आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.

'प्रभा प्रधान'चं नांव मी पूर्वीपासूनच ऐकत होतों. नटवी पोरगी म्हणून ती शाळेंत प्रसिद्ध होती तिच्या-बद्दल एक प्रेमप्रकरण पण त्यावेळी विद्यार्थ्यांत प्रसृत झालेलें होतें. मी मात्र अशा गोष्टींत उत्सुकता दाखवीत नसे. ती पण नुक्तीच मुंबईला जाऊन कुठल्याशा इंग्रजी शाळेत मास्तरीण लागल्याचं मी नुसतं ऐकलं होतं.

मी परत फिरलों. प्रभा व वामन यांच्याविषयींच आता माझ्या मनांत विचार सुरू झाले.

कदाचित वामन व प्रभा यांचेंच तें प्रेमप्रकरण असावं व कांही कारणाकरितां म्हणून त्याला नाइलाज म्हणून ताराशीं लग्न करावें लागलें असावें.

किंवा मुंबईसारख्या शहरांत प्रभा प्रधान सारखी मुलगी पाहिल्यावर तिची नि वामनची गांठ एकाद्या लोकलमधे अगर कुठे तरी पडली असावी व तेव्हां-पासूनच त्यांचें प्रेमसंबंध सुरू झाले असावेत

किंवा हेंहि खरं असेल की प्रभा प्रधान व वामन हे दोघे एकाच शाळेत नोकरी करीत असतील. त्यांचा संबंध येत गेला असेल नि त्यांतूनच प्रेम निर्माण होवून विवाहापर्यंत पाळी आली असेल.

वरीलपैकी कोणतीहि गोष्ट घडली असेल किंवा वामन हा केवळ उपभोगी मनुष्यहि असेल. तारा मात्र त्याला आपल्या जीवनांत नसावी असें वाटूं लागल्यास नवल काय ? ताराला आपल्या जीवनांतून उठवून त्याजागीं प्रभाला बसविण्याकरितां वामनरावाला स्वतःच्या तोंडून ताराची बदनामी करणंच जास्त श्रेयस्कर वाटलं असावं आणि म्हणूनच त्यानं त्या मार्गाचा अवलंब केला.

वामनरावांनी केलेल्या ताराच्या ह्या बदनामीवर लोकांचा कितपत विश्वास बसेल हाहि एक प्रश्नच आहे. वामनरावांच्या ह्या दुसऱ्या विवाहामुळे त्यांचा स्वभाव समाजाला कळला आहे आणि प्रभाचीहि तारासारखीच गत होईल असा अंदाज आतापासूनच समाज बांधायला लागला आहे.

सामंतीवृत्तीला बळी पडलेली तारा! वामनपासून तिची सुटका झाली. समाजानं आता तिला नव्या संसाराचा मार्ग दाखवावा. तिचें हें एकाकी जीवन संपावे नि नवीन संसारी जीवनास सुरवात होवो हीच सदिच्छा.



# " मानवी शेला "

[ लेखक— राजा महाजन ज्यु. एम्. ए. ]

सूर्य ' शेल ' भर खाली उतरला होता. तिरप्या किरणांची तिरीप अजूनहि जाणवत होती. वाऱ्याची झुळूक अधून मधून येई तेवढीच. बाकी एकंदर वातावरण गरमच होते. अशा वेळीं मालजी पाटलाची लेक बायजा खोळ खोचून तुरीच्या शेंगा तोडण्यांत गुंतली होती. अर्धी अधिक खोळ भरली होती. एका हाताने मुखावरच्या घामाच्या धारा पुसत एका हाताने शेंगा तोडणं चालूच होतं आणि तोडतां तोडतां कसला तरी विचार चालला होता. दूरवरच्या मोटेचा कुरकुर आवाज ऐकू येत होता. थाळण्यांत पडणारं पाणी; चारीनं जातांना होणारा खळखळ आवाज आणि मधूनच मोटकऱ्याची सुरणारी लकेर यांनी त्या गरम वातावरणांतहि एक प्रकारचं सुख निर्माण केलं होतं. बायजानं एकदा मान वर करून पाहिली. बाजूलाच पेरूचा भरदार मळा उभा होता. झाडावर पेरूं भरमाप लागले होते. अधून मधून एकादा पाडाला येत होता. ती उभी असलेल्या शेतांत कपाशी पेरलेली होती. पेरूच्या मळ्याच्या बाजूलाच काही लिंबाचीं झाडं दिमाखांत उभी होती. रसरसीत हिरवी पिवळी लिंब त्यावर लटकलेली होतीं. आपल्या बापाचं हें सर्व गांवरान धन पाहून बायजाला मनांतल्या मनांत खूप आनंद झाला आणि तो डोळ्यांच्या थाळण्यांतून ओसंडून गालावरच्या खळींतून खळखळ वाहूं लागला !

' धाव ग बायजाऽऽत्या ! ' मोटकऱ्याच्या हाकेनं ती भानावर आली. आणि विहिरीजवळ कसली तरी धावपळ आणि गडबड चालली आहे असं तिला दिसलं. तिच्या छातींत क्षणभर का होईना धस्स झालं. काय झालं असेल याचा अंदाज तिला आला नाही, तरी कांहीतरी घाबरण्यासारखं झालं आहे, हें तिथल्या एकंदर गोंधळावरून तिनं हेरलं. ती जवळ जवळ धाव-तच विहिरीकडे निघाली. पायाला बोचणाऱ्या 'कुऱ्या' कांटे हे तिच्या खिजगणतींतहि नव्हते.

विहिरीजवळ आल्यानंतर तिने जें दृश्य पाहिलं त्यामुळे तिचा चेहरा पांढरा फटफटीत झाला. तिची आओ बाप, भाऊ सर्व गडीमाणसं एका बैलाशेजारी जमलेले होते. आणि एक रामजी गडी हकीकत सांगत होता.

' मी बांधवर बैलें चारी राह्यतुं. तितलामा मना पायजोडे कांहीतरी वयवयनं. मी देखाले लागनू. एक चांगलं असली जनावर चालनं व्हतं. मी जरा घाबरीच गऊ. आन् कसकाय करवा त्या अिचारमां पडनू. तव्हढामा आपला 'गंज्या'नी त्या जनावरना शेंपूटवर पाय पडना, आन् मना डोयादेखत ते जनावर गंज्याना पायले लटकन् ! गंज्यानी गंज पाय झटका पन् कायबी झाय नही. मना ते सात गयथात न् पांचच राह्यंताथ. जनावर कथ निसटनं दिखनं बी नहीं. मी गंज्याकडे देखं. तो वाकडा तिकडा 'ही राह्यंथा. तवय मी त्याले लगेच आव्लोंग व्हडी आनं. " आणि बोलतां बोलतां तो ढळढळ रडूं लागला. त्याबरोबर सर्व माणसं रडूं लागले. त्यांच्या गंज्या बैलाला पान लागलं होतं. त्यांचा गंज्या आचके देत होता. मालजी पाटील तर मटकन् गंज्याजवळ बसले.

'इठ्ठल आपली मोठी गाडी जुपी लय.' मालजी पाटलाचा मोठा मुलगा शिवराम म्हणाला. वेळ जात होती, कांहीतरी केलंच पाहिजे; असं बसून चालणार नाही म्हणून त्याने गड्याला सांगितले.

गाडी आणली. सर्वांनीं काठ्यांच्या सहाय्याने गंज्याला गाडींत घातलें. आजूबाजूला मंडळी बसली. गाडी जोरांत घराकडे निघाली. बायजा तर हें बघून अगदीच घाबरली होती. गंज्यावर तिचा फार जीव, आणि गंज्याहि होताच तसा. अख्या गांवांत गंज्याला तोड नव्हती. गंज्याबद्दलच्या कितीतरी घटना, आठ-वणी तिच्या मनांत गर्दी करूं लागल्या.

एकदा ती सासरहून माहेराला येत होती. छकड्यांत फक्त ती अन् तिचा भाऊ दशरथ हे दोघंच. बहाळ आणि कोळगांव यांच्यांत अर्ध्या वाटेवर एक नाला आहे. खोलगट जागा. तशांत बरड्यांचा भाग. त्यामुळे एकट्या दुकट्या गाडीला धोक्याचा संभव होता. तिसरा पहार उलटून गेला होता. तशीच गंज्याच्या भरंवशावर दशरथने गाडी काढली. त्यावेळीं गंज्या नुकताच गाडीला लावला होता. शेपटीला हात देखील लावूं देत नसे तो. होता होता झापड पडल्याला गाडी त्या नाल्याजवळ आली. ‘ गाडी बयच काढी त्या वखतले ’ बायजाने न राहवून दशरथला दोष दिला. ‘ बायजा, तुना केसले धक्का ते मना जीवले धक्का. आन् गंज्या मंज्या शेतस तवलोंग ते उभा कायबी उना तेबी भीति नही. ’ दशरथने साथ दिली.

गाडी नाल्यांत आली. बैल पाण्यासाठी थांबले. दशरथने पाण्यांत उतरून बैलांना पाणी पिण्यासाठी शीळ घातली. त्याच शिळेचा गैरसमज झाला. आजूबाजूला लपलेल्या दोघांना वाटले साथीदाराने शीळ घातली. ते दबकत दबकत बाहेर आले. अितक्यांत बायजाचं लक्ष एकावर गेलं. आणि ती चेकाळली, ‘ भाऊ घात झायारे ! ’ गंज्याने शब्द ऐकले आणि जो गाडी निघाली तर मैलभर भुरट्यांनी जोरांत पाठलाग केला. पण कांहीच लाग लागला नाही. एकाने तर प्रत्यक्ष कुऱ्हाड हाणून फेकली पण गाडीच मुळी अितक्या वेगांत होती कीं कुऱ्हाड रस्त्यांतच कुठे तरी पडली. शेल आवरून आवरून दशरथचे हात रक्ताळले अखेर त्याला सारून बायजाने शेल हातांत घेतली पण गंज्या मंज्या थांबले ते अगदी घराच्या अंगणांतच ! अशाच एक ना दोन, कितीतरी प्रसंगीं गंज्या मंज्यांनी तिला, तिच्या आई-बापाला, भावांना वाचविलें होतें आणि आज ? तो गंज्या पान लागून असहायपणें गाडींत पडला आहे. बायजाला भडभडून आलं. तिला जोराचा हुंदका आला. ‘ चूप पोरी, आज सांजना वखत शे ! रडाले काय गंज्या मरी ग्या का ? व्ही आपला करमना ते दगड मारता भीति नही ! ’ बापाने समजूत काढली !

गाडी अंगणांत आली. गंज्यासाठी गवताचें अंथरुण तयार करण्यांत आलें. एका गड्याला गांवांतल्या धना महाराकडे पिटाळले तो साप उतरवीत असे. बाकीचे गंज्याच्या शुश्रुषेला लागल.

थोड्याच वेळांत धना आला. त्याने थाळणींत पाणी मागविलें. आणि मंत्र टाकण्यास सुरवात केली.

‘ धना तुना जव्हढा मंत्रे व्हतीन तव्हढा अुगायी टाक. मना गंज्याले जीवदान देशी ते समसू की तूं मालजी पाटीलले जीवदान दिध ! ’ मालजी पाटील कळवळून म्हणाला.

‘ पाटील, मना बापजादा तुमनाच तुकडावर वाढनात. कधी गंज्याले नही नीट कय ते रावजी वठ्यानी पांढरी ताजी करसू. मायबाप तुम्ही धीरच धरा. ’ धन्या महाराने पोटतिडीकेने उद्गार काढले.

त्याला हवा असलेला पाला मागविण्यांत आला. आणि अुपचारासाठी आणखी एका दोघांना त्याच्या दिमतीला देण्यांत आले.

गांवांत बातमी तेव्हाच पसरली. ‘ मालजी पाटीलना गंज्याले पान लागनं ! ’ झालं जो तो धावत सुटला कारण मालजी पाटील म्हणजे गांवातला देवमाणूस. अर्ध्या रात्रीला कुणाला कांही लागलं की त्याने मालजी पाटलाकडे यावे. गरीबगुरीब शेतकऱ्यांचीं कामें तर मालजी पाटलाच्या जनावराकडून होत असत. ठेंगणीशी मूर्ति, उथळ माथा त्यावर पांढऱ्याशुभ्र उपरण्यांत बांधलेली लाल पागोटी, गुडघ्यापर्यंत धोतर, अंगांत नेहरूसदऱ्यासारखा सदरा, कपाळाला नेहमी गंध, मुखांत नेहमी ‘ राम ’, असा मालजी पाटील असहाय होऊन गंज्याजवळ बसला होता. येणारे आपल्यापरीने उपाय सांगत. कुणी म्हणत; ‘ चाळीसगांवथाअीन डाक्तरले लया; ’ कुणी सांगत, ‘ पाटील, देव तुमनाशे कधी वाईट करनार नही ! ’ अशा रीतीने जो तो आपल्या उद्गारांतून पाटलावरील माया व्यक्त करी

संध्याकाळपर्यंत उपचार थांबले. धन्या महाराने शिकस्त केली. जखम करून रक्त काढण्यांत आले. त्यावर कसल्याशा पाल्याचा रस लावला. आणि आजूबाजूला शेवटची करकचून पट्टी बांधीत धन्या महार म्हणाला, ‘ पाटील, ह्या हातनी अजून कांही अपेक्षा



काय शे ते देख नही. गंज्यासाठे मना जीव बी लागना ते मी देसू. तुम्ही कायबी कायजी करूं नका. मी शेच गंज्या पास. तुम्ही आनपानीले लागा ! ”

घरांत अजून दिवठाणीवर दिवा देखील लागला नव्हता. लागणार कसा ? त्यांचा खरा दीप तर बाहेर अंगणांत पडला होता. तोच त्यांचा चालता बोलता दीप. त्याच्यावर तर सगळे मनोरथ. पण ‘ शे अीश्वरना हाथमां ’ म्हणून सगळे आपापल्या कामाला लागले.

‘ बायजा, दिवा लायी दे. आन् चुला चेटाड. कर कांही तरी. ’ बायजाची आअी ओट्यावरच बसत म्हणाली, ‘ माले कांहीबी भूक नही ’

‘ मा, मी खेतमांनतच जेवनू व्हतु. मी खानार नही. ’ तिचा भाऊ म्हणाला.

‘ आन् मंग काय मालेच जग्र भरानं शे वाटतं. येडा झायात का काय तुम्ही समदा ? भाकरपानी सोडीसन का गंज्या चांगला व्हनार शे. चला. बायजा, करव बीन समद्यास्न्या भाकरी. खातीन जराजरा. ’ म्हातारा म्हणत होता. पण एका हाताने डोळ्याच्या कडा पुसत होता. करणार काय ? त्याने तर धीर दिला पाहिजे.

बाहेर अंगणांत गंज्याजवळ एक कंदील लावला होता. गंज्या बेहोष होऊन पडला होता. आजुबाजूला त्रास होऊं नये म्हणून खाटा आडव्या लावल्या होत्या. आणि मालजी पाटील ओट्यावर विचार करीत बसले होते. ‘ गंज्या नीट होअील का ? गंज्या म्हणजे माझा जीव. वेगळा निघालों तेव्हा गंज्याची आअी गिरजा आणि एक बैल वाट्यावर आले. कुणाचा तरी एक घेऊन दिस काढले. पुढे गंज्या झाला. काय योगायोग पहा. तो झाला नि लक्ष्मी दोघा हातांनी पेरूं लागली. एकदा छोटा गंज्या फिरत फिरत एका गवताच्या गंजींत घुसून गेला. संध्याकाळीं खूप पाहिले. पण शोधच लागेना. रात्रीं कुणींच भाकर खाल्ली नाही सकाळीं झापडींतच शेता र गेलों. तो स्वारी गंजीच्या बाजूला मस्त पडली होती. चरून चरून पोट कसं तुडूंब झालं होतं. म्हणून नांव गंज्या. नंतर त्याचा भाऊ मंज्या झाला. गंज्या-मंज्याच्या पायांनी लक्ष्मी घरांत आली.

जमीन वाढली. मळे फोफावले. आणि गंज्या-मंज्याच्या कृपेने घर कसं भरलं आहे किती संकटांतून त्यांनी मला आणि इतरांना सोडवलं असेल ! ज्ञान तर किती ! माणसाला तरी काय असेल ? कधी अंगाला हात लावूं दिला नाही. जें मिळालं तें खाल्लं असेल. कधी वढाळपणा केला नाही. पाटच्या भावासारखं मला सांभाळला. आअीची माया लावली. गंज्या मंज्या म्हणजे साक्षात् देव होते. तोच गंज्या आज अंतरणार की काय ?...

मालजी पाटलाचे विचारचक्र मुलाच्या बोलण्याने मधेच थांबले मुलगा विचारीत होता,

‘ बाबा, जेवानं झाय. चाल घरमां. ’

‘ येस मी. चाल तूं ’ उपरण्याने आपले डोळे पुशीत मालजी पाटील उठले. दिव्याच्या टिमटिमणाऱ्या प्रकाशांत दशरथने बापाकडे पाहिले. निस्तेज चेहरा काळजीची निशाणी असला तरी त्यांत धैर्य नी गंभीरता पण असते. तेंच दशरथला यावेळीं पाटलाच्या चेहऱ्यावर दिसले !

जेवणखाण झाल्यानंतर मालजी पाटील पुन्हा गंज्याजवळ येऊन बसले. आणि धन्या महाराला जेवणासाठी ओट्यावर बोलावले. पाटलाने आपली खाट गंज्याच्या बाजूलाच टाकली. बायजाने धन्याला वाढून दिले. त्यानेहि चार घास खाऊन हात धुतले. आणि अंगणांत येऊन गंज्याजवळ बैठक मारली.

‘ पाटील, जपा तुमी. मी शेच आठे. ’ धन्या गवत नीट करीत म्हणाला.

‘ बर बर ! ’ पण पाटील बसूनच राहिले.

घरांतील मंडळीं तर अतिशय घाबरली होती. बायजाने आपलें व आअीचें अंथरुण घातलें आणि त्या मायलेकींनी अंग टाकलें. दशरथ ओट्यावरच झोपला. पण आज त्या घरांत झोपेला थारा नव्हता. विश्रांतीला जागा नव्हती. डोळ्यांच्या कडा जणू काय कुणी तरी उघड्याच बांधून ठेवल्या होत्या. गंज्या धरून सहा जण काळाशी सामना देत होते. काळरात्र पळापळाने वाढत होती. भाकरी मागणारा गांवकरी ‘ जोहार ’ करून गेला. आकाशांत तारे टिमटिमत होते. सर्वजण या सामन्याकडे पहात होते कोण विजयी होणार ? गंज्या की काळ ? एका बाजूला निष्पाप भोळे जीवन तर

दुसऱ्या बाजूला प्रत्यक्ष काळ! एका बाजूला केवळ भक्ती, दया–माया आणि श्रम यांचा मानवी शेला तर दुसऱ्या बाजूला प्रत्यक्ष यमाची काळदोरी! हा संग्राम आकाशांतील तारे अवकाशांतील जीवजीवाणू बघत होते घराघरांतून बोलणं चाललं होतं, 'गंज्या जगी का?' 'भगवाननी करनी शे!' 'बिचारा मालजी पाटील!' 'देव करो नि गंज्या वाचो!'

मध्यरात्रीचा समय. रातकिड्याचा किर्र्र्र् आवाज कापीत एक व्यक्ति बहाळकडे भरधाव निघाली होती पायवाट जणू काय त्याच्या पायाचा अंदाज घेऊनच वळत होती. त्याचे डोळे समोर कुठे तरी लागले होते. हातांतील काठी आधार देत होती. जामदे स्टेशनवर पाणी पिण्यासाठी म्हणून ती व्यक्ति उतरली. जायचं होतं चाळीसगांवला. पण स्टेशनवर त्याच्या कानावर शब्द पडले, 'मालजी पाटीलना गंज्याले पान लागनं.' त्याला एकदम झटका बसल्यागत झाले तो पुन्हा त्या माणसाजवळ गेला, 'काय झाय वो भाऊ? कोनलें पान लागनं?'

'जी? हां! मालजी पाटील बहायना नही का? त्याना गंज्या बैलले पान लागनं! तिसरा पहारनी गोट शे! धन्या महारनी खटपट चालू शे! भगवाननी मर्जी!' आपल्याकडून जेव्हढं नीट सांगतां येईल तेव्हढं त्याने सांगितलं! झालं. खात्री पटली. व्यक्तीने उपरणं सावरलं. तिकीटमास्तरच्या हातांत तिकीट कोंबून तो निघाला. तिकीटाबरोबर एक रुपयाचीहि नोट कोंबली गेली हें त्याच्या ध्यानींहि नव्हतं. मास्तरच्या हाका त्याला ऐकूंच आल्या नाही. तो भरधाव बहाळकडे निघाला.

मध्यरात्र उलटून गेली. मालजी पाटलाचे डोळे गुंगल्यागत झाले होते. धन्या महार तर बैलाशेजारीच कलंडला होता. पण बायजाला अचानक जाग आली. तिनं पाहिलं दिव्याची वात वाढली होती. आन् हें काय? तिचा डावा डोळा देखील फडफ त होता तिला वाटलं डोळ्यांत कीडं गेलं असल. म्हणून ती पुन्हा लवंडली.

'पाटील! अहो पाटील!' त्या व्यक्तीने पाटलाला हाका मारल्या.

'कोन रं तूं? नांव काय शे तुनं?' पाटलाने डोळे चोळीत विचारलं.

'मी देवबा बेलदार! अुनु तुमना पायजोडे! तो कंदील द्या आथा.'

'कोन? देवबा आन् कथय उनारे तूं! जसा कांही देवच उनारे बा!' मालजी पाटील बाजेवरून उठत म्हणाला! 'बायजा, ऊठ ते, तुना मायलेबी उठाड. हाऊ देवबा उना आपला. आते कायबी भ्याव नही!' पाटलाच्या बोलण्यांत आनंद होता.

देवबाने कंदील घेतला. त्याने सर्प चावल्याची जागा विचारून घेतली. बायजाकडून राख मागवून घेतली. गोमुत्र मागविलें निंबाचा पाला तर त्यानें बरोबरच आणला होता. आणि मग गुरुचें नांव घेऊन त्याने मंत्र घालण्यास सुरवात केली. गोमुत्रांत निंबाचा पाला बुडवून तो बैलाच्या अंगावरून शिडकूं, झटकूं लागला. त्याने जोराने साद घातली, 'चलो बहिरोबा पहिलें नमनऽऽऽऽ उतारा घालून जावा निघूनऽऽऽऽ...!'

मालजी पाटील धावतच वरती चढले. त्यांनी आणखी एकदोन कंदील मागविले गडी माणसांना बोलावून देवबाच्या तैनातींत दिलें! आणि ओट्यावर बाजेवर येऊन बसले. देवबा आला! आणखी काय पाहिजे! गंज्या आता जात नाही. म्हाताऱ्याच्या डोळ्यांतून घळघळ आनंदाश्रु ओघळले. आणि त्यांनी एक भूतकाळांतील आठवण गुंफली. एक एक अश्रु शब्द नि अर्थाचा आकार घेऊं लागले.

एक वर्षापूर्वीची ती अशीच एक रात्र होती. जेवण-खाण आटोपून सर्व मंडळी नुकतीच झोपली होती. शेतांत झालेल्या कामाचा आढावा घेतला जात होता. कपाशी कधी वेचायची, पेरूंना पाणी दिलें की नाही? ज्वारी कशी आहे? भुईमुगचा 'सारा' कधी करायचा? इ. इ.

'पाटील! अहो पाटील! मायबाप जी!' हाकेंत आर्तता होती.

मालजी पाटील उठले. दिव्याची वात मोठी करण्यांत आली. बाहेर येऊन त्यांनी विचारलें, 'कोन शे? काय जोयजे?'



'मी देवबा बेलदार हाय! अिकडं धुळ्याकडं निघालू! वाटेंत सांज झाली. आन् भूक बी लागली. संगतींत बायली पन हाय! कांही मिळल का बाबाजी?' देवबा पायरीवरच बसला. बाजूला त्याची बाईल उभी होती. पाठीशी एक गाठोडं होतं.

मालजी पाटलाने घरांत विचारलें, 'म्हंत कांही उरेल शे का? व्ही तं द्या यास्ले!'

'भाकरी ते व्ही ग्यात. व्हत्यात तव्हढ्या खेतमा धाड्यांत मानसेस्ले!' गिरजाने आंतूनच सांगितलें.

क्षणभर मालजी पाटीलने विचार केला. आणि तो म्हणाला, 'मंग, मी काय म्हनस! भाकरी भाजी कर. आन् यास्ले जेवूं घाला. वखतवर उनांत. आनपानीबीना कसं जावूं देवा!'

'नको मायबाप आम्ही दुसऱ्याघरीं बघतूं! आमच्यासाठी तरास नको घ्या! चल ग.' देवबा पायरीवरून उठत म्हणाला. नवरा बायकोचा संवाद त्याने ऐकला. त्याला वाटलं आपल्यासारख्या भिकारी माणसासाठी एव्हढा त्रास घेणारा हा माणूस आहे की देव आहे?

'देवबा, चढेल पायरी वरथाईन उतरूं नको! वर ये! जेव खाव रातभर व्हाय आन् पायठे उठीसन् मंग जावानं व्ही त मंग जाय!"

देवबाचा नाईलाज झाला. गिरजाने स्वयंपाक तयार केला. व्याह्याच्या थाटांत देवबाला जेवण मिळालें. रात्रीचा पाहुणचार झाला. दुसऱ्या दिवशीं पण जेवण करून देवबा धुळ्याच्या वाटेला लागला.

"माय बाप! मरल तर तुमच्याच पोटीं येईल. कधीकाळीं जरूर पडली तर हाक मारा! अर्ध्या रात्रीला जीव हातावर घेऊन येईन बघा!" असं म्हणून त्याने मालजी पाटलाच्या पायावर डोकं ठेवलं होतं.

कोंबड्यान पहिला बांग दिला. अंधार सरत चालल्याची ती तुतारी होती. पाटलांनी आकाशांत पाहिलं. उगवतीकडून उजाळ्याची झाप चढत होती. आणि अधूनमधून दूरवर केकाटणाऱ्या कुत्र्याचा आवाज, कोल्ह्यांची कुईकुई ऐकूं येत होती.

अितक्यांत अंगणांत खडबडण्याचा आवाज आला. मालजी पाटलानं पाहिलं गंज्या उठून अुभा राहिला होता. आणि अंग झटकत होता. देवबा धावतच वरती आला. त्यानं मालजी पाटलाच्या पायावर डोकं ठेवलं.

'मायबाप! देवाची किरपा. तुमच्या किरपा. तुमच्या अन्नाचाच जोर!'

घरांतून मायलेकी बाहेर आल्या. गंज्याकडे पाहून तर वेड्याच झाल्या त्या बायजानं भाकरीला तेल लावून ती गंज्यावरून ओवाळून टाकली! सकाळीं जिकडे तिकडे बोलणं होत होतं. 'मालजी पाटीलना गंज्या उठना! जसं पेरवा तसं उगस! देव तारी त्याले कोन मारी!'

---

मजबूत व खात्रीलायक लोखंडी सामान मिळण्याचें जळगावांतील

**एकच ठिकाण....**

# तुकाराम श्रीपत चौधरी

**लोखंडी सामानाचें दुकान, पोलन पेठ, जळगांव.**

आमचेकडे सर्व प्रकारचे लोखंडी सामान, पलंग, पाळणे, रंगीत ट्रंक्स्, खुर्च्या, बादल्या, पोळपाट, तवे इत्यादि माल अत्यंत किफायतशीर भावांत मिळेल.

गिऱ्हाईकांचा संतोष हेंच आमचें ध्येय.

एकवेळ अनुभव घेऊन खात्री करा.

सर्व प्रकारच्या सायकलींचा भरपूर स्टॉक असणारें व अत्यंत माफक किंमतींत सायकली विकणारें खानदेशांतील सुप्रसिद्ध असें
— एकच ठिकाण —
रायसोनी सायकल मार्ट
कॉटन मार्केट समोर, जळगांव पू. खा.
तुम्हांस माहीत आहे ना! वेळेची बचत म्हणजेच आयुष्याची बचत--पैशांची बचत. आमचेकडून सायकल खरेदी करून पैशांची बचत करा व सायकलमुळे वेळेची बचत करून आपलें आयुष्य वाढवा.
आमचेकडे सर्व प्रकारच्या सायकली व त्यांचे सुटे भाग अत्यंत किफायतशीर भावांत मिळतील. तसेच हप्त्यानेही सायकली विकत मिळतील.
तुमचा संतोष हेंच आमचें अंतीम ध्येय.

जळगांवांतील माथेरान! (एकवेळ भेट देऊन खात्री करा)
❖ उत्कृष्ट फर्निचरने सजविलेलें,
❖ स्त्रियांकरितां स्वतंत्र व्यवस्था असलेलें,
❖ लस्सी व आईस्क्रीमकरितां लोकप्रिय झालेलें.
❖ त्याचप्रमाणे रेफ्रिजेटरच्या सहाय्याने बर्फतुल्य थंड केलेलीं
मधुर व रुचकर पेयें मिळण्याचें जळगांवांतील
एकच ठिकाणः—
प्रभात सोडा फाउन्टन
'बातमीदार' कचेरीसमोर, जळगांव पू. खा.
[ टीपः १२ डझन अगर त्यापेक्षां जास्त ऑर्डर दिल्यास योग्य कमिशन दिलें जातें ]

## आमचे कलावंत
### "दूरचे दिवे"



बसलेले ( डावीकडून ) : श्री. वाघुळदे, प्रा. भावे; कु. पत्की; कु. सोनाळकर; सौ. थत्ते; प्रा. केळकर; श्री. जावळे.
उभे ( डावीकडून ) : श्री. नेहेते; श्री. अग्रवाल; कु. राणे; श्री. खाड्ये; कु. कुळकर्णी; श्री. चौधरी; श्री सूर्यवंशी

### ऑर्केस्ट्रा



पुढील रांग ( डावीकडून ) : श्री. अर्जुन पाटील, कु. कुळकर्णी, कु जोशी, कु. वाडेकर, श्री. भोंसले, श्री. राणे, श्री भोंसले.
मागील रांग ( डावीकडून ) : श्री. पटवर्धन, श्री मधु कुळकर्णी, श्री. प्रभाकर कुळकर्णी, श्री. फडणीस.

## दूरचे दिवे
### नाट्य प्रयोग



" आम्ही चंद्रपूरचे जहागिरदार ! "
—सरदारसाहेब



" आमच्या चिरंजीवांचं बोलणं, म्हणजे भाषेचा निव्वळ दुरुपयोग " —रावबहादूर



' चालती हो माझ्या घरांतून " —सौदामि



' एकंदरींत आमचंच चुकलं म्हणायचं !
—रावबहादूर



# कॉलेज-विश्वांतील कांहीं व्यक्तिचित्रें

लेखक

—: मनोहर दिघे, द्वितीय वर्ष कला :—

**सतीश** हा पहा सतीश. यंदा बी. अे. ला आहे. साधारण उंच काठी. सावळा वर्ण. चेहऱ्यावर सौम्य भाव. तो भाव जणुं सांगतो कीं हा माणूस सरळ आहे. कुणाच्या ' अध्यांत ' नाही, ' मध्यांत ' नाही; फार मोठ्याने बोलणें नाही. फार मोठ्याने हसणें नाही. वर्गांत ' नोटस् ' अशा छान घेतो ! अक्षर स्वच्छ नी सुंदर. शिक्षकाच्या मुलाची बाळबोध संस्कृति आहे ही. ' साधी रहाणी नी उच्च विचार सरणी ' ही ती ' बाळबोध ' संस्कृति. ( फारसे पैसे जवळ नसल्याने मनुष्य आपोआप साध्या रहाणीचा होतो अन् दुसरें कांहीच करता येत नसल्याने ' उदात्त ' ' कल्पनाविलास ' करतो ! वय २० वर्षें पूर्ण, तरी वयाच्या मानानं किरकोळ वाटतो नाही हा ? संध्याकाळीं फिरायला जायचे, कॉलेजला कधी कधी चालत यायचे हाच त्याचा व्यायाम. वरण-भातासारखें ' सात्विक नि सोवळे ' अन्न खायचें. मग प्रकृति अितपतच ' दणकट ' राहाणार !

पण प्रकृतीचा दर्जा कसाहि असला तरी वाचनाचा दर्जा मात्र फार चांगला आहे हं. फडके, खांडेकर, माडखोलकर आदि जुन्या लेखकांचें ललित-वाङ्मय याने वाचलें आहेच. पण गाडगीळ-गोखले यांच्या नवकथांचें मूल्यमापन करण्याची वाङ्मयीन ' कुवत ' आहे ह्याचेजवळ. ' नवकाव्य ' ही काय ' चीज ' आहे हें तो समजावून घेऊं शकतो. त्यांतल्या विलक्षण उपमांचे चमत्कारीक गूढार्थ तो लावूं शकतो ! अर्नाळ-करांच्या दोन पानांत चार खून पाडणाऱ्या सवंग सनस-नाटी कथांची ओढ त्याला नाही. त्याच्या रसिकतेची पातळी उंच आहे. पेंडश्यांची ' हद्दपार ' अन् अत्र्यांची ' चांगुणा ' अशा सारख्या कादंबऱ्यांचा रसास्वाद तो घेत असतो.

' पिरियड ' नसतांना अितर विद्यार्थी जेव्हा व्हरांड्यांतून ' टिवल्याबावल्या ' करीत फिरतांना आढळतील तेव्हा हा अरविंद गोखल्यांच्या कथांतून आढळणारें मनोविश्लेषण कोणत्या प्रकारचें असतें ह्या सारख्या विषयावर कुणाशी तरी चर्चा करतांना आढळेल. ' पिंगपाँग ' ची मॅच चालूं असतांना ' मॅच ' ( अन् जमल्यास पोरींचे चेहेरे ) बघण्यांस जमलेल्या ' बघ्यांच्या ' गर्दींत हा बहुधा आढळणार नाही. तो बाजूच्या अेकाद्या वर्गांत ' गेल्या तपांतली मराठी कादंबरी ' अशासारखा लेख वाचित बसलेला असेल.

असा हा ' साहित्यिक ' प्रकृतीचा सतीश स्मित करीत बसमध्ये कुणालाहि धक्का न लावतां हळूंच आपल्या जागेवर जाऊन बसलेला दिसला कीं मी मनांत म्हणतों. ' आले, साहित्यिक आले ! '

**बापु** अेवढा वेळ शांत असलेल्या बसमध्ये हास्याची खसखस कशी पिकली ? तो पहा, अैसपैस अंगाचा अन् गरगरीत चेहऱ्याचा बापु ' बस ' मध्ये चढतो आहे. गळ्यांत भडक रंगाचा रेशमी रुमाल, अन् डोळ्यांत खोडकर भाव. तो आपल्या जागेवर जाईपर्यंत अनेकांना धक्के बसतील. ' प री बाळी ' संकोचून बसतील. खिडकींतून दूर कुठें तरी पाहाण्याचा प्रयत्न करतील अेकादी मुलगी दुर्दैवाने जागा नसल्याने जर बाकांच्यामध्ये उभी असली तर तिची धडगत नाही. अंग कितीहि संकोचून घेतलें तरी तिला धक्का बसल्यावाचून राहाणार नाही. आपल्या जागेवर बसल्यावर आपल्या विशाल देहाने शेजारी बसणाराची बापू कुचंबणा करील. आणि जरा अैसपैस बसल्यानंतर आपल्या ' कम्पूं 'तील अेकाद्या दोस्ताच्या खांद्यावर हात ठेवून छद्मी आवाजांत म्हणेल, " अरे क्यों, आज लाल साडी पेहेनी है ! " अन् त्याबरोबर त्या ' लालसाडी 'कडे साऱ्यांचें लक्ष जाईल. बापूच्या कम्पूंत छद्मी हास्याची खळखळ माजेल. साध्यासुध्या पोरा-पोरींना संकोचल्यासारखे होईल. अन् त्या " लाल साडीला " मेल्यासारखे होईल.

सुखवस्तु पाटलाचा हा पोर. कॉलेजांत 'खास' प्रसिद्धी पावलेला आहे. दोन वेळा घरीं खावें, चार वेळा हॉटेलांत चरावें, कॉलेजच्या जिमखान्यावर थोडासा खेळ खेळावा, पुष्कळशी गुंडगिरी करावी, शक्य त्या पिरियडस्‌ना दांड्या माराव्या, व्हरांड्यांत आपल्या कम्पुतल्या दोस्तांना घेऊन 'टिवल्या बावल्या' कराव्यात, मोकळेपणें वावरणें पोरींना अशक्य करावें, असा ह्याचा अेकंदर दिनक्रम.

बापु वर्गांत असला तर काय स्वस्थ बसेल म्हणतां? पुढच्या 'बेंच'वर बसलेल्या विद्यार्थ्यांच्या करता येतील त्या खोड्या काढील. अितर विद्यार्थी प्राध्यापकाचें व्याख्यान अैकण्यांत, अन् 'नोटस्' घेण्यांत मग्न झालेले असतांना बापूच्या वहीवर पुष्कळदां 'चित्रकला' सुरू असते. कदाचित् तें प्राध्यापकाचें (व्यंग) चित्र असेल; कदाचित् अेकाद्या मुलीचें. हे त्याचे चाळे पाहून त्याच्या शेजारी बसलेल्या विद्यार्थ्याला हसूं दाबणें कठीण होतें.

कॉलेजमध्ये अेकाद्या बाहेरच्या वक्त्यांचें भाषण असलें की व्याख्यानाच्या सुरुवातीला अन् शेवटीं जें 'स्टँपिंग' होईल त्यावेळीं सर्वांत जोराचा आवाज ज्या कोपऱ्यांतून येईल त्या कोपऱ्यांत हे 'पात्र' आपल्या कुटाळ कंपूला घेऊन बसलेले आहे असें तुम्ही खुशाल समजावें अन् मग व्याख्यान चालूं असतांना त्या कोपऱ्यांतून मुलींच्या बाजूला कागदी बाण सुटतांना दिसतील. तुमच्या हातांत अेकादा बाण लागला तर तुम्हाला त्यावर लिहिलेलें दिसेल. "मज फिरफिरुनी छळिसी कां?"

पहिल्या टर्मभर असे अनेक 'धंदे' केल्यानंतर बापु 'टर्मिनल'च्या पहिल्या पेपराच्या वेळीं जेव्हा परीक्षा-हॉल मध्ये प्रवेश करील त्यावेळी त्याचा चेहेरा तुम्हाला गंभीर झाल्यासारखा वाटेल. प्रश्नपत्रिका हातांत पडल्यानंतर तो ती वाचण्याचा 'प्रयत्न' करील. मग अिकडे तिकडे हॉलभर नजर फिरवील. थोड्या त्रस्त नजरेने पुन्हा पत्रिका वाचण्याचा प्रयत्न करील. पहिलीं दहा मिनिटें गेलीं. आता तो लिहिण्याला सुरुवात करतो आहे. पण पेन फारसे जलद चालत नाही. मधुनमधुन तो आजुबाजूला पाहील. सारे पेपर लिहिण्यांत मग्न झाले आहेत. "कांही जमत नाही बुवा." असा त्रासिक भाव त्याच्या मुद्रेवर उमटेल. पण तसेच लिहिण्याचा तो आणखी प्रयत्न करील. झालीं. २५ मिनिटें गेलीत. आता त्याचें पेन थांबलें. थोडासा हताश चेहेरा करून तो तें खाली ठेवील. मग हळुच तें बंद करील. आणि पेपर हातात घेऊन उठेल. तेव्हढ्यांत सुपरवायझर त्याचेजवळ येऊन त्याला सांगतील " आणखी ५ मिनिटें थांबा. अर्ध्या तासाच्या आंत बाहेर पडतां येणार नाही." साऱ्यांचें लक्ष त्याचे बाजूला वळेल अन् थोडी खसखस पिकेऊ. बापूहि हसायला लागेल. अन् थोड्या वेळाने तो जेव्हा परीक्षा-हॉल मधून बाहेर पडेल त्यावेळी त्याच्या चेहेऱ्यावर नेहमीचा बेदरकारपणा दिसेल; नजरेंत मिस्किल छटा खेळायला लागेल. परीक्षाहॉलमध्ये बसलेला खरा बापू नव्हे. आता बाहेर पडलेला खरा बापु. Here is again true Bapu.

**रजनी** पिवळे जॉर्जेटचें पातळ अन् शुभ्र रेशमी चोळी-फॅशन पोलकें अशा वेषांतली ठेंगण्या बांध्याची ही आकर्षक पाठमोरी आकृति कुणा कॉलेजकन्यकेची आहे? पाठीमागून मोठी आरोग्यपूर्ण नि मोहक दिसणारी रजनीची आकृति समोरून मात्र तेवढीशी चांगली दिसत नाही. अन् पाठमोऱ्या आकृतींतल्या सौंदर्यपूर्ण सौष्ठवाने चकित झालेल्या माणसाची तिला समोरून पाहतांना थोडी निराशा होते.

रजनीचा वर्ण सांवळा. चेहेरा लांबट अन् नाक अमळ मोठेंच. चेहेऱ्याला थोडेसें विशोभित. मोठ्याने बोलतांना किंवा हसतांना मीं तिला अजून बघितले नाही. चारचौघीजणींत उठून दिसेल अितकें चेहेऱ्याचें सौंदर्य तिच्याजवळ नाही पण तरतरीत बुद्धी मात्र आहे. तर्कशास्त्रासारख्या बुद्धीला ताण देणाऱ्या विषयांतील कठीण प्रमेयांचें आकलन तिला चटकन झालेलें पाहून तुम्हाला आश्चर्य वाटल्यावांचून राहाणार नाही. अेकादे वेळेस होतें काय कीं प्राध्यापकांनी १—२ विद्यार्थ्यांना अेकादा प्रश्न विचारलेला असतो अेकालाहि त्याचें बरोबर उत्तर देतां येत नाही तोच प्रश्न हिला वि[चा]रतात. सशासारख्या भित्र्या नजरेने संकोचून अव[घडून] उभ्या राहिलेल्या हिला प[ा]हून वाटतें कीं ही Shy दिसणारी मुलगी काय उत्तर देणार? पण उत्तर बहुधा बरोबर निघतें!



ह्या जगांत डोकें असणें अन् सौंदर्यदृष्टी असणें ह्या गोष्टी अेकत्र सांपडणें कठीणच. पण ह्या तल्लख बुद्धीच्या मुलीच्या बाबतींत मात्र ही गोष्ट घडली आहे असें वाटतें. पांढऱ्या स्वच्छ पातळावर तांम्रवर्णी पोलका किंवा निळ्या साडीवर पांढरा ब्लाऊझ् हा तिचा choice पाहिल्यानंतर तिच्या सौन्दर्यदृष्टीची कल्पना येते. तिच्या उंच टाचांच्या चपला, बारीक घाटाची नक्षीदार सोन्याचीं कंकणें, डाव्या मनगटावरचें इवलेसे घड्याळ, लहानसर काळे पेन, स्वच्छ कव्हर्स लाविलेलीं पुस्तकें नी वह्या, चालण्यांतली शालीनता अन् नजरेंतलें मार्दव या साऱ्यांमुळे ह्या सुखवस्तु मध्यम वर्गांतून आलेल्या युवतीच्या सुसंस्कृत 'टेस्ट्'ची साक्ष मिळते.

अन् दुपारीं ४ च्या सुमारास बसमधून उतरल्या-नंतर आपल्या घराच्या दिशेने जाणाऱ्या तिच्या ठेंगण्या आकर्षक पाठमोऱ्या आकृतीकडे वळून पाहिल्यावाचून तुम्हाला राहावणार नाही.

**दयाराम** दुपारचे सव्वा तीन झाले आहेत. चौथा पिरियड संपला आहे विद्यार्थी विद्यार्थिनी बसकडे घाईत निघाले आहेत. या बसकडे जाणाऱ्या गर्दीत दयाराम नाही. तो त्या गर्दीपासून दूर आहे दुरून त्या बसकडे जाणाऱ्या गर्दीकडे तो पहात आहे. आपल्याला या घोळक्यांत मिसळून जाता येणार नाही ही जाणीव त्याला शल्यासारखी बोंचते आहे.

दयारामच्या कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न रु. १०० (महाराच्या कुटुंबाचें उत्पन्न आणखी किती असणार?) आतापर्यंतचें त्याचें शिक्षण नादारीवर आणि सरकारी शिष्यवृत्तीवर झालेलें. अशा या दरिद्री दयारामला कसले बसमध्ये जाता येणार? त्याला पायींच गेले पाहिजे. थोडा वेळ विद्यार्थ्यांच्या हसण्याचे नी विद्यार्थिनींच्या भाषणांचे किनरे आवाज वातावरणांत अुठतील अन् बस फर्र्र्ऽऽ करीत निघून जाईल.

......आणि दयाराम १॥ मैलावर गांवाच्या कडेवर असणाऱ्या कळकट वस्तींतल्या आपल्या खोलीकडे निघेल.

त्याला राहायला शहरांतल्या स्पृश्यांच्या वस्तींत घर मिळूं शकत नाही तो राहातो त्या वस्तींत कांही दरिद्री कुटुंबें कांही वेश्या अन् मुसलमान राहातात. प्रामुख्याने मुसलमानांची वस्ती आहे ती. स्पृश्य हिंदु आपल्या वस्तींत त्याला सामावून घेऊं शकत नाहीत. अहिंदुंना मात्र तो तुच्छ वाटत नाही.

खूप शिक्षण घेऊं; चांगली नोकरी मिळवूं; सुधारलेल्या समाजाबरोबर जाण्याचा प्रयत्न करूं; अशा कांहीतरी विचाराने तो या शहरांत आला आहे. कॉलेजांतलीं सुटाबुटांतलीं, उजळवर्णाची अन् वाक्या-गणिक इंग्रजी शब्द पेरून रुबाबांत बोलणारीं पांढरपेश्यांची पोरं पाहिलीं म्हणजे त्याला वाटतं आपणहि त्यांच्यांत जाऊन मिसळावं. अेकाद्याच्या खांद्यावर हात ठेवून विचारावं, "सेनचं Economics चें पुस्तक जठार-बेरीपेक्षा चांगलं वाटतं का हो तुम्हाला?" किंवा दुसऱ्याच्या पाठीवर थाप देऊन सलगींत म्हणावं 'परवां मुंबईला गुप्तेने काय झकास विकेटस घेतल्यात!" पण तें सारं त्याच्या मनांतच राहातं.

ह्या बगळ्यासारख्या पांढऱ्या कपड्यांतल्या पांढरपेश्यांच्या डोळ्यांत त्याच्याविषयीं स्नेहभाव दिसत नाही. आपल्या पांढऱ्या कपड्यावर धूळ बसूं नये म्हणून ते जितके जपतात त्यापेक्षा जास्त तो आपल्या फारसा निकट येऊं नये म्हणून ते जपतात. कांहीच्या नजरेंत त्याला तिरस्कारहि दिसलेला आहे म्हणून त्यांच्याजवळ जाण्याचा तोहि फारसा प्रयत्न करीत नाही.

कॉलेजच्या व्हरांड्यांतून नटव्या पोरींचा घोळका जातांना दिसला कीं, साऱ्यांच्या नजरा तिकडे वळतात. कुठून थट्टेचे शब्द अैकूं येतात. कांही 'स्मार्ट' पोरं ह्या घोळक्याच्या आसपास रेंगाळत जातात अन् पोरीहि त्यांच्याकडे कटाक्ष फेकीत मनात या मनांत आपल्या सौंदर्यावर आपणच खूष होत लचकत मुरडत निघून जातात. दयाराम कुठेंतरी बाजूला उभा असतो. अितरां प्रमाणे त्या घोळक्याकडे पाहूं लागणाऱ्या मनाला त्याला आवरतां येत नाही. त्या पोरी त्याच्याकडे कधी बघत नाहीत. त्याच्यामध्ये आणि बाकीच्या पोरा-पोरींमध्ये अेक मोठी भिंत उभी आहे याची त्याला जाणीव होते. अन् तो मनांत खिन्न होऊन दुसरीकडे पाहूं लागतो.

ह्या स्पृश्यांच्या 'स्मार्ट' जगांत ये आपल्याला स्थान नाही हा विचार त्याचें काळीज कुरतडतो.

**विजय** अन् समोरून खाड् खाड् बूट वाजवीत मान वाजवीपेक्षा जास्त ताठ करीत येणारा विजय पाहिलांत कां? आता जवळ आला म्हणजे तुम्हाला मोठ्या डौलांत विचारील 'हॅलो,' पिरियड 'नाही वाटतं तुम्हाला?' अन् थोडासा थांबून केसावरून अैटीने हात फिरवून तुमच्याशी बोलेल. बोलतांना मध्येच अेकादें अिंग्रजी वाक्य 'साहेबी' थाटांत उच्चारील अन् पुन्हा खाड् खाड् बूट वाजवीत निघून जाईल. तुम्ही मनांत म्हणाल, काय 'शिष्ट' आहे लेकाचा!

शिष्ट वाटावा असें तो पुष्कळदां वागतोहि कधी 'टाय' बांधून अस्सल साहेबी थाटांत येईल. मधुनच कधी सभ्यासारखा धोतर नेसून येईल. बोलण्यांत नेहेमी आपण 'कुणी तरी' आहोंत अशी अहंकाराची झाक. बोलतांना मध्येच इंग्रजी वाक्य तोंडांतल्या तोंडांत बोलेल. हें सारे पाहून तुम्हाला वाटेल जरा 'जादा' दिसते आहे स्वारी.

हा 'जादा'पणा समाजांतल्या अेका प्रतिष्ठित पांढरपेशा वर्गाचा गुण आहे. डॉक्टर वकील, जज्ज, मामलेदार वगैरे अधिकारी अशांचा हा वर्ग. थोडेफार कर्तृत्व, अन् अधिकार याबरोबर थोडीशी आर्थिक सुस्थिती लाभली कीं ही 'जादा' प्रवृत्ती वाढीस लागते. अशा प्रतिष्ठित वर्गांतून आलेल्या विजयमध्ये हा जादा गुण न दिसला तरच नवल.

गौरवर्णाच्या ह्या 'स्मार्ट' पोराची बुद्धी 'जिलेट'च्या पात्यासारखी तीक्ष्ण आहे प्राध्यापकांचीं व्याख्यानं फार झटकन् तो grasp करूं शकतो. बीजगणितांतलीं कठीण प्रमेयें त्याला चटकन् आकलन होतात. परिक्षेंत त्याला पहिल्या दर्जाचे 'मार्क्स्' पडायचे हें ठरलेलें. हुशार विद्यार्थी म्हणून तो साऱ्या कॉलेजांत ओळखला जातो. खान्देशी कॉलेजांत पोरांना इंग्रजी बेताबाताचेंच बोलतां येते. अशा पोरांमध्ये हा टेचांत इंग्रजी बोलणारा उठून दिसतो खाड् खाड् चालणारा विजय अेकाद्या राजकीय घटनेविषयी तुमच्याशी फाड्फाड् बोलायला लागला म्हणजे त्याच्याकडे तुम्ही बघत राहाल.

आर्थिक सुस्थितीच्या जोडीला तीव्र बुद्धी लाभल्याने विजयच्या व्यक्तित्वांत अहंकाराची धार लागल्यासारखी वाटते. पण त्या अहंकाराची खपली फार लवकर उडूं शकते. 'टाय' लावून जरा 'जादा' ऐटींत तो तुमच्याजवळ आला कीं तुम्ही थोड्या औपरोधिक स्वरांत म्हणा "या प्रोफेसर! पिरियड् नाही वाटत तुम्हाला आता?" अन् त्याचा चेहेऱ्यावरचा 'जादा' पणा किती लवकर विरघळतो तें बघा. ओशाळल्यागत हसून तो म्हणेल 'काय राव टिंगल करताय आमची.' अन् मग मात्र त्याच्या स्वरांत मार्दव येईल. अन् तुम्हाला वाटेल वाटतो तितका अहंकारी नाही बरं कां हा. अन्तःकरणाचा हा सरळ माणूस आहे.

**चंदु** 'रीडिंगरूम'मध्ये विद्यार्थ्यांची ये जा सुरूं आहे. त्यांच्या आपसांतल्या बोलण्याने सारें दालन गजबजून गेलें आहे. कांही बाकावर बसून मासिकें चाळताहेत. मध्यभागी टेबलावर पसरलेल्या वर्तमानपत्राभोवती ४–५ जण गर्दी करून अुभे आहेत. कोपऱ्यांत 'फिल्मफेअर'च्या मुखपृष्ठावरची नटीचें चित्र पाहाण्याकरितां कांही जण धडपडत आहेत. चंदु भिंतीच्या लगत लाविलेल्या अेका स्टॅंडपाशी उभा आहे. टाईम्स पाहातोय तो. काय पहातोय? नेहरूंनी मुंबईला केलेलें भाषण पहातोय कीं रशियाच्या दौऱ्यावरून परत आलेल्या दुर्गा खोटेची मुलाखत वाचतोय? छे! तसें कांहीं दिसत नाही. तो पहातोय शेवटचें पान. इंटर सायन्सच्या वर्गांत असणारा चंदु जाहिरातीचें पान पहातोय. Wanted च्या जाहिराती पाहातोय!

मध्यम उंचीचा सावळ्या वर्णाचा अन् किंचित लांबट चेहेऱ्याचा हा तरतरीत मुलगा गेल्या वर्षी कॉलेजांत आला तेव्हा केवढ्या उत्साहांत होता. निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर अधिकच सुंदर वाटणारी कॉलेजची भव्य इमारत, त्या इमारतींतील विशाल दालनें, विशाल प्रयोगशाळा हें सारे पाहून त्याच्या मनाचीं क्षितिजं विशाल झाल्यासारखी त्याला वाटलीं. मोठ्या उत्साहाने त्याने कॉलेज जीवनाला सुरुवात केली. वर्गांतील प्रत्येक व्याख्यान तो लक्षपूर्वक ऐके. प्रत्येक व्याख्यानाच्या सुसंगत 'नोटस्' काळजीपूर्वक तो घेत असे. त्याच्या प्रॅक्टिकल्सच्या वह्या पूर्ण असत. त्याचे वर्गांतले विद्यार्थी पुष्कळदा त्याच्या वह्यावरून प्रयोग लिहून घेत. तोहि तत्परतेने त्यांना मदत करी. नेमलेल्या अभ्यासाव्यतिरिक्त



साहित्य, राजकारण ह्याविषयींहि अनेक गोष्टी आपल्याला समजाव्यात असे त्याला वाटे. कॉलेजांत वा गांवांत होणारीं प्रसिद्ध वक्त्यांचीं भाषणें तो संधी मिळेल तेव्हा उत्सुकतेने अैकी.

पहिल्या वर्षाच्या परीक्षेंत त्याने यशहि चांगलें मिळविलें. अन् त्याचें तरुण मन महत्वाकांक्षेच्या भराऱ्या मारूं लागलें होतें. उज्ज्वल स्वप्नांचे मनोरे बांधूं लागले होते.

पण......पण आठ माणसांचें कुटुंब चालविणाऱ्या कारकुनाच्या मुलाचे मनोरथ ढासळायला वेळ कितीसा लागणार? गेल्या वैशाखांत ह्याच्या वडील बहिणीचें लग्न झालें. पांढरपेशांजवळ पैसा नसला तरी पैशाचा आव आणावा लागतो. हुंडा अन् प्रतिष्ठेकरितां कराव्या लागलेल्या अितर खर्चाने आधीच जेमतेम असलेल्या त्याच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीला जोराचा फटका बसला होता. त्या फटक्याने त्याचे वडील वैतागल्यासारखे झाले होते. आईच्या चेहेऱ्यावर चिंतच्या दाट छाया पसरूं लागल्या होत्या.

१५ दिवसापूर्वी थकलेल्या फी बाबत नोटीस कॉलेजच्या नोटीस बोर्डावर लागली होती. अनेक नांवाच्या यादींत त्याचेंहि नांव होतें. 'फी करितां' पैशाची त्याने दोनदां घरांत मागणी केली होती. वडील 'पुढे बघूं' असें कांहीतरी म्हणालें. ४ दिवसापूर्वी नोटीस–बोर्डावर निर्वाणीची नोटीस लागली होती. अन् त्यानेहि घरांत निर्वाणीची मागणी केली. वैतागलेले वडील त्याच्या अंगावर ओरडले, 'कुठून आणायचे पैसे? घरांत किती काटकसर चालली आहे तें बघतोस ना?' अन् त्याच्या तरुण मनाला तीव्र वेदना झाल्या.

आतापर्यंत घरांतल्या परिस्थितीकडे त्याचें तितकेसें लक्ष गेलें नव्हतें. त्याचें तरुण मन कॉलेजच्या निराळ्याच विश्वांत वावरत होतें. त्या वातावरणाचें धुकें त्याच्या डोळ्यासमोर आल्याने कठोर वस्तुस्थितीची तितकीशी तीव्र जाणीव त्याला झाली नव्हती. गेले ४ दिवस तो वर्गांत येत होता. प्राध्यापकांच्या व्याख्यानांचे शब्द त्याच्या कानावरून जात होते पण डोक्यांत शिरत नव्हते. समोरच्या पुस्तकावरचीं अक्षरें दिसत होतीं पण त्यांचा अर्थ उमजत नव्हता. विचारांचीं चक्रें उलट सुलट वेगाने डोक्यांत फिरत होतीं. पुरेसे कपडे नसलेलीं भावंडें डोळ्यासमोर येत होतीं. चिंतेच्या छायांनी काळवंडलेला दिवसभर घरांत कष्ट उपसणाऱ्या आईचा चेहेरा डोळ्यासमोर येत होता. अन् अन्तःकरण विव्हल करणारा अेक विचार हळुहळु प्रभावी होत होता. आपल्याला कॉलेज सोडलें पाहिजे. हें महाग शिक्षण आपल्याकरिता नाही. हा विचार त्याचे सारे मनोरथ ढासळून टाकणारा होता.

म्हणून उदास चेहेऱ्याने चंदु आज 'टाईम्स'चें शेवटचें पान पहात होता! Wanted च्या जाहिराती पहात होता!

---


सर्व प्रकारच्या खेळांच्या सामानाचे प्रमुख विक्रेते

# खान्देश स्पोर्ट्स्

नवी पेठ, जळगांव (पूर्व खान्देश)

आमचेकडे सर्व प्रकारच्या राष्ट्रीय आणि विदेशी खेळांचें सामान अत्यंत चांगलें आणि माफक भावांत मिळतें. तसेंच लगोऱ्या, लेझीम, जोड्या, डंबेल्स, वॉण्ड्स वगैरे शाळांना लागणारें सामानही मिळेल.

समक्ष अगर पत्रद्वारें चौकशी करा.

# 'अनाहूत'

लेखक- कु. सुलोचना आठवले
चतुर्थ वर्ष, ( कला-विभाग. )

असा राग येतो बघा अशा लोकांचा! दुसऱ्याचं कुठलंहि कार्य सफल होऊं द्यायचं नाही असा जणुं बेतच असतो की काय त्यांचा कोण जाणे! आपण ठरवावं एक आणि नेमकं त्याच्या उलट घडत असतं. आता परवाचीच गोष्ट पहा ना!

दिवाळी २-३ दिवसांवर आली म्हणून मी मैत्रिणींना पाठविण्यासाठीं ग्रीटिंगकार्डस् तयार करीत होतें. धाकटा भाऊहि घरांत नव्हता व त्रास द्यावयाला घरांत कोणीच नव्हतं. तयार करून ठेवलेली डिझाइन्स मीं रंगवायला घेतली. इतक्यांत खाली हॉर्न ऐकूं आला. कोण आलं कोण जाणे! मी हळूंच खिडकींतून डोकावले - ओळखीचे पाहुणे दिसले. म्हटलं असतील १।२ जणं. बघतें तर...... एक, दोन, तीन, चार......बापरे! सारी फलटणच्या फलटण हजर झाली होती. मीं लक्षच द्यायचं नाही असं ठरवलं. फिका पिवळा तयार करून पहिला वॉश दिला चित्राला. इतक्यांत माझ्या कानांवर शब्द आले. "ए मावशी, तूं काय करतेस? मी रंग देऊ?" पाहुण्यांचा छोटा सुधीर केव्हा येऊन बसला कोण जाणे! पण त्यानं जोडलेलं 'मावशी'च नातं मला फार आवडलं. त्याचं तें लाडिक बोलणं ऐकून मीं त्याला तिथं बसायला परवानगी दिली. रंग वाळल्यावर पानांच्या दांड्यासाठीं हिरवा रंग तयार केला. इतक्यात सतीश, रेखा, प्रसन्न सर्वजणच आली की तिथं! मी भराभर सामान आवरायला सुरवात केली. आईची हांक ऐकूं आली ही बहुतेक चहाची वर्दी असणार याची खात्री होऊनच मी रेखाला सामना-जवळ बसवून घरांत गेलें १५।२० मिनिटांत मुलांचा आवाज कां येत नाहीं म्हणून बघायला गेलें तों काय? एकेक चित्र घेऊन सर्वांनी चित्रें हिरवीगार करून ठेवली होती! आतां गार होण्याची पाळी मात्र माझ्यावर आली होती! माझ्या चेहेऱ्यावरील रागीट भाव पाहून रेखा घाबरली. तितक्यांत तिची आईच तिथं आली व म्हणाली, "काय रे, काय त्रास देतां मावशीला?" मी आवंढा गिळून म्हटलं, "छे त्रास कसला? मुलंच तीं! गंमत करताहेत कांही तरी!" असं म्हणणाऱ्या माझा चेहेरा अगदी पाहण्यालाय... झाला होता.

असले प्रसंग आमच्याकडे नेहेमी घडता... पाहुण्यांचं हसतमुखानं स्वागत करावं हें मला कळतं... त्याप्रमाणे मी करतेंहि. पण कांही कांही अनाहू... पाहुण्यांची मिजास इतकी असते की मग मात्र अ... पाहुणे येऊंच नयेत असं वाटायला लागतं. आम... खऱ्या नातेवाईक पाहुण्याच्या ऐवजीं या अशा पाहुण्यां... बडदास्त ठेवण्यांतच आमचा वेळ जातो.

परवा एकदा असाच गाडींत ओळख झाले... भावाचा मित्र आज अजिंठा बघण्यासाठी आला म्हणे... वास्तविक नुसत्या गाडींतल्या ओळखीवर आपण कां... कोणाकडे जात नाहीं. आम्ही त्याला फराळाची तया... करून दिली. त्याच्या लांबलांब गप्पावरून वाटलं ... हा भावाचा अगदी जिगर दोस्त असावा. आपल्या... जवळ १०० रु. ची नोट आहे. व सुटे पैसे कराय... वेळ नव्हता म्हणून तो आमच्याजवळून १० रु. घे... गेला. अजिंठ्याहून आल्यानंतर पैसे परत देईन म्हण... तीनतीनदा बजावून गेला. मला वाटलं १०० रु. नोट जवळ बाळगणारा हा पैसे नक्कीच परत करील... पण गंमत अशी की अजिंठ्याहून तो परत आमच्याकडे... आलाच नाही. मला वाटतं अजून त्याला १०० रु. सुटे पैसे मिळाले नसावेत!

मला तर हल्ली असं वाटायला लागलंय की मोठ्या... शहरांत रहाणाऱ्या पाहुण्यांनी आमच्याकडे येऊ... नाही. कारण ह्या जळगावसारख्या गांवांत पाहुणे आ... की मला प्रश्न पडतो, की आता त्यांना दाखवाय... तरी काय! संध्याकाळीं पाहुण्यांची प्रेक्षणीय स्थ... बघण्याची तयारी सुरू झाली की मला भीति वा... लागते. शिवाय जरी त्यांना फिरायला नेलं तरी टीका... ऐकावी लागते. "शीः काय हे रस्ते! काय ही धूळ... कॉलेज दाखवायला नेलं तर, 'हेंच का तुमचं कॉलेज... विशेष मोठं नाहीं;" 'नांव जळगांव' पण पाण्या...



तर ठणठणाट दिसतो इथं.' ह्या अशा तऱ्हेचे वाक्प्रहार मला अगदी असह्य होतात. हजारदा मनांत येतं की त्यांना म्हणावं 'एवढी नांवं ठेवायची होती तर येता तरी कशाला?' पण मनांतले विचार मनांतच विरतात.

परवाच आलेल्या पाहुण्यांना एका नामवंत गाय-नाचा कार्यक्रम ऐकायला मिळणार म्हणून मी अगदी खुशींत होतें. निदान आज तरी पाहुणे खूष होणार अशी मला खात्री होती. आम्ही सर्वजण गाण्याला गेलों तिथे मध्यंतरी थोडी गडबड झाली. झालं! आमच्या पाहुण्यांना टीकेला विषय मिळाला. "काय हे श्रोते, गाणं ऐकण्याइतकं कोणीच रसिक दिसत नाहीं इथं. सर्वांच्या गप्पाच चालू आहेत," असं म्हणणाऱ्या त्या पाहुण्यांचं गाण्याकडं किती लक्ष होतं त्याबद्दल मी साशंकच आहें.

पाहुण्यांनी केलेली टीका सर्वस्वी चूक असते असं मला म्हणता येणार नाहीं. तरी पण आपल्याकडे येऊन आपल्या गांवाला अशी नांवं ठेवलेली कोणालाच सहन होत नसतील. निदान मला तरी होत नाहींत. अशा वेळीं माझा स्वाभिमान नक्कीच दुखावतो. पण त्या पाहुण्यांना खरमरीत उत्तर देऊन गप्प बसविण्याचं धैर्य मात्र माझ्यांत नसतं.

कांही कांही पाहुणे तर इतके मिजासखोर असतात कीं त्यांचं तंत्र सांभाळतां सांभाळतां आमची अगदी त्रेधा उडते. चहा केला तर, 'आम्ही हल्ली सर्वांनी चहा सोडला आहे, कॉफी चालेल.' असं चहा केल्यानंतर सांगायला ते कधीच मागेपुढे पाहत नाहींत. जेवणांत तरी त्यांच्या किती तऱ्हा! एकाला पाहिजे गोड, एकाला तिखट, एकाला अगदी अळणी! कोणत्याहि सुग्रणबाईला इतकी तंत्रं संभाळायला नक्कीच त्रास पडेल.

एकदा आमच्याकडे एक गृहस्थ पाहुणे म्हणून आले. त्यांना रात्रीं घड्याळाच्या आवाजानें सुद्धा झोंप येत नसे. म्हणून आम्ही रात्रीं घड्याळ बंद ठेवलें. भावाच्या हातांतील घड्याळ तो रात्रीं काढून ठेवायला विसरला होता. रात्रीं भावाचा हात पाहुण्यांच्या पलंगाजवळ झोंपेंत पडला. झालं! पाहुण्यांना घड्याळाच्या आवाजानं झोंप येईना! म्हणून त्यांनी हळूंच भावाच्या हातांतील घड्याळ काढायला सुरवात केली. भाऊ झोंपेंत होता. तो एकदम जागा होऊन, 'चोर चोर', म्हणून ओरडूं लागला. आम्ही सर्वजण जागे होऊन पाहतों तर आमच्या पाहुण्यांचा अगदी थरकांप झाला होता. त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडेना! नंतर त्यांनी जेव्हा आम्हांला सर्व हकीगत सांगितली तेव्हा आमची हसतां हसतां मुरकुंडी वळली. पण दुसऱ्या दिवशीं मात्र गल्लींतील प्रत्येकजण आमच्या रात्रीच्या गोंधळाबद्दल विचारूं लागला. कोणाला आमच्याकडे बरीच चोरी झाल्याचा सुगावा लागला, कोणी आमच्याबद्दल सहानुभूति दाखवायला लागला! एक आठवडाभर आमच्या गल्लींत तोच विषय चालू होता!

आमच्या काकांचा पाहुण्यांच्या बाबतींतला अनुभव तर अगदी गमतीचा आहे. पूर्वी ते खेड्यांत रहात असल्यामुळे त्यांच्याकडे कोणीच जात नसे. पण त्यांना पाहुणे आलेले फार आवडायचे. मी पाहुण्यांच्या बद्दलचा माझा अनुभव त्यांना सांगितला होता. ते म्हणायचे. 'तुम्हाला पाहुण्यांशीं नीट वागतांच येत नाही.' आम्ही त्यांच्या मागे लागून लागून त्यांना महाबळेश्वरला बंगला घ्यायला लावला. ते तिथे गेले आणि त्यांच्याकडे पाहण्यांची रीघ सुरू झाली. वाटेल ते नातं जोडून, ओळखी काढून, कधीं आमची ओळख दाखवून त्यांच्याकडे इतके पाहुणे यायला लागले की वर्षाच्या आंतच ते कंटाळून परत खेड्यांतच येऊन राहिले.

माझ्याकडे आलेल्या एका पाहुणीची आठवण तर मी कधीच विसरणार नाहीं. प्राणापलीकडे असलेल्या माझ्या फुलांच्या आल्बममधील फुलं तिनं हातोहात पळवलीं आहेत. लहानपणापासूनच निरनिराळ्या रंगी बेरंगी फुलांचा आल्बम तयार करायचा हा माझा आवडता छंद! लहानपणी मैत्रिणींना आणून दिलेल्या फुलांकरिता मी त्यांना कित्येकदा माझ्या पेन्सिली देऊन टाकलेल्या अजून आठवतात मला! माझे काका जेव्हा इंग्लंडहून परत आले तेव्हा मी त्यांना माझ्या-करिता रंगीबेरंगी फुलंच आणायला सांगितली होती. पुष्कळांना हा माझा छंद पाहून हंसू येईल, पुष्कळांना तो लहान मुलासारखा वाटेल! 'प्रौढत्वीं निज शैशवास जपणे' हा जरी कविबाणा असला तरी कवि नसले-ल्यांनी शैशवांतलीं चिंचाबोरें चाखूं नयेत असं थोडंच आहे? माझा आल्बम म्हणजे केवळ वाळलेलीं फुलंच आहेत, असं कुणाला वाटेल कदाचित. पण ह्या

वाळलेल्या फुलांच्या भोवती स्मृतींचा जो सुगंध दरवळतो, तो कुठल्याहि क्षणी मला मोह पाडतो. त्या प्रत्येक फुलांत माझ्या स्मृति दडलेल्या आहेत. ज्या ज्या मैत्रिणींनी, व्यक्तींनी मला तीं फुलं दिलीं, ज्या ज्या प्रसंगीं मला तीं मिळालीं, त्या मैत्रिणी. ते प्रसंग हा आल्बम पाहतांना माझ्या डोळ्यांपुढे उभे राहतात. मला करमत नसलं कीं मी तो आल्बम चाळत बसतें. त्या दिवशीं आलेल्या त्या पाहुणीला मीं तो आल्बम सहज चाळायला दिला. माझ्या सारखीच तिलाहि फुलांची आवड असल्याचं तिनं मला सांगितलं. 'समानधर्मा' मिळाला म्हणजे आपला आनंद द्विगुणीत होतो नाहीं का? तिनं आपलं कौतुक करावं असं मला फार वाटलं. आणि त्याप्रमाणं तिनं तें केलंहि. इतकंच काय पण जातांना मला नवीन तऱ्हेचीं फुलं पाठवायचं कबूल केलं तिनं. ती गेल्यावर मी आल्बम सहज चाळायला लागलें. त्यांतील कित्येक सुंदर सुंदर फुलं गहाळ झालेलीं दिसलीं मला! माझ्या मनांत आलं त्या पाहुणीला पत्रांत कळवावं की मला तूं नवीन तऱ्हेची फुलं पाठवणार होतीस तीं नको पाठवूं. पण निदान माझीं पळवलेलीं फुलं तरी परत पाठव. पण......

असं जरी असलं तरी पाहुणे आलेले मला आवडतच नाहीं असं मात्र नाहीं हं! पाहुण्यांच्या शिवाय मजा नाहीं हें मलाहि पटतं. एवढंच काय पाहुण्यांचं स्वागत करायला मी सदैव तयार असतें. पण असले त्रासदायक व मिजासखोर पाहुणे आले की मा[…] आम्हाला हसरे मुखवटे धारण करावे लागतात. अ[…] तऱ्हेचे अनाहून पाहुणे आले की घरांतल्या माणसां[…] स्वतःचें स्वतंत्र अस्तित्वच रहात नाहीं. स्वतःच्या[…] घरांत त्यांना अपरिचितासारखं वाटायला लागतं. कार[…] सदासर्वकाळ त्या पाहुण्यांची बडदास्त ठेवण्यांत [… ] नाखुशीनं का होईना त्यांच्या बडबडीकडे लक्ष देण्यांत[…] त्यांचा सारा वेळ जातो.

एखादेवेळीं वाटायला लागतं कीं देवांनी आपल[…] स्वभाव फटकळ करायला हवा होता. पण म[…] आपल्याकडे कोणी कधींच आलं नसतं ह्या भीती[…] तो विचार कुठल्याकुठे नाहीसा होतो. कधीं कधीं म[…] वाटतं कीं आपण पाहुण्यांवर इतकी झोड उठवतो, प[…] आपण पाहुणे म्हणून गेलों तर कशा वागूं? अ[…] मग माझं मन मला खात्री देतं कीं निदान माझ्याक[…] येणाऱ्या त्रासदायक पाहुण्यांच्यासारखी तरी मी खास[…] वागवणार नाहीं.

असं जरी असलं तरी ७।८ दिवसांत पाहुणे आ[…] नाहीत कीं मला सुचत नाहीं, चुकल्या चुकल्यासार[…] वाटतं. ती शान्तता सहनच होत नाहीं. ती धडपड, बडबड, गडबड हवीशी वाटते.

पण ही वादळापूर्वीची शांतता असते हे विसरू[…] चालणार नाही हं! कारण दुसऱ्याच क्षणी पाहुण्यांची स्वारी येऊन थडकते!

---

## काल – आज – उद्या!

(मुक्तच्छंद)

—लोपते 'काल' अर्धवट स्मृतींत  
बरे-वाईट क्षण अंतरीं आठवतो सदा  
मधूस्मृतींनी हृदय फुले,  
आणि हळहळे केव्हा बघुनी!  
—परि 'आज' येई जन्मा घेऊनी—  
नवा जोम, नव्या आशा, परंतु—  
तेंच सदाचें रडगाणें-तोच धकाधकीचा मामला

हिंमत खचे, मिळे गती विचारचक्रा केव्हा  
—मग करी विचार मानव—  
उद्यांचा सदा.  
केवळ उद्यांवर तो जगे.  
कल्पना-तरंग किती उठती—  
जणूं व्योमीं मारी तो भरारी!  
काल-आज-उद्या यांत वाटे  
उद्या श्रेष्ठ मला!

—श. रा. राणे (तृतीय वर्ष, कला)



# पुण्याच्या परिसरांत

(लेखक : रा. भा. सोनार, तृतीय वर्ष-शास्त्र.)

सायन्स असोसिएशनविषयी मला फार जिव्हाळा वाटतो. तिची दरवर्षी निघणारी सफर तर मला फार आवडते. मागच्या वर्षीची नागपूर ट्रिप मी अजून विसरलों नाहीं. आक्टोबरच्या १० तारखेला जेव्हा आम्ही स्टेशनवर नागपूर एक्स्प्रेसची वाट पहात होतों, त्यावेळी नेमकी तीच कल्पना माझ्या डोक्यांत होती. त्या दिवशीं त्याच गाडीने, पण विरुद्ध दिशेने आम्ही पुण्याला जाणार होतों!

सफरी तर अनेक निघतात, पण त्या सफरीसारखी सुव्यवस्थित सफर विरळाच! प्रो थत्ते यांच्यावरच तिची जबाबदारी होती. ते दिसायला किरकोळ दिसले तर त्यांच्यांत उत्साह किती भरपूर आहे ह्याची त्या ६ दिवसांत आम्हाला पुरेपूर कल्पना आली आम्ही म्हणजे ५८ विद्यार्थी आणि २ कॉलेजचे शिपाई!

गाडीचा एक मोठा डबा आमच्यासाठी स्पेशल होता! जळगांव आम्ही मोठ्या उत्साहांत सोडलं. ९-१० तासांचा कल्याणपर्यंतचा आमचा प्रवास, नुसत्या हास्यविनोदांत पार पडला. कॉलेज विद्यार्थ्यांच्या स्पेशल डब्यांत कंटाळवाणेपणा घुसेल तरी कसा? गाडी चालू असतांनाच नाशिकच्या पुढे माझ्या डोक्यांत एक कल्पना आली. कोजागिरी पौर्णिमा आम्हाला पुण्याला पडणार होती ती जर एवढ्या विद्यार्थ्यांनी साजरी केली तर? तर-तर—! ही कल्पना डब्यांत पसरली आणि थत्ते सराकडून ती लगेच संमत झाली! दुसरी एक कल्पना डोक्यांत आली. पुण्याला जायचं, आणि स्टुडिओ पहावयाचा नाही म्हणजे काय? मुलांना कल्पना एकदम पसंत! तीही मान्य झाली.

दुपारीं ४॥ ला आम्ही कल्याणला उतरलों आणि लगेच तेथील रेयॉन कॉर्पोरेशनला भेट द्यायला निघालों. आमचे सामान वेटिंगरूममध्ये प्युन्स सांभाळायला बसले बसमधून आम्ही ५ ला त्या स्थळीं पोहोंचलों. कांहीही भव्य पाहिलं की आपण आपोआप नम्र होतों. ती टोलेजंग इमारत आणि तिचा तो अफाट पसारा पाहून, आम्ही कॉलेजविद्यार्थी, अगदी शिस्तप्रिय बनलों! आमच्या तुकड्या पाडण्यांत आल्या. आमच्या गाइडने आम्हाला दाखवायला सुरवात केली.

प्रथम त्यांची प्रयोगशाळा आम्ही पाहिली. प्रयोगशाळांचें महत्व उद्योगधंद्यांत फार असतें, हें आम्ही प्रत्यक्ष पाहिलें. प्रयोगशाळेंतल्या २-३ गोष्टी मला फार आवडल्या एक म्हणजे ४ दशांश स्थळापर्यंत ग्रॅममध्ये झटपट एका मिनिटाच्या आंत वजन करून देणारा बॅलन्स! दुसरा बॅलन्स तर त्याहून सोयीचा. ह्या विद्युत्-बॅलन्समध्ये प्रत्यक्ष वजन टाकायचे नाही, आणि वस्तूचें वजन मात्र अगदी अचूक! 0·0001 ग्रॅमचाही फरक नाही! तिसरी गोष्ट म्हणजे इलेक्ट्रिक ओव्हन्स! 2000°c ला क्रुसिबल्स अशा लाल जर्द तापल्या होत्या म्हणतां!

यानंतर आम्ही प्रत्यक्ष कारखाना पहावयास सुरवात केली. $CS_2$ कॉस्टिक सोडा आणि पेपर पल्प् ह्या तीन गोष्टींपासून, पायरी पायरीने जाऊन, शेवटीं रेशमाचा धागा कसा बनतो, हें आम्ही मंत्रमुग्ध होऊन पाहूं लागलों! आजुबाजूला प्रचंड यंत्रांचा खडखडाट, ट्यूब लाईट्चा झक प्रकाश, आणि व्यवस्थित अगदी विद्यार्थ्यांसारखे दिसणारे मजूर! कित्येक दालनें आम्ही फिरलों. दुसऱ्या मजल्यावरही यंत्रें राबत होतीं! कृत्रिम रेशमाचे धागे करणारा हा एकच कारखाना पहातांच मानवी बुद्धीची थोडीशी कल्पना आम्हाला आली! साऱ्या दूर कॉर्बन डाय सल्फाइडचा वास येत होता! ते सिलेंडर्स किती अवाढव्य होते! स्टीमरूमचें आमच्या गाईडने एक लहानसेंच दार किंचित् उघडलें. वाऱ्याच्या झोतासारखी गरम वाफ आमच्या अंगावर येतांच आम्ही एकदम मागें सरलों! आम्हीं जें जें येथे

पाहिलें, तें सारें लिहायला लागलों तर पारिभाषिक शब्दांमुळे तें कंटाळवाणें होईल; निदान जे सायन्सचे विद्यार्थी नाहीत त्यांना तरी! शेवटच्या भव्य दालनांतून आमचा पाय निघेना! ह्या ठिकाणीं प्रत्यक्ष धागा तयार होत होता. ॲसिडच्या प्रवाहांत ( $H_2SO_4$ ) एका घट्टशा पदार्थांपासून मजूर धागा किती सफाईने काढीत होते. ( मजुरांनीं रबरी हातमोजे घातले होते. ) ती जादू आम्हीं पुन्हा पुन्हा पाहिली! १॥ तास आमचा भरकन् निघून गेला. शेवटी दुसऱ्या मजल्यावरून एकंदर प्लँटची रचना गाईडने आम्हाला दाखविली. त्यांच्या नम्र वागणुकीबद्दल आम्ही गाईडचे आभार मानले, आणि बाहेर पडलों.

कल्याणला सारी वेटिंगरूम आम्ही ६० जणांनी बळकावली होती! कल्याणला चोरांची फार भीति म्हणे! पण आम्ही मनांत म्हटलें, येथे यायची त्यांची छाती नाही! पण सकाळी उठून पहातों तों, एकाचा कॅमेरा नाहीसा झालेला!

सकाळीं ७॥ ला आम्ही लोकलने अंबरनाथला १० मिनिटांत पोहोंचलों. लोकलची मजा त्या १० मिनिटांत मीं पाहिली. मला वाटलें ह्या लोकांना असेंच धावपळीचं जीवन जगावें लागत असल्याने, ह्यांना शांति लाभत असेल काय? अंबरनाथला आम्हाला दुपारीं १२ पर्यंत दोन फॅक्टऱ्या पाहावयाच्या होत्या.

धरमसी मोरारजी केमिकल वर्क्सच्या आवारांत आम्ही ८ च्या सुमारास पोहोंचलों बाहेरचा देखावा पाहून आम्हाला वाटलं, फॅक्टरी मामुली आहे. पण आंत गेल्यावर आम्ही थक्क झालों! $H_2SO_4$ ॲसिडच्या मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेसेस् आम्ही पहिल्या वर्षाला शिकलों होतों। पुस्तकी शिक्षण, प्रॅक्टिकल शिक्षणापुढे कसं मामुली ठरतें, याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हीं तेथे घेतला! त्याठिकाणी $H_2SO_4$ करण्याच्या दोन्ही पद्धती आम्ही पाहिल्या. कॉंट्रॅक्ट प्रोसेसने थोडीशीच जागा व्यापली होती. पण प्लँट मात्र खूप उंच! चेंबर्स प्रोसेस पाहून आमची छाती दडपली अति उंच आणि अति अजस्र असे दो[न] चेंबर्स जवळ जवळ होते. आमची अक्कल गुंग झाली! जमी[नी]फळ्यावरची आकृति, आणि प्रत्यक्ष हे चेंबर्स! जमीन अस्मानाचा फरक कशाला म्हणत असतील तर तो यालाच! ज्यांना फुप्फुसांचा विकार असेल त्यांना मध्ये यावयाला गाईडने बंदी केली होती. आम्हीं नाकाला रुमाल लावून सारं पाहिलं. गंधक जळतांना त्याच्या निघणाऱ्या सुंदर निळसर ज्वाला मी तरी विसरणार नाहीं.



[ सल्फ्युरिक ॲसिड प्लँट ]

एक तासानंतर तेथून आम्ही WIMCO क[डे] वळलों व्हीमको म्हणजे Western Indi[a] Match Co. घोडा छाप, वाघ छाप वगैरे आग[पेट्या] पेट्या येथे तयार होतात. हा कारखाना आम्हाला फारफार आवडला. सारे कांही मनोरंजक होतें आणि समजावयाला पण सोपें! जंगलांतून आणलेल्या लाकडा[पासून] पासून शेवटी बाजारांत मिळणारी आगपेटी कशी तयार होते, हें क्रमशः पहाण्यांत आम्ही स्वतःलाच विसरलों.

कारखान्याच्या अगदी शेवटल्या टोकाकडून आम्ही पहायला सुरवात केली. गाईड होतेच बरोबर. एका ठिकाणी कित्येक मण वजनाचे लाकडाचे ठोकळे ( झाडाचीं खोडें ) वरून सारख्या झिरपणाऱ्या पाण्या[नें] खाली मऊ होत होते. एका यांत्रिक करवतीने त्यांचे हवे तसे तुकडे होत. दुसऱ्या दालनांत आम्ही प्रवेश केला, तेथून खरी मजा! अथा[ंग] कागदावर लिहिलेली मजा वाचण्यांत आणि सारं प्रत्यक्ष पाहण्यांत फरक पडेलच! एक यंत्र २ मिलिमिटर जाडीचे लाकडाचे लांबच लांब [पट्टे] काढीत होतं. दुसरं यंत्र त्यांना विशिष्ट आकारांत स्क्रॅपिंग करायचं. त्या स्क्रॅपिंगवरून तो पट्टा लगेच दुमडला जायचा, आणि तयार का[डे] व्हायचं, तर आगपेटीचा वरचा झाकणाचा डबा प्रत्येक स्टेप आम्हाला गाईड समजावून सांगूं लागले! थोडं थांबवायचं, नंतर [चालू] करून, घडी कशी होते, तें दाखवायचें! ह्या गाईडमुळे आम्ही फार खूष होतों! शंकेचें निरसन होई[पर्यंत]



ते सारें सांगत. आगपेटीच्या डब्यावर निळ्या कागदांचं वेष्टन यंत्रानेच बसवलें जाई तो भाग आम्ही पुन्हा पुन्हा पाहिला यंत्रांत एका बाजूने डबा शिरतो, खटखट होतं, आणि सट्कन् निळा डबा बाहेर पडतो अशाच प्रकारें काड्या ठेवण्याचा मधला भाग तयार होतो

यानंतरचा मनोरंजक भाग म्हणजे आगकाड्यांना गूल लावण्याचा होता! आम्ही सारखें टकमक पहातच राहिलों. आगकाड्यांचा एक थापाचा थापा पुढे सरकत असतो! जणू सहस्त्रावधी ताठ उभे राहिलेले सैनिक! एक घट्टसें काळसर मिश्रण सारखें गोल फिरत असतें, त्यांत ह्या काड्या आपलें डोकें हळूच खुपसतात, क्षणभर थांबून पुढे सरकूं लागतात! आम्ही पुढे सरकलों. ह्या भागावर आम्ही खूष झालों. इकडून तिकडे फिरणारे यांत्रिक रस्ते, कशासाठी तर डब्यांची नेआण करण्यासाठी. पुढच्या दालनांतील यंत्रें जादूचीच म्हटलीं पाहिजेत. तें यंत्र नेमक्या ६० काड्या उचलतें, व्यवस्थित डब्यांत भरतें, वरचा डबा आपोआप त्यावर चढतो, आणि लेबल लावून आगपेटी बाहेर पडते! आणि पुढचें यंत्र १२ च पेट्या घेतें, दुसऱ्या बाजूने डझनाचें बंडल तयार बाहेर पडतें! अगदी थेट जंगलांतून आणलेल्या लाकडापासून तों काडी ओढली की अग्नी देणाऱ्या पेटीपर्यंत! किती अजब! सर्वजण अगदी आनंदी होऊन बाहेर पडले! बाहेर आल्यावर कांहींनी आपल्या खिशांतून आगपेट्या बाहेर काढल्या! रेडीमेड माल!

अंबरनाथला पुन्हा आम्हीं लोकल पकडली. कल्याणला एका हॉटेलमध्ये सर्वांनी प्रवेश केला. पोटोबा थोडा शांत केल्यावर आम्ही पुण्याची तयारी केली. १२-४० ला गाडी आली. स्पेशल डब्याशिवाय बात नाही! आम्ही खंडाळा घाटांतून गेलों, आणि एक अवीट आनंदाचा ठेवा मिळविला. दुपारी ४ च्या सुमारास पुण्याला आमचे पाय लागले. आम्ही फर्ग्युसन कॉलेजला जायला पायीच निघालों. सामान गाड्यांवरून गेले. फर्ग्युसनच्या आवारांत त्या कॉलेजची व M. J. C. ची तुलना फार रंगांत आली. आम्ही एका मोठ्या हॉलमध्ये तळ ठोकला. कँटीनमधे कॉफीची व्यवस्था झाली. जेवणाचं प्रत्येकाने आपआपलें पहायचें होतें ८ च्या सुमारास मी मित्रांबरोबर पुणें पहायला बाहेर पडलों.

सकाळीं येथे स्नानाची वगैरे व्यवस्था फार छान झाली. गरम पाणी होतें. तेथल्या मेसमध्ये १४ आण्यांत चांगलें जेवण मिळतें. ११॥ ला आमच्या दाराशी दोन मोटारी आल्या. P. M. T. ( Poona Municipal Transport ) च्या त्या मोटारी आम्हाला पसंत पडल्या. आमच्या मोटारी पुण्याच्या रस्त्यांवरून धावूं लागल्या! आमचं पुण्याचं पहिलं पाहवयाचं स्थळ म्हणजे 'साठे बिस्किट प्रॉडक्ट्स्'. तेथे मोटारी जातांच दोन व्यक्ती बाहेर आल्या त्यांनी आमचे हसतमुखाने स्वागत केलं! त्यांची वागणूक फार सौजन्यपूर्ण होती. नंतर आमच्या बॅचेस् पाडण्यांत आल्या.

ह्या कारखान्यांत दूरवर गोडगोड वास येत होता. प्रथम निम्मी मुलें कारखाना पहायला आंत गेली. तोंपर्यंत आम्ही बाकीचे त्यांच्या भव्य हॉलमध्यें बसलों. जवळच विमानतळ होता. येणाऱ्या विमानांची मजा आयतीच पहायला मिळाली.

प्रथम आम्ही चॉकलेट्स आणि कोको पावडर कशी करतात तें पाहावयास सुरवात केली. त्यांचा मुख्य कच्चा माल कोकोबिया ब्राझील, सिलोनमध्यें होतात. त्या बिया दळल्यावर त्यांची रबडी तयार करतात. बियापासून निघालेला तो घट्टसा द्रव पदार्थ पाहून आम्ही कोल्डरूमकडे वळलों. रबडीच्या घट्ट वड्या येथे साच्यांत ठेवतात. खोलीच्या भिंती अगदीं थंडगार. आम्हाला वाटलं आमच्या अंगावर दंव पडतय! रबडीं साखर खवा, वगैरे मिसळून चॉकलेट्स कशी बनतात तें आम्हीं पाहिलें. कोको, केक ( बियांपासून झालेली ) दळल्यावर कोको पावडर होते.

बिस्किटांचें काम सुरू व्हावयाला अवकाश होता. तोंपर्यंत साठे बंधूतर्फे आम्हाला एक ग्रँड पार्टी देण्यांत आली. चहा आणि बिस्किट्स ६० लोकांना. त्यांनी प्रत्येकाला ८-८, ९-९ बिस्किट्स येतील येवढीं बिस्किटें खर्च केली! ३० रुपयाच्यावर खर्च केला असेल! तेथले अधिकारी ( गाईड स्वतः चहा देऊं लागताच, त्यांच्या सौजन्याबद्दल त्यांचे आभार कसें मानावेत तेंच आम्हाला कळेना!

अडीचला आम्ही बिस्किटांचा भाग पहायला सुरवात केली. ८-९ वेगवेगळी विद्युत् यंत्रे ओळीने बसविलेलीं होतीं. प्रत्येकाचं काम वेगळं. मैदा, साखर वेगवेगळ्या पावडर्स मिसळायाचं काम पहिल्या यंत्राचं पुढे वेगवेगळ्या आकाराची बिस्किटें ठशांसहीत पडतात. ७-८ मशिन्समधून तीं बिस्किटें जातांना फारच सुंदर दिसतात. असंख्य बिस्किटें अगदीं शिस्तींत पुढे सरकतात तीं आपोआप डब्यांत भरण्यायोग्य स्थितींत बाहेर पडतात. हें दालन मुलांना फार आवडलें हा एका महाराष्ट्रीयन कारखानदाराचा कारखाना प्रथमच पाहून मला फार धन्य वाटलें.



[ साठे बिस्किट कारखाना ]

महाराष्ट्राबाहेरही त्यांच्या मालाचा खप आहे. परत जातांना आम्ही गाइडचे आभार मानले, त्याला उत्तर देतांना ते म्हणाले, " Pleasure is mine ! "

तेथून दुपारीं तीनला आमच्या मोटारी वेधशाळेकडे वळल्या. वेधशाळेची दगडी भव्य इमारत पाहून आम्हाला वाटलं, ह्या नावाजलेल्या ठिकाणीं बरंच पाहायला मिळेल. पण निराशा झाली आमची. इमारतीच्या मधल्या भागाची उंची पहात असतांना मला तीन स्वच्छ तारे दिसले. अरे ! भरदुपारी चांदण्या? पण लगेच लक्षांत आलं, वेधशाळेने सोडलेले फुगे होते ते.

आम्हांला फक्त दोनच दालनें पाह्यला मिळालीं. मुख्य आम्हीं काय पाहिलं तर तक्ते, आलेख, आणि बऱ्याच प्रकारचे थर्मामिटर्स्. गाईडही कांही जास्त सांगत नव्हते भारतांतील १२ वेधशाळांची ही वेधशाळा मुख्य आहे, हें लक्षांत येऊन, आणि कांहीच पाह्यला मिळत नाही हें पाहून आम्ही निराश झालों. एका यंत्राची माहिती देण्यासारखी आहे. तें यंत्र एका



[ खडकवासला धरणावर ]

मोठ्या बलूनमध्यें ठेऊन हवेंत सोडतात हवेच्या दाबाविषयीं वगैरे नोंद तें यंत्र एका कागदावर करतें. बलून फुटतें, यंत्राचा नाश होतो तो कागद जो आणू देईल त्याला बक्षिस मिळतं असे प्रयोग भारतांत रो... १२ ठिकाणीं होतात. यंत्राची किंमत १५० रुपये !

वेधशाळेच्या उंचीची मात्र आम्हांला नेहमी... आठवण राहील. गोल जिन्यांतून वर जायला ... ५ मिनिटं लागतात. १८... पायऱ्या चढून गेल्या... आम्हाला १९५ फूट उंचीव... पुणें शहर पहायला मिळाले... फारच रम्य देखावा हिर... झाडींत पुणें किती सुंदर वा... आम्हाला !

५ वाजतां संभाजी पार्कम... १५ मिनिटें आम्ही मत्स्या... पाहिलें. बऱ्याच मित्रांना घे... मी हिंदविजयमध्ये सिनेमास्कोप पहावयास गेलों. ज... गांवला तरी सिनेमास्कोप कधी पाह्यला मिळाला नस... स्टीरीओ फोनिक साऊंडची कल्पना मला फार आवड... ९ ला आम्ही आनंदाने बाहेर पडलों. समोर हॉटे... दिसलें. खिशांत पैसे, पोटोबा खाली, समोर हॉटे... तंत्र लगेच जमलं ! ९॥ ला रात्रीं आम्ही फर्ग्युसन... पोहोंचलों.

त्या दिवशीं कोजागिरी होती आमची. ( ती आम्ही... पाडव्याला साजरी केली. ) रात्रीं १० ला सारी ... चांदण्यांत जमली होतीं. ५० शेर दूध आटव... मग काय ? ३-३ ... दूध, गरम शेंगा, गा... बासरी, नकला !

१३ तारखेला सका... ८ ला S. T. ... दोन मोटारी पुण्या... थडकल्या. ... बाहेर १२-१३ ... लांब आम्ही खडक... सल्याला गेलों डोळ्या... आनंद देणारी वस्तू म्हणजे विस्तृत शांत जला... येथे भारत सरकारचं Central Water



Power Research Station आहे गाइड आम्हाला तेथे चालणाऱ्या कामांची कल्पना देऊं लागले. निरनिराळ्या ८-१० नद्यांवर बांधण्यांत येणाऱ्या धरणांची पायलट मॉडेल्स् आम्हीं पाहिलीं. कोसी व ब्रम्हपुत्रा नद्यांना लगाम घालणाऱ्या त्यांच्या योजनेची माहिती आम्हाला प्रात्यक्षिक रुपाने पहातां आली. मिळणाऱ्या माहितीकडे कोणाचें जास्त लक्ष नव्हतें. दुरून दिसणाऱ्या धरणाकडें साऱ्यांची दृष्टी ! रीसर्च स्टेशनने फार जागा व्यापली होती. आम्ही धरणाकडे वळलों. बस्स तेंच हवं होतं आम्हाला ! धरणाची १ मैल लांब भिंत आम्ही पायाखाली घातली एका बाजूला अफाट पाणी ! दुसऱ्या बाजूला डोकावून पाह्यला हिंमतच पाहिजे ! एवढ्या उंचीवरून पडणाऱ्या पाण्यावर सकाळचें उन पडून फार अवर्णनीय शोभा दिसत होती. इंद्रधनुष्यें तयार झाली होती मोटारी आम्हाला ठिकाणावर घेऊन आल्या. मेसमधे जेवण तयार होतें.



सेंट्रल वॉटर अँड पावर रिसर्च स्टेशन
खडकवासला

दुसरी P. M. T. च्या मोटारी आम्हाला खडकीला घेऊन गेल्या. तेथे आम्ही स्वस्तिक रबर प्रॉडक्टस्ला भेट दिली. रबराचे नानाविध प्रकारचे पदार्थ तयार होतांना आम्हीं पाहिले. मुलांचीं खेळणींच जास्त होतात. कारखानदाराला आमची भेट फार मानवली असावी. पुष्कळ मुलें तेथे माल खरेदी करूनच बाहेर पडली. मालकाने प्रो. थत्त्यांना एक रबरी मुलगा भेट दिला. मोटारी परत फिरल्यावर थत्ते सर म्हणाले 'ही व्हिजिट मला जास्त आवडली.' मुलं टाळ्या पिटायला लागलीं. त्यांतच एकाने विचारलें 'सर, मुलाचं नांव काय ठेवलं ?' एकच हशा पिकला आमच्या मोटारींत !

आपल्या युनिव्हर्सिटीकडे आमच्या मोटारी धावत होत्या. किती रम्य रस्ता ! दोन्ही बाजूला गर्द झाडी. विद्यापीठाची इमारत आणि समोरचा नयनाभिराम बगीचा पाहून प्रत्येकाला फार आनंद झाला ! हें आमचें विद्यापीठ ! कसें भव्य आणि बळकट ! दर्शनी हॉलमधे मराठा वीरांचीं तैलचित्रें आणि जुनीं शस्त्रास्त्रें जपून ठेवलीं होतीं. महाराष्ट्राच्या विद्यापीठाने असें करणें अगदी योग्य ! अत्यंत शांततेने आम्ही लायब्ररी पाहिली. मागच्या बाजूला विस्तीर्ण हिरवळीवर आम्ही बसलों. कांही वेळाने मोटारी आम्हाला आमच्या दाराशी घेऊन गेल्या.

१४ तारखेला मोटारी आम्हाला नॅशनल केमिकल लॅबोरेटरींत घेऊन गेल्या. ह्या ठिकाणीं यायला मी फार उत्सुक होतों. सायन्सच्या विद्यार्थ्यांना येथे सारं दाखवितात असं मी ऐकलं होतं. पण माझा बराच अपेक्षाभंग झाला. अगदी लांबच लांब पिवळी इमारत. फरशीवरून चालतांना आमच्या सँडल्स घसरूं लागल्या. प्रयोगशाळेच्या अत्यंत सुंदर अशा प्रेक्षकगृहांत आम्हाला प्रयोगशाळेची पूर्ण माहिती मराठींतून देण्यांत आली. आम्ही बॅचेस पाडून पहायला सुरुवात केली. एक गृहस्थ येऊन सांगून गेले कीं सारं बाहेरूनच पहा, मध्ये जाऊं नका. आमच्या बॅचच्या गाईडचा मला खरंच राग आला. तो कांहीच सांगेना. मी हळूच त्याचा डोळा चुकवून दुसऱ्या बॅचमधे शिरलों.



नॅशनल केमिकल लॅबोरेटरी

येथे रसायनशास्त्राच्या ७ शाखांतून संशोधन

चालूं आहे. केमिकल इंजिनिअरिंगचा भाग भारतांतल्या उद्योगधंद्यांना विनामूल्य मार्गदर्शन करतो व माहिती पुरवतो. आयन--एक्सेंज म्हणून नवीन प्रकाराने साखर शुद्ध करून गंधकाचा पैसा वाचवण्याचें श्रेय याच प्रयोगशाळेला आहे. वाया जाणाऱ्या क्लोरिनचा उपयोग कसा करतां येईल, याचे पायलट मॉडेल्स आम्हीं पाहिले. आम्हीं ७ ही विभाग एकानंतर एक पाहिलें, पण सारं लांबून ! लवकर लवकर पाहूनहि सारं पाह्यला दोन तास लागले. सारं रसायनशास्त्राचं काम ! हल्लीच्या रासायनिक युगाची किंचित् कल्पना तेथे आली. फिजिकल केमिस्ट्रीचा भाग जरा मजेचा वाटला. कारण तो इन्स्ट्रुमेंटल् होता. मायक्रो ऑरगॅनिझम सेक्शनमधे ५००० ऑरगॅनिझम जिवंत ठेवले आहेत. ज्यांच्यावर प्रथम प्रयोग करतात अशा प्राण्यांचं ॲनिमल हॉऊस आम्हाला गमतीचें वाटलें.

गाईडने आम्हाला प्रयोगशाळेच्या वाचनालयांत नेलें. ह्या वाचनालयांत असंख्य शास्त्रीय पुस्तकें आहेत. ३५० जर्नल्स दर महिन्याला येथे येतात. मायक्रो कार्ड नावाचें एक आश्चर्यकारक यंत्र आम्हीं येथे पाहिलें. फोटो घेऊन एका मायक्रो कार्डावर पुस्तकाची ४०-५० पानें सहज छापतां येतात. या यंत्राने तीं पानें मोठ्या अक्षरांत क्रमाने वाचता येतात. २-३ शेल्फवर मावणारी पुस्तकें मायक्रोकार्डवर घेतल्यास १ फूट लांब ३ इंच उंच ह्या जागेंत मावूं शकतात. यंत्राची किंमत ३५० डॉलर्स ! इतर मुलांची वाट पहात आम्ही १० मिनिटें येथल्या अति स्वच्छ कँटिनमध्ये थांबलों. नंतर १२ च्या सुमारास स्वस्थानीं परतलों.



" अशोकस्तंभ "
नॅशनल डिफेन्स ॲकेडमी

दुपारीं आम्ही डेक्कन स्टुडियोंत जाऊन थबकलों. प्रत्यक्ष शूटिंग पहाण्याची साऱ्यांना भारी उत्सुकता. सारे सेटवर गेले. २-३ मेकअप् मधल्या तरुणी दिसतांच मुलांना चर्चेला विषय मिळाला. आम्हाला वाटलें ह्या Extra आहेत ! सेटवर शूटींगला अवकाश होता. तोंपर्यंत आम्ही इतर सारं पाहून घेतलं. भव्य पडदे, लाकडाच्याच आणि पोकळ भिंती ! पण हुबेहुब ! समोरचं घरही लाकडी ! एका झाडाच्या फांद्या दोरानें बांधून ठेवल्या होत्या ! 'अपुरा डाव' चें शूटिंग सुरू होतें. एका वाक्याचें रेकॉर्डिंग पुरतं शूटिंग होतं. पण अर्धा तास झाला तरी तें पुरें होईना. दिग्दर्शक अभिनय करून दाखवी. सारं सुरू झाल्यावर कुठें अभिनय चुकताच लगेच 'कट्' ! आम्ही कंटाळलों ! शेवटी परतलों मोटारीजवळ.

पुन्हा आमच्या मोटारी पुण्याबाहेर धावूं लागल्या. खडकवासल्याच्या नॅशनल डिफेन्स ॲकाडमींत आमच्या मोटारी शिरल्या तेव्हा ५ वाजले होते. आशिया खंडांत प्रथम प्रतीची ठरणारी ही लष्करी शाळा १९५५ सालांत सुरूं होईल. पुष्कळसें बांधकाम संपलें होतें, थोडे चालूं होतें. अगदी म्हणजे फारच अवाढव्य पसारा आहे ! इकडे तिकडे पसरलेल्या अति अगडबंब इमारती पाहून आमची छाती दडपली. भावी कॅडेट्ससाठी बांधलेली होटेल्स पाहून आम्हाला त्यांचा फार हेवा वाटला ! अगदी राजेशाही व्यवस्था. त्यावेळीं तेथे प्रत्यक्ष मिलिटरीचें नांव दिसत नव्हतें. उजव्या बाजूला Air Force मध्ये Army आणि डाव्या बाजूला Navy असे भाग पडणार आहेत. जगांतलं हें एकच ठिकाण की जेथे अशा तिन्ही प्रकारचें लष्करी शिक्षण मिळेल. आज डेहराडूनला शिकणारे लोक आपल्या येथे येतील. अत्यंत महत्वाचें हें ठिकाण नाम महाराष्ट्रांत आलें आहे. मध्यभागी एक घेतलेला अशोक स्तंभ, मुख्य इमारतीवर धनुष्यबाण एक द्रोणाचार्यांचा पुतळा, फार छान वाटलें पहातांना. इमारतींतून दुसरीकडे जातांना आम्ही मोटारी वापरल्या ! तरी १॥ तास लागला पाहायला ६७०० अेकराच्या टापूंत हा अवाढव्य पसारा पसरला आहे !



रात्रीं ८ ला आम्ही स्वस्थळीं परतलों. दुसऱ्या दिवशीं ४ वाजेंपर्यंत आम्हाला पुणें मनसोक्त पहायला मिळालें ! पुणें शहर मला फार आवडलें मुंबईसारख्या स्फोटक शहराला संयुक्त महाराष्ट्राची राजधानी न करतां पुण्याला कां करूं नये असा विचार माझ्या मनांत आता नेहमी येतो.

१५ तारखेला दुपारीं ४ ला मोटारी आम्हाला पुणे स्टेशनवर सोडून गेल्या रात्रभर कंटाळवाणा प्रवास होता. सकाळीं ६ ला नागपूरला एक्प्रेस जळगांव स्टेशनांत थांबली आणि ३५ रुपये खर्च करून आणलेला अवीट आनंद घेऊन आम्ही डब्याच्या बाहेर पडलों.

---

# हुरहुर

( ही हुरहुर 'तसल्या' प्रकारची नाही ! पदवी परीक्षेच्या निकालाच्या आदल्या दिवशीं एका विद्यार्थ्यास लागून राहिलेली ही हुरहुर आहे. )

काय उद्या होणार, दैवा तारुं कुठें जाणार ?  
फुलतील कांहो जीवनांत मम  
गळून पडतील कीं कोमेजुन  
स्वप्नकळ्या ह्या बघा मधुरतम  
उद्या तयांचीं नाजुक पुष्पें नाही कां होणार ?  
हाडांचीं ह्या काडे करुनी  
विद्यासंचय केला प्रतिदिनी  
घालि निराशा पिंगा मन्मनी  
काय उद्या होणार, श्रमाचें मोल काय मिळणार ?  
मनांत येईं, "जयश्री सदा  
वरी न वीरां, तया आपदा  
अनंत निष्ठुर घेरिती सदा"  
मन होउनि हळुवार, विचारी काय उद्या घडणार ?  
आशा-ज्योति तदा लुकलुके,  
फडफडे, तम हा धावे,  
कोण कुणाला ग्रासुनि टाके ?  
द्वंद्व कधी सरणार, जीवन ज्योतिर्मय होणार ?

अरविंद जावळे,  
प्रथम वर्ष, विज्ञान

# आमचें सेवापथक

विद्यार्थिजीवनांत अलिकडे विस्कळितपणा आला आहे. विद्यार्थ्यांपुढे कोणताही राजकीय अगर सामाजिक आदर्श नाही. कोणत्याही प्रभावी संघटनेचें मार्गदर्शनही नाही. त्यामुळं एक प्रकारची पोकळी विद्यार्थिजीवनांत निर्माण झाली आहे. याचाच परिणाम म्हणून विद्यार्थ्यांमध्ये बेजबाबदारपणा वाढत आहे. सर्वसामान्य नैतिक मूल्याबद्दलही त्यांना कदर वाटेनाशी झाली आहे. परंतु, त्यावर उपाय म्हणजे वेळीअवेळी विद्यार्थ्यांच्या बेजबाबदारपणावर टीका करणें हा नव्हे. जर विद्यार्थ्यांना त्यांच्या संघटनेकडून मार्गदर्शन होत नसेल, योग्य नेतृत्व ते जर निर्माण करूं शकत नसतील, तर ती जबाबदारी सहाजिकच शिक्षकांवर पडते. शिक्षकांनीं त्यांना योग्य मार्गदर्शन करून, त्यांच्यापुढे योग्य आदर्श ठेवून, त्यांच्यामध्ये विधायक दृष्टिकोन निर्माण करावयास हवा.

सेवापथकांतून श्रमदानाचा कार्यक्रम हें या दिशेने टाकलेलें एक पाऊल आहे. प्रत्येक शाळा कॉलेजांतून अशा तऱ्हेचीं श्रमपथकें संघटित होऊं लागलीं, तर त्यांतून विधायक प्रवृत्तींच्या, सामाजिक व नैतिक मूल्यांबद्दल आदर असणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक संघटित गट तयार होईल आणि अशा तऱ्हेचा एक छोटा गट जरी तयार झाला तरी विद्यार्थीजीवनांतील विस्कळितपणा नष्ट होण्यास खूपच मदत होईल.

पण हें श्रमदान म्हणजे एक "स्टंट" होता कामा नये. श्रमदान हें विधायक दृष्टिकोन, सेवावृत्ती व सामाजिक समता या तीन मूलभूत गोष्टींचें प्रतीक आहे. श्रमपथकांत नांव देणाऱ्या प्रत्येक विद्यार्थि-विद्यार्थिनीने हीं तत्वें विचारांत व आचारांत बाणून घ्यावीत; व त्यावर श्रद्धा असेल तरच श्रमदानांत भाग घ्यावा. श्रमाची प्रतिष्ठा कळण्यासाठी श्रमदान करावयाचें व दैनंदिन जीवनांत श्रमकऱ्यांना तुच्छ लेखायचें; कॉलेजांत आठवड्यांतून एकदा श्रमदान करावयाचें, आणि घरांत स्वतःची खोली साफ करावयास कुरकुर करावयाची; अगर रविवारीं श्रमदान करुन नंतर आठवडाभर कॉलेजांत बांकाखुर्च्यांची, विजेच्या बटनांची मोडतोड करावयाची, दारें, बांकें, भिंतीवर रेघोट्या ओढावयाच्या, यांत विधायक दृष्टिकोन नाही, श्रमाची प्रतिष्ठा नाही आणि समतेची भावनाही नाही. असें झालें तर श्रमदान हें एक ढोंग होईल. तें तसें होऊं नये याबद्दल आपण विद्यार्थी व शिक्षकांनीं जागरूक रहावयास हवें.

या दृष्टिकोनांतूनच गेल्या १५ ऑगष्टला आपल्या कॉलेजांत सेवापथक सुरूं केलें. सुरवातीला ८० विद्यार्थ्यांनी नांवें दिलीं. १५ ऑगष्टला कॉलेजच्या आवारांतील मुख्य रस्ता १०० विद्यार्थी व प्राध्यापकांनीं दुरुस्त केला. त्यानंतर विद्यार्थ्यांची दहादहाच्या गटांत विभागणी करुन, दर रविवारीं दोन दोन गटांनीं क्रमाने काम करावयाचें असें ठरलें. सुरवातीला कॉलेज व हॉस्टेलच्या आवारांतील साफसफाईचें काम केलें. त्यानंतर या शैक्षणिक वर्षांत पुरा करण्यासाठी एक प्रकल्प योजिला. हॉस्टेलपुढे विद्यार्थ्यांसाठी एक उद्या… आंखून, त्याभोंवतींचा रस्ता करावयाचें ठरलें … कामाला सुरवात झाली.

ता. २ आक्टोबरला गांधी जयंतीला रस्त्याच्या कामाला सुरवात करून गांधीजींच्या निर्वाण-दि… नियोजित रस्ता पूर्ण झाला आहे. दर रविवारी व गांधी… जयंति साने गुरुजी जयंति या दिवशीं नियमितपणें … विद्यार्थी व प्राध्यापक यांनीं काम केलें. सर्व साधार… उपस्थिति एकूण ५० ते ६० पर्यंत असे. आता उद्या… नाच्या आंखणीला सुरवात झाली आहे येत्या मा… अखेर आम्ही हें नियोजित काम पूर्ण करूं अ… विश्वास आहे.

याशिवाय बंगाल, आसाममधील पूरग्रस्तांना मद… गोळा करण्याकरितां महाराष्ट्र सामाजिक परिषदेच्या … अधिवेशनाच्या वेळीं, व कॉलेजच्या स्नेहसंमेलनांत … सेवापथकांतील विद्यार्थ्यांनीं स्वयंसेवक म्हणून उत्… काम केलें आहे.

यंदा सेवापथकाच्या कल्पनेला विद्यार्थ्यांनीं … साथ दिली, त्यावरून पुढील वर्षी याहीपेक्षां जा… पद्धतशीरपणें आपण काम करूं असा विश्वास वाटतो … पुढील वर्षी नवीन प्रकल्पाला सुरवात करून आस… बाजूच्या खेड्यांत काम करावें, आणि शक्य झालें … नाशिक नगर, अमळनेर येथील कॉलेजांतील विद्यार्थ्यां… बरोबर दिवाळीच्या सुटींत एकादें संयुक्त शिबिर … असा विचार आहे.

ता ३० जानेवारी }
१९५५ }

म. द. नाडकर्णी.



# मराठी अभ्यास मंडळ

## १९५४–५५

मराठीचे प्राध्यापक म. ना. अदवंत यांच्या प्रेरणेने गतवर्षी स्थापन झालेल्या 'मराठी अभ्यास मंडळा'चा प्रगतिशील अहवाल सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे. या वर्षी मंडळाचें कार्य जुलै १९५४ पासून सुरु झालें. प्रथम मंडळाची एक औपचारिक बैठक होऊन तींत मंडळाचें कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे निवडण्यांत आलें.

अध्यक्ष– प्रि. या. शि. महाजन
कार्याध्यक्ष– प्रा. म. ना. अदवंत
उपाध्यक्ष– प्रा. म. मो. केळकर
चिटणीस– श्री. वि. ह. नेमाडे
उपचिटणीस– श्री. शं. रा. राणे
कु. विद्युल्लता दास्ताने.

याच बैठकींत 'मराठी चर्चामंडळ' या नांवाची अन्तर्गत स्वरूपाची संस्था स्थापन करण्यांत आली. मराठीच्या विद्यार्थ्यांना मराठीच्या निरनिराळ्या विषयांवर अभ्यासपूर्ण निबंध लिहावयास लावून ते वाचून घेणें व त्यावर चर्चा करणें हा प्रधान उद्देश चर्चा मंडळाचा आहे. अभ्यास मंडळाच्या पुढील कार्यक्रमाची रूपरेषा या बैठकींत ठरविण्यांत आली.

मराठी अभ्यास मंडळाचा पहिला कार्यक्रम 'कै. वा म. जोशी स्मृतिदिन' ता. २०–७–५४ रोजीं प्रि. या. शि. महाजन यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. त्यावेळी प्रा. श्री. ना बनहट्टी हे प्रमुख वक्ते मंडळास लाभले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वामनरावांच्या हृद्य आठवणी सांगितल्या.

त्यानंतरचा कार्यक्रम वाद-विवादात्मक स्वरूपाचा ठेवण्यांत आला. विषय 'कै. साने गुरुजी व प्रा. ना. सी. फडके यांच्यांत श्रेष्ठ लेखक कोण?' हा होता. वाद विवादांत श्री. भोळे, श्री. जोशी, श्री. गंधे, श्री. भट कु. दास्ताने या विद्यार्थ्यांनीं भाग घेतला. शेवटीं अध्यक्ष प्रा. म. ना. अदवंत यांनी समारोपाचें भाषण करून बैठकीचा निर्णय घेतला की, संत म्हणून जरी साने गुरुजी श्रेष्ठ असले तरी साहित्यिक म्हणून प्रा. ना. सी फडके हेच श्रेष्ठ होत.

ता. २५–८–५४ रोजीं हिंदीचे सुप्रसिद्ध साहित्यिक कै. मुन्शी प्रेमचंद यांचा स्मृतिदिन साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानीं हिंदीचे प्राध्यापक न चिं. जोगळेकर हे होते. या सभेंत प्रा. ग. ह. तारळेकर, श्री वि ह. नेमाडे, श्री. बा. भो. बाघुळदे यांनी प्रेमचंदाच्या जीवनाचा व साहित्याचा परिचय करून दिला.

त्यानंतर कार्यकारी मंडळाची बैठक होऊन तींत 'ज्ञानेश्वरजयंति' व 'मराठी कविता दर्शन' असे दोन कार्यक्रम घडवून आणण्याचें ठरलें. कवितादर्शनाकरितां तेरा कवितांची निवड करण्यांत आली.

ता. १८–९–५५ रोजीं प्रि. या. शि. महाजन यांचे अध्यक्षतेखाली 'ज्ञानेश्वरजयंति' साजरी करण्यांत आली. मुख्य वक्ते म्हणून आचार्य ज. स. भागवत यांना बोलावण्यांत आलें. त्यांनी 'महाराष्ट्रीय संतांचें सामाजिक कार्य' या विषयावर उद्बोधक असें व्याख्यान दिलें.

ता. २९–९–५४ रोजीं प्रा. म. ना. अदवंत यांच्या अध्यक्षतेखालीं 'नवीन मराठी कवितादर्शन' हा अभिनव स्वरूपाचा कार्यक्रम करण्यांत आला. या कार्यक्रमांत तेरा नवीन मराठी कवींच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या कवितांचें वाचन व गायन तेरा जणांनी करून दाखविलें. पुढील व्यक्तींनी कार्यक्रमांत भाग घेतला

होताः— प्रा. तारळेकर, प्रा. न. चिं. जोगळेकर, प्रा. भावे, प्रा. अदवंत, श्री. नेमाडे, महाजन, राणे, दिघे, कु. राणे, कु. गुप्ते, कु. जोशी, कु. कोठूरकर, कु. दाणी. कवितादर्शनापूर्वी प्रा. अदवंत कवीची व कवितेची ओळख करून देत होते. त्यामुळे विद्यार्थी-श्रोत्यांना कवितेचा आशय व नवकवितेचा प्रवाह समजण्यास मदत होत होती. या कार्यक्रमाचें अभिनव-तेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी चांगलें स्वागत केलें.

ता. ३०-११-५४ रोजीं 'कै. माधवराव पटवर्धन स्मृतिदिन' साजरा करण्यांत आला. प्रा. तारळेकर, श्री. दिघे, कु. दास्ताने, श्री. खरे वगैरे वक्त्यांनी माधवरावांच्या व्यक्तित्वाचा व साहित्याचा परिचय करून दिला. कु. जोशी, कु. राणे, कु. प्रभा कुळकर्णी व सौ. वाडेकर यांनी माधवरावांच्या प्रसिद्ध कविता गाऊन दाखविल्या. शेवटी अध्यक्ष प्रा. म. ना. अदवंत यांचें समारोपाचें भाषण झाल्यानंतर कार्यक्रम संपला.

या वर्षी कवि गिरीशांचा मंडळाला लाभ झाला. ता. ७-१२-५४ रोजीं प्रिं. या. शि. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली कवि गिरीश यांचें 'मी व माझी कविता' या विषयावर व्याख्यान झालें. त्यांत त्यांनी रविकिरण मंडळाचा इतिहास व स्वतःच्या काव्याचें स्वरूप खेळकर भाषाशैलींत मोठ्या मनोरंजकतेने उलगडून दाखविलें.

'मराठी - चर्चा - मंडळां'त खालीलप्रमाणे सात निबंधाचें वाचन होऊन त्यांच्यावर चर्चा झाली.

(१) कु. गुप्ते यांचें 'माधवरावांचीं खंडकाव्यें' या विषयावरील निबंधवाचन झालें. अध्यक्ष प्रा. म. ना. अदवंत यांचें समारोपाचें भाषण झालें.

(२) ता. २०-८-५४ रोजीं प्रा. अदवंत यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. ज. वि. महाजन यांचें 'मराठी नवकाव्य' या विषयावरील निबंधवाचन झालें. श्री. वि. ह. नेमाडे यांनी चर्चेंत भाग घेतला.

(३) ता. २८-८-५४ रोजीं प्रा. तारळेकर यांच्या अध्यक्षतेखाली कु. आठवले यांचें 'कै. देवलांची नाट्यसृष्टि' या विषयावरील निबंधवाचन झालें. प्रा. चिपळूणकर व श्री. ज. वि. महाजन यांनी चर्चेंत भाग घेतला.

(४) ता. २०-११-५४ रोजीं प्रा. अदवंत यांच्या अध्यक्षतेखाली कु उषा कुळकर्णी यांचें 'केशवसुत आणि त्यांचें क्रांतिकारकत्व' या विषयावरील निबंध-वाचन झालें.

(५) ता. २०-११-५४ रोजीं प्रा. अदवंत यांच्या अध्यक्षतेखाली कु. कोठूरकर यांचें 'मराठी लघुनिबंध' या विषयावरील निबंधवाचन झालें. श्री. वि. ह. नेमाडे यांनी चर्चेंत भाग घेतला.

(६) ता. ११-१२-५४ रोजीं प्रा. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं कु. शकुंतला जोशी यांचें 'समीक्षक वामनराव' या विषयावरील निबंधवाचन झालें.

